CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह

सोलापूर | रविवार, ५ जानेवारी २०२५ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ६० | पाने १२+८ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# तीर्थक्षेत्र पंढरपूर कॉरिडॉरबाबतची गोड बातमी लवकरच

## मंत्री गिरीश महाजन यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ४ जानेवारी-**
पंढरपूर हे राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे विठ्ठलाच्या दर्शनासाठी वर्षाला एक कोटीहून अधिक भाविक येतात. यामुळे मंदिर परिसरात नेहमी गर्दी असते. भाविकांना त्रास होऊ नये व सोयीसुविधा मिळाव्यात म्हणून पंढरपुरात कॉरिडॉर करण्यात येणार आहे. या बाबतची गोड बातमी लवकरच आपल्याला समजेल अशी माहिती जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी दिली. जलसंपदा मंत्री गिरीश महाजन पंढरपूर येथे विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेण्यासाठी शनिवारी आले असता पत्रकारांशी ते बोलत होते.

यावेळी आ. समाधान आवताडे, माजी आ. प्रशांत परिचारक आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना गिरीश महाजन म्हणाले, पंढरपूर राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेण्यासाठी वर्षाला एक कोटी होऊन अधिक भाविक येतात. यात्रा कालावधीत मंदिर परिसरात भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी असते. यामुळे भाविकांना त्रास सहन करावा लागतो. यामुळे मंदिर परिसरात रस्ता रुंदीकरण करून कॉरिडॉर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याची अंमलबजावणी लवकरच करण्यात येणार असून कॉरिडॉरमुळे भाविकांना अत्याधुनिक सुविधा मिळणार आहेत. यामुळे पंढरपूरच्या अर्थकारणाला गतीदेखील मिळणार आहे.

### धनंजय मुंडेंवर अहवालानंतरच कारवाई

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिकी कराड याचे मंत्री धनंजय मुंडे यांच्याबरोबर संबंध असल्याची चर्चा होत आहे. यामुळे आता मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर शासनस्तरावर कारवाई केली जाणार का? असे विचारले असता या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एसआयटीची स्थापन करण्यात आली आहे, याचा अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल असे महाजन यांनी सांगितले.






# भाजपाचे आज राज्यव्यापी विशेष सदस्यता अभियान

## एकाच दिवशी २५ लाख नोंदणीचे उद्दिष्ट

**मुंबई, ४ जानेवारी**
भाजपाच्या सदस्य नोंदणी अभियानाला अधिक गती देण्याच्या उद्देशाने रविवारी राज्यभर विशेष सदस्यता नोंदणी अभियान राबवण्यात येणार आहे. यानिमित्त एकाच दिवशी २५ लाखांहून अधिक सदस्य नोंदणी करण्याचे लक्ष्य ठेवले असल्याची माहिती संघटन पर्व प्रभारी आ. रवींद्र चव्हाण यांनी शनिवारी दिली.

शनिवारी भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रपरिषदेत ते बोलत होते. पक्षाचे राज्यातील सर्व मंत्री, आमदार, खासदार, नेते-पदाधिकारी या अभियानात सहभागी होणार आहेत, अशी माहिती त्यांनी दिली. चव्हाण म्हणाले की, या विशेष सदस्य नोंदणी अभियानाची सुरुवात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे नागपूर येथून करणार आहेत. भाजपाचा प्रत्येक कार्यकर्ता, लोकप्रतिनिधी, नेते, आमदार रस्त्यावर उतरून प्रत्येक बूथपर्यंत पोहोचून जास्तीतजास्त नागरिक भाजपाशी जोडला जाईल, यासाठी प्रयत्न करणार आहेत.

या अभियानाबाबत बावनकुळे यांनी केलेल्या सूचनेनुसार प्रत्येक बूथवरील कार्यकर्ता २५० पेक्षा अधिक सदस्य नोंदणी करण्यासाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचे चव्हाण यांनी नमूद केले.डिसेंबर पासून सुरू झालेल्या सदस्य नोंदणी अभियानात प्रत्येक विधानसभा मतदारसंघासाठी ५० हजारांहून अधिक सदस्य नोंदणीचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीनंतर लगेच संघटन पर्वाची सुरुवात झाली. त्यानंतर भाजपाचे विविध मोर्चे तसेच प्रकोष्ठ यांनी नोंदणी अभियानासाठी कार्यशाळा घेतल्या होत्या. भाजपा प्राथमिक सदस्य नोंदणी अभियानात राज्यभरातून दीड कोटी सदस्य नोंदणी करण्याची सूचना बावनकुळे यांनी दिली होती. या अनुषंगाने अभियानाला अधिक गतिमान करून सक्रिय सहभागासाठी विशेष योजना आखल्याचे चव्हाण यांनी सांगितले.



# अंतराळात फुलले 'जीवन'

## इस्रोचे मोठे यश; चवळीच्या बिया उगवल्या

**नवी दिल्ली, ४ जानेवारी**
पीएसएलव्ही-सी ६० पीओईएम-४ मंचावर अंतराळात पाठवलेल्या चवळीच्या बिया प्रक्षेपणानंतर चार दिवसांच्या आत सूक्ष्म गुरुत्वाकर्षण परिस्थितीत अंकुरित झाल्या आहेत, असे इस्रोने शनिवारी सांगितले.

सूक्ष्म गुरुत्वाकर्षण परिस्थितीत वनस्पतींच्या वाढीचा अभ्यास करण्यासाठी विक्रम साराभाई अंतराळ केंद्राद्वारे (व्हीएसएससी) आयोजित केलेल्या ऑर्बिट प्लांट स्टडीज प्रयोगासाठी कॉम्पॅक्ट रिसर्च मोड्युलचा एक भाग म्हणून इस्रोने चवळीच्या आठ बिया अंतराळात पाठवल्या. अंतराळात जीवन उगवते! पीएसएलव्ही- सी ६० पीओईएमवर व्हीएसएससीच्या कॉप्स प्रयोगादरम्यान चार दिवसांच चवळीचे बियाणे यशस्वीरीत्या उगवले, असे इस्रोने एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

अंतराळातील विशिष्ट परिस्थितीत रोपटी कशी विकसित होतात, हे समजून घेण्याचा उद्देश या क्रॉप्स प्रयोगामागे आहे. भविष्यातील दीर्घकालीन अंतराळ मोहिमांसाठी तो अत्यावश्यक आहे. या प्रयोगात उष्णता नियंत्रणासह नियंत्रित वातावरणात चवळीच्या आठ बिया उगवल्या जातात तसेच दीर्घकालीन अंतराळ प्रवासात त्याचा प्रभाव रोपट्यांवर कसा पडेल, हे तपासण्यासाठी तशी परिस्थिती निमर्मिण करण्यात आली.

### पाच ते सात दिवसांच्या प्रयोगाचे नियोजन

क्रॉप्सची कल्पना बाह्य वातावरणात वनस्पती वाढवण्यासाठी आणि टिकवून ठेवण्यासाठी इस्रोची क्षमता विकसित करण्यासाठी विविध टप्प्यांतील मंच म्हणून आहे. पूर्णपणे स्वयंचलित प्रणाली म्हणून संरचना केलेले, सूक्ष्म गुरुत्वाकर्षण वातावरणात दोन पानांच्या अवस्थेपर्यंत बियाणे उगवणे आणि वनस्पती टिकवून ठेवण्यासाठी पाच ते सात दिवसांच्या प्रयोगांचे नियोजन करण्यात आले आहे.

# जातीच्या नावावर पसरवले जातेय् विष : पंतप्रधान

**नवी दिल्ली, ४ जानेवारी**
जातीयतेच्या नावावर समाजात विष पसरवल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी विरोधकांवर घणाघात केला. गावांची सामायिक संस्कृती व वारसा मजबूत करण्यासाठी असे षडयंत्र हाणून पाडा, असे आवाहन केले.

आमच्या सरकारने २०१४ पासून ग्रामीण भागातील विकासावर लक्ष केंद्रित केले आहे. २०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न अस्तित्वात आणण्यात गावे महत्त्वाची भूमिका पार पाडतील, असे मोदी यांनी ग्रामीण भारत महोत्सवाचे उद्घाटन करताना सांगितले.

जातीच्या नावाने समाजात विष पसरवण्याचे कटकारस्थान उधळून लावले आहे. राहुल गांधी आणि अखिलेश यादव यांच्यासह विरोधक जात आधारित जनगणनेची मागणी करीत आहेत. २०१४ पासून आम्ही ग्रामीण भारताच्या सेवेत सतत कार्यरत आहोत, असे मोदी म्हणाले.



डिजिटल तंत्रज्ञानाच्या साहाय्याने टेलिमेडिसिनने खेड्यापाड्यात सर्वोत्तम डॉक्टर आणि रुग्णालये उपलब्ध करून दिली जात आहेत. ग्रामीण भागांतील कोट्यवधी लोकांना ई-संजीवनीद्वारे टेलिमेडिसिनचा फायदा झाला, असेही मोदी म्हणाले.

### लाखो आयुष्मान आरोग्य मंदिरांतून आरोग्य सेवा

स्वच्छ भारतचा एक भाग म्हणून शौचालये बनवण्यात आली आहेत आणि पंतप्रधान आवास योजनेचा भाग म्हणून ग्रामीण भागातील कोट्यवधी लोकांना पक्की घरे देण्यात आली. जल जीवन मिशनद्वारे सुरक्षित आणि स्वच्छ पेयजल उपलब्ध करून दिले जात आहे. आज दीड लाखांपेक्षा अधिक आयुष्मान आरोग्य मंदिरांमध्ये लोकांना आरोग्य सेवा पुरवल्या जात आहेत, असे नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

# सोलापूरच्या पाणीपुरवठा योजना प्रस्तावाला मंजुरी द्या : मुख्यमंत्री

## नगरविकास विभागाच्या बैठकीत अधिकाऱ्यांना सूचना

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई दि. ४ डिसेंबर -**
सोलापूर स्मार्ट सिटीच्या पाणी पुरवठा योजनेच्या निधीसाठीच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात यावी. यामुळे सोलापूरवासियांच्या पाण्याचा प्रश्न निकाली निघेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितले. तसेच राज्यातील विविध नियोजन प्राधिकरणांचे सक्षमीकरण करुन त्यांचे कामकाज कंपनीच्या धर्तीवर करावे, अशा सूचनाही दिल्या.



नगरविकास विभागाच्या आगामी शंभर दिवसांच्या कामकाज नियोजनाबाबत बैठकीत त्यांनी हे निर्देश दिले.

नागपुरात झालेल्या हिवाळी अधिवेशनावेळी सोलापूर जिल्ह्यातील आमदारांनी हा प्रश्न मांडला होता. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी याबाबत उचित कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले होते . त्यानुसार आज त्याबाबत अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. सह्याद्री राज्य अतिथीगृहात झालेल्या बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे, राज्य मंत्री माधुरी मिसाळ, राज्य मंत्री पंकज भोयर उपस्थित होते. नगरविकास विभाग(एक)चे अपर मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता यांनी विभागाचे सादरीकरण केले. विभागाच्या अखत्यारीत असलेले विविध नियोजन प्राधिकरण यांचे सक्षमीकरण करणे, शहरां जवळील सुमारे साडेतीन हजार गावांत रस्ते विकासाचे नियोजन करणे, राज्यातील दहा लाखांवरील शहरांत नागरी संकल्प प्रकल्प राबविणे, इमारत परवाने देण्याच्या प्रक्रियेचे संगणकीकरण करणे, पर्यटन धोरणानुसार एकत्रित नागरी विकास आणि नियंत्रण नियमावलीत बदल करण्याबाबतची माहिती दिली.

यावेळी सोलापूर स्मार्ट सिटी योजनेसाठी पाणीपुरवठा योजनेत निधी कमी पडत आहे त्याबाबतचा प्रस्ताव आला असल्याचे सांगण्यात आले त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी प्रस्तावाला मंजुरी द्यावी जेणेकरून सोलापूरवाशियांच्या पाण्याचा प्रश्न मिटेल, तसेच राज्यातील शहरांच्या विकासासाठी निधी खर्च करण्याची आवश्यकता आहे. शहरातील पायाभूत विकासासाठी भांडवली गुंतवणूक करावीच लागणार आहे. मात्र यासाठी निधी उभारण्यासाठी नाविन्यपूर्ण आर्थिक पर्याय उभारले पाहिजेत, अशा सूचना दिल्या.राज्यातील प्रत्येक शहरात चित्रपटांसाठीची थिएटरची संख्या वाढण्याची गरज आहे. यासाठी सध्या असलेल्या सिंगल स्क्रीन थिएटरना काही सवलती देता येईल का, तसेच मराठी नाटक आणि चित्रपट एकाच थिएटरमध्ये दाखवता येईल का याबाबत विचार करावा, असे निर्देश दिले.

# तीन वाहनांचा अपघात, ७ जण जखमी

**कारंजा लाड :** तीन वाहनांच्या अपघातात ७ जण जखमी झाले. ही घटना शनिवारी कारंजा दारव्हा मार्गावरील गंगापूर फाट्याजवळ घडली. अल्टो कार दारव्हाकडून कारंजाकडे येत असताना चालकाचे कारवरील नियंत्रण सुटल्याने ती स्वीफ्ट कारवर धडकली.

# ज्येष्ठ शास्त्रज्ञ आर. चिदम्बरम् यांचे निधन

**मुंबई, ४ जानेवारी**
१९७४ आणि १९९८ मध्ये झालेल्या अणुचाचण्यांत महत्त्वाची भूमिका पार पाडणारे ज्येष्ठ शास्त्रज्ञ राजगोपाल चिदम्बरम् यांचे निधन झाले. ते ८८ वर्षांचे होते, अशी माहिती अणुऊर्जा विभागाने दिली.

मुंबईतील जसलोक हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर उपचार सुरू होते. प्रख्यात भौतिक शास्त्रज्ञ आणि भारतातील प्रतिष्ठित शास्त्रज्ञांपैकी एक डॉ. राजगोपाल चिदम्बरम् यांचे शनिवारी पहाटे साडेतीन वाजताच्या सुमारास निधन झाले. भारताच्या वैज्ञानिक आणि धोरणात्मक क्षमता वाढवण्यात डॉ. चिदम्बरम् यांनी दिलेले अद्वितीय योगदान आणि विज्ञान-तंत्रज्ञानातील त्यांचे दूरदर्शी नेतृत्व कायम स्मरणात ठेवले जाईल, असे अणुऊर्जा विभागाने म्हटले आहे. चिदम्बरम् यांचा जन्म १९३६ मध्ये झाला. त्यांनी चेन्नईतील रेसिडेन्सी कॉलेज आणि बंगळुरूतील भारतीय विज्ञान संस्थेतून शिक्षण घेतले. चिदम्बरम् यांनी भारताचे प्रधान वैज्ञानिक सल्लागार (२००१-२०१८), भाभा अणुसंशोधन केंद्राचे संचालकपदासह (१९९३-२०००) कित्येक प्रतिष्ठित पदांवर सेवा दिल्या आहेत. त्यांनी १९९४ ते १९९५ या कालावधीत आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेच्या बोर्ड ऑफ गव्हर्नर्सचे अध्यक्षपदही भूषवले होते.



राजगोपाल चिदम्बरम् यांनी भारताच्या अण्वस्त्र कार्यक्रमाला आकार दिला होता. त्यांनी १९७४ तसेच १९९८ मध्ये पोखरण येथील अणुचाचण्यांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली होती. ते जागतिक दर्जाचे भौतिकशास्त्रज्ञ आणि हुशार विज्ञान प्रशासक होते. ग्रामीण भागातील समुदायांना सक्षम करण्यासाठी नाविन्यपूर्ण तंत्रज्ञाना परिचय करून देण्यासोबत आण्विक भौतिकशास्त्राच्या क्षेत्रौत महान योगदान दिले.






सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/

# सामना संतुलित, दोन्ही संघांना संधी

## स्कॉट बोलॅण्डचे ४ बळी, ऋषभ पंतचे अर्धशतक

◆ **सिडनी, ४ जानेवारी**

सिडनी क्रिकेट मैदानावर खेळल्या जात असलेला बॉर्डर-गावस्कर चषक पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील भारत व ऑस्ट्रेलियादरम्यानचा पाचवा व अंतिम कसोटी रोमांचक वळणावर पोहोचला आहे. हा सामना संतुलित असून दोन्ही संघांना विजयाची समसमान संधी आहे. भारताच्या १८५ धावांच्या प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाला १८१ धावांपर्यंतच मजल मारता आली. ऋषभ पंतच्या अर्धशतकी खेळीच्या बळावर भारताने दुसऱ्या दिवस अखेर दुसऱ्या डावांत ६ बाद १४१ धावा काढल्या. ऑस्ट्रेलियाच्या बोलण्डने ४-बळी टिपण्याची किमया केली. भारत सध्या १४६ धावांनी आघाडीवर आहे.

आता भारताला हा अंतिम कसोटी सामना जिंकायचा असेल, तर त्यांच्या उर्वरित फलंदाजांना अधिकाधिक धावा काढाव्या लागतील तसेच बुमराहच्या नेतृत्वाखालील गोलंदाजी विभागाला निर्धारित लक्ष्य गाठण्यापूर्वी ऑस्ट्रेलियाचा संपूर्ण संघ बाद करावा लागेल.

सामन्याच्या पहिल्या दिवशी भारताचा पहिला डाव १८५ धावांत आटोपल्यानंतर दिवस अखेर बुमराहने उस्मान ख्वाजाच्या रुपाने ऑस्ट्रेलियाचा पहिला गडी बाद केला होता. ऑस्ट्रेलियाने आज १ बाद ९ धावांवरून पुढे आपल्या पहिल्या डावास सुरुवात केली, परंतु भारतीय गोलंदाजांनी ऑस्ट्रेलियन फलंदाजांचा चोख बंदोबस्त करत त्यांचा पहिला डाव अवघ्या ५१ षटकांत सर्वबाद १८१ धावांत गुंडाळला. या बरोबरच भारताने पहिल्या डावात ४ धावांची निसटती आघाडी संपादन केली आहे.

चेंडूला उसळी व वेग देणाऱ्या सिडनीच्या खेळपट्टीवर भारताच्या दुसऱ्या डावाची सुरुवातही पहिल्या डावा प्रमाणेच झाली. भारताने दुसऱ्या दिवस अखेर दुसऱ्या डावांत ३२ षटकांत ६ बाद १४१ धावा उभारल्या. सध्या भारत १४५ धावांनी आघाडीवर आहे.

ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव झटपट गुंडाळताना मोहम्मद सिराज व प्रसिध कृष्णाने प्रत्येकी ३ बळी, तर हंगामी कर्णधार जसप्रीत बुमराह व नितीश कुमार रेड्डीने प्रत्येकी २ बळी टिपलेत.

ऑस्ट्रेलियाकडून पदार्पण करणाऱ्या ब्यू वेबस्टरने तेवढी ५७ धावांची लक्षवेधक अर्धशतकी खेळी केली. वेबस्टरने १०५ चेंडूंत ५ चौकारांसह ५७ धावांचे योगदान दिले. सलामीवीर सॅम कोन्स्टास (२३), स्टीव्ह स्मिथ (३३) व ॲलेक्स कॅरीने (२१) संघासाठी थोडीफार झुंज दिली. ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव ५१ षटकांत १८१ धावांतच संपुष्टात आला. भारताच्या दुसऱ्या डावाची सुरुवातही पहिल्या डावाप्रमाणेत झाली. वेगवान गोलंदाज स्कॉट बोलॅण्डने पुन्हा एकदा भारताच्या फलंदाजीच्या पहिल्या फळीला जोरदार हादरे दिले. बोलॅण्डने सलामीवीर यशस्वी जयस्वाल (२२), केएल राहुल (१३) व विराट कोहली (६) या महत्त्वपूर्ण फलंदाजांना लवकरच तंबूत परत पाठवले. ब्यू वेब स्टरने शुभमन गिलला (१३) ॲलेक्स कॅरीकडून झेलबाद केले. त्यामुळे १५.२ षटकांत भारताची स्थिती ४ बाद ७८ धावा अशी झाली होती, परंतु त्यानंतर ऋषभ पंतने अर्धशतकी खेळी करत भारताचा डाव सावरला. पंतने रवींद्र जडेजासोबत पाचव्या गड्यासाठी ४६ धावांची भागीदारी केली. याचवेळी तो पॅट कमिन्सच्या वेगवान माऱ्याला बळी पडला. पंतने ३३ चेंडूंत ६ चौकार व ४ षट्कारांच्या मदतीने ६१ धावांचे योगदान दिले. पंत बाद झाल्यानंतर नितीश कुमार रेड्डीकडून (४) भरीव कामगिरीची अपेक्षा होती, परंतु त्याच्या रुपाने स्कॉट बोलॅण्डने आजचा आपला चौथा बळी टिपला.

रवींद्र जडेजा व वॉशिंग्टन सुंदरने दिवस अखेरपर्यंत नाबाद खेळी करत भारताला दुसऱ्या डावांत ३२ षटकांत ६ बाद १४१ धावांचा टप्पा गाठून दिला. जडेजा नाबाद ८ धावांवर, तर सुंदर नाबाद ६ धावांवर खेळत होते. भारत व ऑस्ट्रेलियादरम्यानच्या बॉर्डर-गावस्कर चषक पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत सध्या ऑस्ट्रेलिया २-१ ने आघाडीवर आहे. भारताला मालिकेत बरोबरी साधण्यासाठी हा अंतिम कसोटी सामना जिंकणे आवश्यक आहे. ◂(वृत्तसंस्था)



फटका मारताना ऋषभ पंत




नितीश कुमार रेड्डीला बाद केल्याचा आनंद साजरा करताना स्कॉट बोलॅण्ड व पॅट कमिन्स

## महत्त्वाचे

### पंतच्या 'उल्लेखनीय' खेळीने ऑस्ट्रेलिया हादरला: तेंडुलकर

**सिडनी** : ऑस्ट्रेलियाविरुद्ध भारताचा यष्टिरक्षक-फलंदाज ऋषभ पंतने केलेली खेळी उल्लेखनीय असून त्याच्या खेळीमुळे ऑस्ट्रेलिया हादरला आहे, अशा शब्दात भारताचा महान क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरने पंतची प्रशंसा केली.



भारतीय अव्वल फळी पुन्हा एकदा संघाला दमदार सुरुवात करण्यात अपयशी ठरल्यानंतर ऋषभ पंतने सर्वात वेगवान अर्धशतक ठोकले. ऑस्ट्रेलियन भूमीवर त्याने सहा चौकार चार षट्कारांसह ३३ चेंडूंत ६१ धावांचे योगदान दिले आहे, असेही तो म्हणाला. ज्या खेळपट्टीवरर बहुसंख्य फलंदाजांनी ५० किंवा त्यापेक्षा कमी धावा केल्या, तिथे पंतची खेळी खरोखरच उल्लेखनीय आहे. त्याने ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजीला चांगले धुतले. त्याची फलंदाजी पाहणे मनोरंजक असते. प्रभावी खेळी! असे तेंडुलकरने द एक्सवर पोस्ट केले. पंतने मिचेल स्टार्कविरुद्धच्या षटकाराच्या जोरावर २९ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले. कसोटी सामन्यात भारतीय फलंदाजाचे हे दुसरे सर्वात जलद अर्धशतक होते.

### सौरभ चौधरी, वरुण तोमर अंतिम फेरीत दाखल

**नवी दिल्ली** : रेल्वेचे प्रतिनिधीत्व करणारा माजी जागतिक क्रमवारीत अव्वल क्रमांकावर असलेला सौरभ चौधरी आणि अनेक आंतरराष्ट्रीय पदकविजेता सेनादलाचा वरुण तोमर हे पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तूल राष्ट्रीय विजेतेपदासाठी अंतिम आठ जणांमध्ये सहभागी झाले आहेत. ६७ वी राष्ट्रीय नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत पिस्तूल प्रकाराच्या अंतिम स्पर्धा रविवारी येथील डॉ. करणी सिंग शूटिंग रेंजवर होणार आहे. सौरभने काही दिवसांपूर्वी केलेला ५९१ गुणांचा राष्ट्रीय विक्रम कोणीही मोडीत काढू शकला नाही. पात्रता फेरी पूर्ण करणाऱ्या जवळपास १३३९ नेमबाजांमध्ये वरुणने ५८५ गुणांसह तिसरे स्थान पटकावले. वरिष्ठ व कनिष्ठ अशा दोन्ही गटाच्या अंतिम फेरीत स्थान मिळवण्यासाठी प्रद्युम्न सिंग व हरयाणाचा परमोद यांच्यासह तीन जणांमध्ये चुरस आहे. तिघेही सेनादलाचे नेमबाज आहेत.

### बंगाल टायगर्सचा दिल्ली एसजी पायपर्सवर विजय

**राऊरकेला** : जुगराज सिंगने केलेल्या गोलच्या बळावर बंगाल टायगर्सने शनिवारी येथे बिरसा मुंडा स्टेडियमवर सुरू असलेल्या हॉकी इंडिया लीगमध्ये (एचआयएल) दिल्ली एसजी पायपर्सवर ४-१ अशा गोलफरकाने विजय नोंदविला. दिल्ली एसजीचा हा या हंगामातील पहिला पराभव ठरला. जुगराज याने १७ व्या व ३८ व्या मिनिटाला पेनॉल्टी कॉर्नरला दोन गोलमध्ये रुपांतर केले. सुखजीत सिंगने पहिल्याच मिनिटाला गोल केला, तर अभिषेकने ४७ व्या मिनिटाला एका गोलची भर घातली. दिल्लीचा एकमेव गोल गॅरेथ फर्लॉंगने ५३ व्या मिनिटाला पेनॉल्टी कॉर्नरवर केला. दिल्ली संघासाठी याआधीच्या दोन सामन्यांमध्ये, जे दोन्ही शूटआऊटमध्ये खेळले गेले होते. या विजयाबरोबरच बंगाल टायगर्स गुणतालिकेत अव्वल स्थानावर पोहोचला आहे. बंगाल टायगर्सने सामन्याची सर्वोत्तम शैलीत सुरुवात केली व दिल्ली एसजीवर संपूर्ण सामन्यात वर्चस्व गाजवले.

### चहलचे वैवाहिक संबंध अडचणीत?

**नवी दिल्ली** : भारताचा फिरकीपटू युझवेंद्र चहल आणि त्याची पत्नी धनश्री वर्मा यांच्यातील वैवाहिक नातेसंबंधाबद्दल चर्चांनी जोर पकडला आहे. ३४ वर्षीय चहलने धनश्रीला इंस्टाग्रामवर अनफॉलो केले नाही, तर तिचे सर्व फोटोही डिलीट केले आहेत. दंतचिकित्सक व नृत्यांगना धनश्रीने चहलला देखील अनफॉलो केले आहे, तरीही तिच्या इंस्टाग्राम जोडप्याच्या रूपात त्यांची छायाचित्रे कायम आहेत. त्यांचे डिसेंबर २०२० मध्ये विवाह झाला होता. चहल किंवा धनश्री या दोघांनीही आतापर्यंत कोणतेही वक्तव्य दिलेले नाही.



### राजर्षि शाहू मराठी विद्यालयात क्रीडा सप्ताह उत्साहात

**सोलापूर** : राजर्षि शाहू मराठी विद्यालयात क्रीडा सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. या सप्ताहाचे उद्घाटन मुख्याध्यापिका चंद्रकला शिलरत्न गायकवाड यांच्या हस्ते झाले. त्यानंतर धावणे, खो-खो, लंगडी, कबड्डी, उंच उडी व रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेतील विजयी स्पर्धकांना मुख्याध्यापकांच्या हस्ते सन्मानचिन्ह देण्यात आले. विश्वासराव घंटेनवरू यांनी सूत्रसंचालन केले. इरय्या स्वामी यांनी आभार मानले. सप्ताह यशस्वीतेसाठी मनीष शेंडगे, अभिजित गुजले, सचिन डोईफोडे, प्रतिभा गायकवाड, साक्षी जाधव, प्रियंका गायकवाड, सोनाली माने यांनी परिश्रम घेतले.



# पुरुष गटात पुणेकर अजिंक्य

## रोटरी क्लब टेबल टेनिस स्पर्धा : तिवारीचा गौरव

**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

रोटरी क्लब ऑफ सोलापूरच्या टेबल टेनिस स्पर्धेत पुरुष गटात मुझम्मील पुणेकर याने अजिंक्यपद पटकाविले. अंतिम सामन्यात त्याने अथांग ऐनापुरेचा ३-२ असा पराभव केला.

या स्पर्धेचे बक्षीस वितरण मेसानिक हॉल येथे क्रीडा फेडरेशनचे उपाध्यक्ष झुबीन अमेरिया, रोटीचे प्रेसिडेंट सुनील माहेश्वरी, सेक्रेटरी ब्रिजकुमार गोयदाणी, डॉ. राजीव प्रधान, सुनील मदान यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी महाराष्ट्र राज्य अकरा वर्षाआतील मुलांमध्ये अजिंक्य प्राप्त केलेल्या बार्शीच्या राजवर्धन तिवारी सत्कार करण्यात आला.

**अंतिम निकाल याप्रमाणे :**

**११ वर्षे मुले :** अक्षित ऐनापुरे वि वि. वेद खतोड. ३-०. मुली : शिवानी सानप वि. वि. आरोही कुलकर्णी ३-०.

**१४ वर्षे मुले :** वेदांत खळदे वि. वि. सोहम उंबरदंड. ३,१. मुली : शिवानी सानप वि. वि. अनुष्का सावळगी ३-०. प्रौढ एकेरी : डॉ. नरेंद्र दासरी वि वि सचिन जोग ३-१.



**सोलापूर : सोलापूर श्रमिक पत्रकार संघ आणि सोलापूर ॲडव्हर्टायझिंग एजन्सीज वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सोलापूर मीडिया कप २०२५ या स्पर्धेचे उद्घाटन शनिवारी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. यावेळी रेल्वेचे वरिष्ठ वाणिज्य मंडल प्रबंधक योगेश पाटील, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, खजिनदार किरण बनसोडे, सावा संघटनेचे अध्यक्ष संतोष उदगिरी, जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सचिव चंद्रकांत रेम्बर्सू आदी उपस्थित होते.**



# जिल्हास्तरीय तलवारबाजी स्पर्धा सुरू

**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

ऑल स्टार फेन्सिंग क्लबच्या ६व्या वर्धापन दिनानिमित्त क्लबच्या वतीने जिल्हास्तरीय तलवारबाजी स्पर्धेस छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज येथे सुरुवात झाली.

या स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र तलवारबाजी संघटनेचे उपाध्यक्ष प्रकाश काटुळे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी ऑल स्टार फेन्सिंग क्लबचे अध्यक्ष दीपक शिंदे उपस्थित होते. या स्पर्धा १०, १२, १४, १७, १९ व वरिष्ठ वयोगटामध्ये घेण्यात आल्या. यात १५० खेळाडूंनी सहभाग नोंदवला. ऑल स्टार फेन्सिंग क्लबचे सचिव पवन भोसले यांनी आभार मानले.

# चेस खेळ हा जीवनातील रणनीती शिकवणारा : खा. धैर्यशील मोहिते-पाटील

## ● आंतरराष्ट्रीय गुणांकनप्राप्त राऊत याचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**अकूलज, दि. ३ जानेवारी-**

चेस केवळ एक खेळ नाही, तर तो जीवनातील रणनीती शिकवणारा महत्त्वपूर्ण खेळ आहे. मला आनंद आहे की, माळशिरस तालुका चेस असोसिएशनने बुद्धिबळ खेळाचे महत्व वाढवण्यासाठी प्रसार करण्यासाठी विविध उपक्रम राबवले आहेत. यापुढे देखील माळशिरस तालुक्यातील चेस संघटना मेहनतीने तालुक्यात चेस खेळाचा अधिक प्रसार करतील व खेळाडू घडवतील, असे प्रतिपादन खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केले.



माळशिरस तालुका चेस असोसिएशनची वार्षिक बैठक असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष तथा खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या उपस्थितीत अकलूज येथे झाली. असोसिएशनतर्फे त्यांता सत्कार करण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी क्रीडा क्षेत्रातील योगदानासाठी अनेक मान्यवरांचा तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर गुणांकन मिळवणाऱ्या श्रीराम राऊत याचा सन्मान करण्यात आला. याच बरोबर महाराष्ट्र चेस असोसिएशनतर्फे घेतलेल्या प्रशिक्षक परीक्षेत यश मिळवलेल्या अभिजित बावळे, अनिता बावळे आणि कार्नाक्षी जाधव यांना गौरविण्यात आले. या नव्या प्रशिक्षकांनी बुद्धिबळ प्रचार आणि प्रोत्साहनासाठी काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी तालुक्यात बुद्धिबळ खेळाला अधिक व्यापक स्वरूप देण्याचा आणि नवोदित खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष उपक्रम राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. याप्रसंगी संजय राऊत, श्री. सरतापे, संग्राम भांगे, राम गाडे, प्रभावती लंगोटे आदी उपस्थित होते.



### मि. इंडिया स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात लोणारची निवड

**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

जिल्हा बॉडी बिल्डिंग अँड फिटनेस फेडरेशनच्या पंचाक्षरी लोणार याची बेळगाव येथे होणाऱ्या मि इंडिया स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली. पुणे येथील चाचणीतून त्याची निवड झाली. लोणार मॅक्सिमम् जिमचा खेळाडू असून त्याला अन्वर शेख याचे मार्गदर्शन लाभले.

मागील वर्षी लोणार मि इंडिया च्या ७० कि गटाचा विजेता होता. त्याला संघटनेचे अध्यक्ष संतोष पवार, सरचिटणीस विशाल गायकवाड कार्याध्यक्ष अनिलदादा जाधव, उपाध्यक्ष रवींद्र पाटील, संजय हिरेमठ, शासिकांत अक्कलवाडे, अविनाश गंजे, सहसचिव आतिक नदाफ यांनी शुभेच्छा दिल्या.




# राज्य कराटे स्पर्धेत लिटिल फ्लॉवर कॉन्व्हेंट स्कूलची उल्लेखनीय कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

वर्ल्ड जापनीज शोतोकान कराटे ऑर्गनायझेशन तर्फे पार पडलेल्या राज्य कराटे स्पर्धेत लिटिल फ्लॉवर कॉन्व्हेंट स्कूलच्या विदयार्थ्यांनी आपआपल्या वजनी व वयोगटात ३ रौप्य व १४ कांस्य अशी १७ पदके पटकाविली.

सर्व विजेत्या स्पर्धकांची जानेवारी २०२५ मध्ये होणाऱ्या राष्ट्रीय कराटे स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सर्वांचे प्रिन्सिपल सिस्टर सेलिन यांनी अभिनंदन केले आहे व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.सर्वांना शाळेच्या कराटे प्रशिक्षिका/ आंतरराष्ट्रीय पंच शिहान अनुराधा महादेव थोरात (ब्लॅक बेल्ट फिफ्थ डिग्री) यांचे मार्गदर्शन लाभले.

**काता व कुमिते प्रकारात विजयी स्पर्धक असे**

अदनान शेख (रौप्य, कांस्य) अथर्व खुणे (रौप्य, कांस्य) दिलनवाज पठाण (रौप्य) विश्वराज गरड (कांस्य) मयांक चौधरी (कांस्य) कौस्तुभ आडम (२ कांस्य) शालिनी योहान (२ कांस्य ) प्रथमेश चौधरी (कांस्य) सच्चीदानंद येलदी (कांस्य,कांस्य) माहेविश शेख (कांस्य) सेजल कोरे (कांस्य) शिवप्रिया येलदी (कांस्य)



प्रा. डॉ. चंद्रजित जाधव | सचिन गोडबोले | ॲड. गोविंद शर्मा | प्रशांत पाटणकर | लिमा लुईस

# महाराष्ट्राच्या खो-खो संघटनेचा जागतिक स्तरावर सन्मान

## प्रा. डॉ. चंद्रजित जाधव स्पर्धा व्यवस्थापक : १० तांत्रिक अधिकाऱ्यांची खो-खो विश्वचषकासाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**नवी दिल्ली, दि.४ जानेवारी-**

महाराष्ट्र खो-खो संघटनेच्या दहा सदस्यांची खो-खो महासंघाने पहिल्या खो-खो विश्वचषकासाठी आंतरराष्ट्रीय तांत्रिक अधिकारी म्हणून निवड केली आहे. ही प्रतिष्ठित स्पर्धा १३ ते १९ जानेवारी दरम्यान नवी दिल्ली येथे इंदिरा गांधी इंडोर स्टेडियमवर होणार आहे.

भारतीय खो-खो महासंघाने अधिकृत पत्राद्वारे महाराष्ट्र संघटनेला ही माहिती कळवली. या निवडीमुळे महाराष्ट्रातील खेळाडू व अधिकाऱ्यांसाठी अभिमानाचा क्षण असल्याचे महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे महासचिव प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव यांनी सांगितले. अखिल गोवा खो-खो असोसिएशनचे उपाध्यक्ष लिमा लुईस यांची सुध्दा (आंतरराष्ट्रीय तांत्रिक अधिकारी) म्हणून निवड झाली आहे. त्यांनी या आधी सुध्दा ढाका, बांगला देश येथे झालेल्या स्पर्धेत आंतरराष्ट्रीय पंच म्हणून काम पहिले आहे.

**निवडले तांत्रिक अधिकारी याप्रमाणे**

प्रा. डॉ. चंद्रजित जाधव (स्पर्धा व्यवस्थापक/ आंतरराष्ट्रीय तांत्रिक अधिकारी), प्रशांत पाटणकर (सह-आयोजक/आंतरराष्ट्रीय तांत्रिक अधिकारी), सचिन गोडबोले, गोविंद शर्मा, संदीप तावडे, सुरेंद्र विश्वकर्मा, किरण वाघ, रफीक शेख, किशोर पाटील, आणि संदेश आम्रे (आंतरराष्ट्रीय तांत्रिक अधिकारी).

**खो-खो महासंघाचे आवाहन**

भारतीय खो-खो महासंघाचे महासचिव एम. एस. त्यागी यांनी महाराष्ट्र संघटनेला निवड झालेल्या अधिकाऱ्यांना दिल्ली येथे पाठवण्याचे आवाहन केले आहे, जेणेकरून हे अधिकारी स्पर्धेच्या यशस्वी आयोजनात मोलाचे योगदान देऊ शकतील. महाराष्ट्र खो-खो संघटनेसाठी ही निवड म्हणजे खेळाच्या वाढत्या ग्लोबल मान्यतेचे प्रतीक आहे आणि भविष्यातील खेळाडूंना प्रेरणा देणारी ठरेल.

# नॅशनल गेमच्या निवड चाचणीसाठी सोलापूरच्या ७ खो-खो खेळाडूंची निवड



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जानेवारी -**

धाराशिव येथे रविवार ५ जानेवारी रोजी होणाऱ्या नॅशनल गेम्सच्या निवड चाचणीसाठी सोलापूर जिल्ह्यातून ४ पुरुष व २ महिला खो-खो खेळाडूंची निवड करण्यात आली.

जिल्हा खो-खो निवड चाचणी उत्कर्ष क्रीडा मंडळाच्या वतीने ह. दे. प्रशालेच्या मैदानावर झाली. यात ३० खेळाडूंनी भाग घेतला होता. यातून निवड समिती सदस्य श्रीरंग बनसोडे, उमाकांत गायकवाड व अतुल जाधव यांनी निवड केली.

निवड झालेल्या खेळाडूंना सोलापूर ॲम्युचर खोखो असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर व सचिव ए. बी. संगवे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

**निवडलेले खेळाडू पुरुष:** रामजी कश्यप, कृष्णा बनसोडे (अर्धनारी नटेश्वर क्रीडा मंडळ, वेळापूर), सौरभ चव्हाण (किरण स्पोर्टस क्लब, सोलापूर), जुबेर शेख (उत्कर्ष क्रीडा मंडळ, सोलापूर). **महिला** : स्नेहा लामकाने (कल्याणराव काळे स्पोर्ट्स क्लब, वाडीकुरोली पंढरपूर , सादिया मुल्ला(किरण स्पोर्टस क्लब, सोलापूर).

सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | रविवार, ५ जानेवारी २०२५

# सोशल मीडियाच्या वापरासाठी मुलांना पालकांची संमती अनिवार्य

**केंद्र सरकारच्या मसुद्यात तरतूद ● डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन ॲक्टमध्ये सुधारणा करणार**

◆ **नवी दिल्ली, ४ जानेवारी**

केंद्र सरकार डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन ॲक्ट, २०२३ मध्ये सुधारणा करणार आहे. त्यासाठी मसुदा तयार करण्यात आला आहे. नव्या तरतुदीनुसार १८ वर्षांखालील अल्पवयीन मुलांना सोशल मीडियाच्या वापरासाठी पालकांची संमती अनिवार्य राहणार आहे. याशिवाय सोशल मीडिया कंपन्यांना नागरिकांचा वैयक्तिक डेटा भारताबाहेर नेण्यासाठी सरकारची परवानगी घ्यावी लागेल. मसुद्यातील तरतुदीवर भारतीय नागरिकांना ६० दिवसांत हरकती किंवा सूचना नोंदविता येणार आहे.

केंद्र सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार, अल्पवयीन मुलांमध्येही सोशल मीडियाचा वापर वाढल्यामुळे त्याचे दुष्परिणाम दिसून येत आहे. लहान मुले पालकांच्या नकळत सोशल मीडिया वापरत



असल्यामुळे यातून अनेक गुन्हे घडल्याचे समोर आले. यावर प्रतिबंध घालण्याची तयारी सरकारने सुरू केली. १८ वर्षांखालील अल्पवयीन मुलांना सोशल मीडियावर अकाऊंट उघडत असताना पालकांची संमती घेणे अनिवार्य असणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

## मसुद्यातील तरतुदी

- सोशल मीडियावर अकाऊंट उघडण्यासाठी मुलांना सरकारने जारी केलेले पालकांचे ओळखपत्र किंवा डिजिटल लॉकर्सशी जोडले गेलेले डिजिटल ओळखपत्र अपलोड करावे लागेल
- मुलांच्या डेटाला संरक्षित करण्याबरोबरच या मसुद्यातील नियमांमध्ये ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण करण्याचीही बाब नमूद आहे
- वापरकर्त्यांना त्यांचा डेटा डिलिट करता यावा आणि डेटा का गोळा केला जात आहे, याबाबतची माहिती कंपन्यांकडून देण्याची तरतूद आहे
- नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कंपन्यांना २५० कोटी रुपयांपर्यंत दंडाचा प्रस्ताव
- डेटा गोळा करण्याच्या प्रक्रियेला आव्हान देण्याचा आणि डेटा वापराचे स्पष्टीकरण मागण्याचा ग्राहकांना अधिकार
- मसुद्यात ई-कॉमर्स, ऑनलाईन गेमिंग आणि सोशल मीडिया कंपन्यांची वेगवेगळी व्याख्या करीत प्रत्येकासाठी वेगळी नियमावली

# नोएल टाटा यांनी घेतली देवेंद्र फडणवीसांची भेट

◆ **मुंबई, ४ जानेवारी**

राज्याच्या आर्थिक विकासाचा वेग वाढवण्यासाठी टाटा ट्रस्ट आणि महाराष्ट्र सरकारमधील सहकार्याबाबत चर्चा करण्यासाठी टाटा ट्रस्टचे अध्यक्ष नोएल टाटा यांनी शनिवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली.

मुख्यमंत्री निवासस्थानी झालेल्या या बैठकीची माहिती फडणवीस यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये दिली. आम्ही टाटा ट्रस्टसोबत विविध प्रकल्पांवर चर्चा केली. राज्याच्या विकासाचा वेग वाढवण्यासाठी टाटा ट्रस्ट आणि महाराष्ट्र सरकार एकत्र येऊ शकतात, असे फडणवीस यांनी एक्सवर म्हटले आहे. टाटा ट्रस्ट आणि राज्य सरकार यांच्यातील मजबूत आणि चिरस्थायी भागीदारी वाढवण्याबद्दल विश्वास व्यक्त केल्याबद्दल फडणवीस यांनी टाटा यांचे आभार मानले.



रतन टाटा यांचे निधन झाल्यावर ९ ऑक्टोबर २०२४ रोजी नोएल टाटा यांनी टाटा ट्रस्टचे अध्यक्षपद स्वीकारले. टाटा ट्रस्टची टाटा सन्समध्ये ६६ टक्के हिस्सेदारी आहे. मिठापासून ते सॉफ्टवेअरपर्यंत बनवणाऱ्या टाटा समूहाची ती होल्डिंग कंपनी आहे. ◂(वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### वीज बिल थकवणाऱ्यांचे बंदूक परवाने रद्द

**मोरेना :** मध्यप्रदेशातील मोरेना जिल्ह्यातील प्रशासनाने वीज बिल थकवल्याबद्दल ५९ जणांचे बंदूक परवाने रद्द करण्यात आले आहेत, अशी माहिती अधिकाऱ्याने दिली. प्रशासनाच्या मते, थकबाकी भरण्यासाठी अधिकारी त्यांच्याशी संपर्क साधत असताना त्यांनी बंदुकीचा धाक दाखवून दबाव निर्माण केला. यात ५९ जणांचे बंदुकीचे परवाने रद्द करण्यात आले, असे जिल्हाधिकारी अंकित अस्थाना यांनी सांगितले. प्रशासन थकबाकीदारांवर कारवाई सुरूच ठेवणार असल्याचे अस्थाना म्हणाले.

### ट्रकच्या धडकेत चार ठार, चार जखमी

**हिसार :** हरयाणामधील हिसार जिल्ह्यात हिसार-चंडीगड राष्ट्रीय महामार्गावर उकलाना येथे शनिवारी सकाळी कार अपघात झाला. तथापि, अपघातग्रस्तांना मदत करण्यासाठी आलेल्या जमावाला भरधाव ट्रकने चिरडले. यात चार नागरिकांचा जागीच मत्यू झाला, तर जार जण जखमी आहे. एका पोलिस अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, धुक्यामुळे रस्त्याचा अंदाज न आल्याने एक कार सुरेवाला चौकात दुभाजकावर आदळली आणि उलटली. त्यामुळे मागाहून येणाऱ्या गाडीलाही अपघात झाला. अपघातग्रस्तांना मदत करण्यासाठी स्थानिक नागरिकांनी घटनास्थळाकडे धाव घेतली. त्याचवेळी आलेला भरधाव ट्रक जमलेल्या नागरिकांना चिरडत पुढे निघून गेला. यात चार ठार तर चार जण जखमी झाले. रस्त्याच्या बाजूला ट्रक उभा करून चालक पसार झाला.

### भरधाव कारच्या धडकेत दोन पादचाऱ्यांचा मृत्यू

**जबलपूर :** मध्यप्रदेशातील जबलपूर शहरात भरधाव कारने धडक दिल्याने दोन पादचाऱ्यांचा मृत्यू झाला. शुक्रवारी रात्री दहाच्या सुमारास विजय नगर परिसरात हा अपघात झाला. यात दोन पादचाऱ्यांचा मृत्यू झाला, तर चार जण जखमी झाले असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

### खाद्य बाजाराला लागलेल्या आगीत ८ ठार

**बीजिंग :** उत्तर चीनमधील अन्न बाजाराला लागलेल्या आगीत आठ जणांचा मृत्यू आणि १५ जण जखमी झाले. झांगजियाकौ शहरातील लिगुआंग मार्केटमध्ये शनिवारी मध्यरात्री ही आग लागली.

### बेकायदेशीर वास्तव्य करणारे ५ बांगलादेशी हद्दपार

**नवी दिल्ली :** दिल्लीत बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्या महिला आणि दोन मुलांसह ५ बांगलादेशी नागरिकांना हद्दपार करण्यात आले. पोलिसांनी अनधिकृत वसाहती, झोपडपट्ट्या आणि कामगार शिबिरांना लक्ष्य केले. पोलिसांच्या छापेमारीत पाच जणांना अटक करण्यात आली. हे सर्व बांगलादेशी बागेरहाट जिल्ह्यातील आहेत. चौकशीत या लोकांनी भारतात अवैधरीत्या प्रवेश केल्याची कबुली दिली.

### डिटेन्शन सेंटरमधून तीन रोहिंग्यांचे पलायन

**गोलपारा :** आसाम पोलिसांनी गोलपारा जिल्ह्यातील डिटेन्शन सेंटरमधून पळून गेलेल्या तीन संशयित रोहिंग्यांना पकडण्यासाठी शोधमोहीम सुरू केली, असे एका अधिकाऱ्याने शनिवारी सांगितले. या तिघांनी अंधाराचा फायदा घेत गुरुवारी रात्री माटिया येथील डिटेन्शन सेंटरच्या भिंतीवरून उडी मारून पलायन केले होते. अधिकारी हजेरी घेत असताना शुक्रवारी ते पळून गेल्याचे उघडकीस आले. बोदी आलम, मुस्तफा कमाल आणि अब्दुल कादर अशी पळून गेलेल्यांची नावे आहेत. पोलिस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था) अखिलेश सिंह यांनी शनिवारी डिटेन्शन सेंटरला भेट देऊन घटनेची चौकशी केली.

### सराफा

| | |
|---|---|
| **सोने** (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | ७८,७१० रु. |
| **चांदी** (प्रतिकिलो) | ९१,५०० रु. |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३४.२ | १३.६ |
| अमरावती | ३२.६ | ११.१ |
| भंडारा | २९.८ | १४.४ |
| बुलडाणा | ३०.८ | १३.४ |
| चंद्रपूर | ३०.६ | -.- |
| गडचिरोली | ३०.२ | १०.६ |
| गोंदिया | २९.८ | ९.५ |
| नागपूर | ३१.६ | ९.० |
| वर्धा | ३१.४ | ११.० |
| वाशीम | ३१.८ | १५.६ |
| यवतमाळ | ३१.० | ११.५ |

# बोकारो नक्षल हल्ला प्रकरणी एनआयएची छापेमारी

**नवी दिल्ली :** फेब्रुवारी २०२४ मध्ये सुरक्षा दलांवर नक्षलवाद्यांनी केलेल्या हल्ल्याच्या प्रकरणात राष्ट्रीय तपास संस्था अर्थात् एनआयएने झारखंडमधील बोकारो जिल्ह्यातील विविध ठाकाणांवर शनिवारी छापेमारी केली, अशी माहिती अधिकृत निवेदनात देण्यात आली. एनआयएच्या पथकांनी आठ ठिकाणी छापेमारी केली. यात सिमकार्ड, पॉकेट डायरी आणि गुन्हेगारी दस्तावेजांसह लॅपटॉप, मोबाईल फोन आणि मेमरी कार्ड यासारखी डिजिटल उपकरणे जप्त केली. ज्या परिसराची झडती घेण्यात आली, ते प्रतिबंधित सीपीआयच्या (माओवादी) सदस्यांशी संबंधित होते. ते वाहतुकीची सुविधा उपलब्ध करून देत होते तसेच खंडणीच्या पैशांची उधळपट्टी करीत होते, असे एनआयएने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. ◂(वृत्तसंस्था)

# नांदेड बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्व आरोपी निर्दोष

**१९ वर्षांनी निकाल; सीबीआयला धक्का**

◆ **नांदेड, ४ जानेवारी**

६ एप्रिल २००६ रोजी नांदेडच्या पाटबंधारे नगर इथे राजकोंडवार यांच्या घरी मोठा स्फोट झाला होता. या प्रकरणी १३ जणांविरोधात खटला दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा निकाल तब्बल १९ वर्षांनी लागला असून, सर्व १३ आरोपींची नांदेड न्यायालयाने शनिवारी निर्दोष मुक्तता केली. नांदेड न्यायालयाच्या या निर्णयाने सीबीआयला मोठा धक्का बसला आहे.

या स्फोटात नरेश राजकोंडवार आणि हिमांशू पानसे यांचा जागीच मृत्यू, तर अन्य तिघे जखमी झाले होते. हा स्फोट बॉम्बचा होता, असा आरोप करीत 'हिंदू दहशतवाद' हा शब्दप्रयोग करण्यात आला. या प्रकरणात एकूण १३ आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये खटला दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचा तपास सुरुवातीला नांदेड पोलिस, एटीएस आणि त्यानंतर सीबीआयने केला. यातील काही आरोपींना जालना, परभणी आणि मालेगावातील स्फोट प्रकरणातही आरोपी करण्यात आले होते. १९ वर्षांत या खटल्यात एकूण ४९ साक्षीदार तपासण्यात आले. अखेर शनिवारी नांदेड न्यायालयाने सर्व आरोपींना निर्दोष मुक्त केले.

हा स्फोट कथितपणे बॉम्बस्फोट बनवण्याच्या प्रक्रियेत झाला होता, ज्यात बजरंग दलाशी संबंधित लक्ष्मण राज कोंडवार यांचा मुलगा नरेश कोंडवार आणि त्याचा साथीदार हिमांशू पांसे ठार झाले. या घटनेत आणखी चार जण जखमी झाले होते, ज्यात मारुती केशव वाघ, योगेश देशपांडे, गुरू राज टोपटीवार आणि राहुल पांडे यांचा समावेश आहे.

सुरुवातीला हा फटाक्यांचा स्फोट असल्याचे सांगून प्रकरण दडपण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप होता.

परंतु, दुसऱ्या दिवशी घराची झडती घेताना जिवंत बॉम्ब सापडल्यानंतर पोलिस आणि तपास यंत्रणांनी याला बॉम्बस्फोट मानले. आरोपींच्या घरातून मुस्लिम पोशाख, खोट्या दाढ्या आणि टोप्या सापडल्याचा दावा तपास यंत्रणेने केला होता. या प्रकरणाची सुरुवातीची चौकशी स्थानिक पोलिसांनी केली, त्यानंतर प्रकरण एटीएसकडे सुपूर्द करण्यात आला होता. ◂(वृत्तसंस्था)

# कुपोषण मुक्तीसाठी विशेष उपक्रम राबवा : मुख्यमंत्री

◆ **मुंबई, ४ जानेवारी**

राज्याच्या ग्रामीण भागासोबतच शहरी भागातील विशेषत: मुंबई महानगरातील झोपडपट्टी परिसरात कुपोषण मुक्तीची मोहीम प्रभावीपणे राबविण्यात यावी, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे महिला व बालविकास विभागाला दिल्या.

सह्याद्री अतिथीगृह येथे महिला व बालविकास विभागाच्या पुढील १०० दिवसांत करावयाच्या कामांचा मुख्यमंत्री फडणवीस यांनी आढावा घेतला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री मंगलप्रभात लोढा, आदिती तटकरे, डॉ. पंकज भोयर, योगेश कदम, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ. श्रीकर परदेशी, महिला व बालविकास विभागाचे सचिव डॉ. अनुप कुमार यादव आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, महिला व बालविकास विभागाने स्थानिक स्वराज्य संस्थांसोबत समन्वय साधून शहरातील झोपडपट्टी परिसरात कुपोषण मुक्तीच्या योजना राबवाव्यात. महिला व बालकांसाठी राबविण्यात येत असलेल्या योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत आराखडा तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी तसेच अंगणवाडी केंद्रातील शौचालये स्वच्छ ठेवणे, त्यांना पिण्याचे स्वच्छ पाणी उपलब्ध करून देणे, नागरी बाल विकास केंद्र तातडीने सुरू करण्यावर भर द्यावा. ◂(तभा वृत्तसेवा)

## सायबर सुरक्षा प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करा

महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प सुरू करण्यात आला असून, त्याची अंमलबजावणी पूर्ण क्षमतेने करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

सह्याद्री अतिथीगृह येथे गृह विभागाच्या पुढील १०० दिवस आराखड्याच्या अनुषंगाने फडणवीस यांनी आढावा घेतला. सायबर सुरक्षा प्रकल्पांतर्गत आर्टिफिशियल इंटेलिजन्स आधारित गव्हर्नन्स, रिस्क व कंम्प्लायन्स करण्यात यावे, अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सकरिता नवीन पदे निर्माण करावी, नक्षलविरोधी उपक्रमांमध्ये नक्षल प्रभावित जिल्ह्यांमध्ये नवीन सशस्त्र चौक्या उभारण्याच्या कामाला गती द्यावी तसेच केंद्र सरकारच्या धर्तीवर महाराष्ट्र कारागृह नियमावलीचे प्रारुप तयार करण्यात यावे, अशा सूचना फडणवीस यांनी केल्या. न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाच्या अधिनस्त सर्व प्रयोगशाळांचे संगणकीकरण करणे सुरू आहे. पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले आहे. यात मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक या पाच प्रयोग शाळांचे संगणकीकरण तसेच प्रादेशिक न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा येथे प्रकल्पाचे डाटा सेंटर उभारण्यात आले आहे, अशी माहिती गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इक्बाल सिंग चहल यांनी दिली. यावर अमरावती, कोल्हापूर, नांदेड, ठाणे, धुळे, सोलापूर, रत्नागिरी, चंद्रपूर या प्रयोगशाळांचे संगणकीकरण करावे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

# दर्शनासाठी शुल्क घेऊन भाविकाची फसवणूक करणाऱ्या व्यक्तीवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ४ जानेवारी-**

पंढरपुरात दर्शनासाठी कुणाल दिपक घरत (रा. बिलाल पाडा, नाला सोपार पूर्व, ता. वसई, जि. पालघर) हे शुक्रवारी आपल्या कुंटुंबासह सकाळी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात आले होते. त्यावेळी त्यांच्याकडून दर्शनासाठी शुल्क म्हणून ११,000 रुपये घेऊन भाविकाची फसवणूक करणाऱ्या व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.



संबंधित भाविक हे लवकर दर्शन घेणे कामी मंदिर परिसरात विचारपूस करीत असताना, मंदिरा जवळ उभा राहिलेल्या लोकांनी देवाचे दर्शन होण्याकरीता किमान ७-८ तास लागतील असे सांगितले, दर्शनाकरीता पास मिळतो अगर कसे याबाबत चौकशी करीत असताना, चिंतामणी ऊर्फ मुकुंद मोहन उत्पात, पंढरपूर या इसमाने मी मंदिरात पुजारी आहे, तुमचे देवाचे दर्शन रांगेत न थांबता लवकरात लवकर घडवुन आणतो असे सांगून पैसे द्यावे लागतील, ५00१ रूपये ची मंदिर समितीची पावती देतो व ६000 रूपये मला वर द्यावे लागतात असे सांगून रोख रक्कम रुपये ११,000 स्वीकारले. त्यानंतर तुकाराम भवन येथील देणगी कार्यालयात जावून ५00१ रूपयेची भाविकाच्या नावे देणगी पावती करून, संबंधित भाविकाला दिली. त्यानंतर मंदिराच्या उत्तर दरवाजातून प्रवेश करीत असताना तेथील पोलीस अधिकारी सपोनि नितीन घोळकर यांनी चौकशी केली असता, देवदर्शन करून देण्याच्या नावाने आर्थिक फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी संबंधित उत्पात नावाच्या इसमावर पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात कलम ३१८ (३)(४) अन्वये गुन्हा नोंद केला आहे.




# आईमुळे माझ्या लिखाणात संवेदनशीलता आली : समीर गायकवाड

**गायकवाड यांच्या 'गौहर आणि गवाक्ष' या पुस्तकाचे प्रकाशन व प्रकट मुलाखत**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

प्रिसिजन वाचन अभियान कार्यक्रमात शनिवारी, 0४ जानेवारी २०२५ रोजी लेखक समीर गायकवाड यांच्या "गौहर आणि गवाक्ष या पुस्तकाचे डॉ सुहासिनी शहा यांच्या हस्ते प्रकाशन झाले. या पुस्तक प्रकाशन सोहळ्यानंतर लेखक समीर गायकवाड यांची माधव देशपांडे यांनी प्रकट मुलाखत घेतली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी समीर गायकवाड लिखित झांबळ आणि खुलूस या पुस्तकांचे अभिवाचन संदिप जाधव आणि आर जे अमृत ढगे यांनी केले. अभिवाचनानंतर पुस्तक प्रकाशन कार्यक्रम संपन्न झाला. सर्व मान्यवरांचे स्वागत डॉ सुहासिनी शहा यांच्या हस्ते झाले. त्यावेळी फाउंडेशनच्या संचलिका स्नेहा सावे व सौ सविता समीर गायकवाड उवस्थित होत्या.

डॉ सुहासिनी शहा या पुस्तकाचे प्रकाशन प्रसंगी बोलताना म्हणाल्या कि, अतिशय मनाला भिडणारं लेखन समीर गायकवाड यांनी केल आहे. ह्या दोन पुस्तकांचं प्रकाशन प्रिसिजन वाचन अभियानात होत आहे हे प्रिसिजन आणि सोलापूरकरांसाठी अभिमानाची गोष्ट आहे.

पुस्तक प्रकाशन कार्यक्रमानंतर लेखक समीर गायकवाड यांची प्रकट मुलाखत माधव देशपांडे यांनी घेतली. "झांबळ आणि खुलूस" या पुस्तकाविषयी बोलताना त्यांनी सांगितले कि माझ्या लिखानात संवेदनशीलता आली ती माझ्या आईमुळे, आईला झालेल्या त्रासातून, तिने केलेल्या संघर्षातून ही संवेदनशीलता आली.

पुढे बोलताना त्यांनी त्यांच्या लेखानाबद्दल सांगितले, सोलापूरपासून मुंबईमधील कामठीपुरा वैश्यावस्तीत पर्यंत कसे लेखन झाले याबद्दल त्यांनी सांगितले. सोलापूरमधील तरटी नाका परिसरात मेडिकल चालवत असताना ओळख झालेल्या एका मुलीच्या शोधातून ह्या लिखाणाचा प्रवास सुरु झाला. वैश्याव्यवसाय या विषयात खुलेपणाने कोणी बोलत नाही पण त्याबद्दल लिहणं हे खूप जिकिरीच होत. लिखाणाच्या निमित्ताने रेडलाईट भागात फिरत असताना अशा अनेक घटना होत्या कि ज्याबद्दल पोलिसांना सांगिल्यावर पोलिसांनी खूपवेळी मदत करून मुलींना वाचविण्यात यश आले आहे. दिल्ली, महाराष्ट्र, कर्नाटक अशा ठिकाणी पोलिसांना माहिती देऊन अनेक मुलींना या सर्व व्यवसायातून बाहेर काढण्यात मदत झाली.

पुस्तक लिहणायाची प्रेरणा ही वेगवेगळ्या वाचनातून आली आहे. चार पैकी आम्ही तीन भांवड लेखक आहोत त्याच्या मागची प्रेरणा ही पुस्तक वाचन आहे. झांबळ आणि गौहर हे पुस्तकामुळे सामान्य माणसाला अनभिज्ञ आसणाऱ्या विषयाचं वाचन करून अनुभवता आलं. हा सर्व संवाद ऐकताना प्रेक्षकांच्या अंगावर अक्षरशः शहारे उभे राहिले. या मुलाखती दरम्यान लेखकांचे संवाद ऐकताना अनेक रसिक प्रेक्षकांच्या डोळ्यांच्या कडा ओल्या झालेल्या दिसल्या.

माझा वाचन प्रवास या उपक्रमांतर्गत प्रा. डॉ प्रदीप जगताप यांनी त्यांचा वाचन प्रवास मांडला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन माधव देशपांडे यांनी व्यक्त केले.






# व्यक्तिमत्व विकासासाठी सखोल वाचन करा : केतन जैन

**सेवाभारती सोलापूरच्या निवासी शिबिरास प्रारंभ**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

विद्यार्थी दशेतच सखोल वाचन केले तर व्यक्तिमत्व विकास होतो. मुलांनी इंटरनेट मोबाईलच्या अती वापरापेक्षा वाचन करून बुद्धीमत्ता वाढवावी असे प्रतिपादन उद्योजक केतन जैन यांनी केले.

सेवाभरती सोलापूर जिल्ह्याच्या वतीने फिरती विज्ञान प्रयोग शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी निवासी व्यक्तिमत्त्व विकास शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी जैन बोलत होते. यावेळी सेवाभारती चे जिल्हा अध्यक्ष राजेश पवार, जिल्हा सचिव बाबूलाल वर्मा, सहसचिव रंगनाथ जोशी, उपाध्यक्ष वर्षा भावार्थी, प्रकल्प प्रमुख धोंडू केंगले, शिबिराधिकारी शैलजा मुरूमकर, मुख्याध्यापक पुंडलिक कलखंबकर, प्रकल्पाचे शिक्षक महादेव सोनगी उपस्थित होते. याप्रसंगी राजेश पवार यांनी मुलांना यशस्वी होण्यासाठी कष्टाशिवाय पर्याय नाही. नियमित अभ्यास व्यायाम व गुरुजनांचा आदर यामुळेच सर्वांगीण विकास होणार आहे. त्यामुळे मुलांनी अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे असे सांगितले.

एस आर पी कॅम्प गट नंबर १0 मध्ये तीन दिवसीय कार्यशाळेत कार्यानुभव, पाठांतर, मनोरंजन व सांस्कृतिक कार्यक्रम, सूर्यनमस्कार, योगासने, अग्निहोत्र, आनंददायी शिक्षण, पर्यावरण योग व निसर्गोपचार, भारतमाता पूजन आदी उपक्रम होणार आहेत उत्तर सोलापूर तालुक्यातून सुमारे दोनशे विद्यार्थ्यांनी या शिबिरात सहभाग नोंदवला आहे. कवठे, पाथरी, अकोले मंद्रूप, मनपा शाळा क्रमांक सहा, मनपा मुलींची कॅम्प शाळा येथील फिरत्या विज्ञान प्रयोगशाळेच्या विद्यार्थ्यांचा यामध्ये सहभाग आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप सिंह ठाकुर यांनी केले तर प्रास्ताविक प्रकल्प प्रमुख धोंडू केंगले यांनी केले. आभार सह प्रकल्प प्रमुख ज्ञानेश्वर लवटे यांनी मानले. यावेळी मुख्याध्यापक हिंगोली सर, बंडगर सर, कांबळे सर, सामल सर, गंगाधर कांबळे सर, कादरी सर, मराठी मॅडम, लोंढे मॅडम व उमेश युवतानी सर उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## प्रासंगिक

डॉ. भालचंद्र हरदास

# स तीर्थराजो जयति प्रयागः...

**ग्रहाणां च यथा सूर्यो नक्षत्राणां यथा शशी ।**
**तीर्थानामुत्तमं तीर्थं प्रयागाख्यमनुत्तमम् ॥**

ज्या प्रमाणे ग्रहांमध्ये सूर्य आणि चंद्र श्रेष्ठ आहेत, त्याप्रमाणे तीर्थांमध्ये प्रयागराज सर्वोत्तम तीर्थ आहे. ज्याप्रमाणे सनातन धर्म अनादिअनंत आहे, त्याप्रमाणे प्रयागराज क्षेत्राचा महिमा अपरंपार आहे. उत्कृष्ट यज्ञ आणि दान धर्म संपन्नता पाहून भगवान विष्णू आणि भगवान शिव शंकर आदी देवतांनी या तीर्थाचे नामकरण 'प्रयागराज' केले, असा उल्लेख अनेक पुराणात आला आहे.

**प्रकृष्टं सर्वयोगभ्यः प्रयागमिति गीयते।**
**दृष्ट्वा प्रकृष्टयागेभ्यः पुष्टेभ्यो दक्षिणादिभिः।**
**प्रयागमिति तन्नाम कृतं हरिहरादिभिः॥**

भारताला विश्वाचे आत्मतत्त्व आणि तीर्थराज प्रयागराज या क्षेत्राला भारताचे प्राणतत्त्व म्हटले गेले आहे. अरण्य आणि सरिता यांच्या संस्कृतीमध्ये जन्म घेतलेले हजारो-लाखो ऋषी, मुनी, तत्त्वज्ञ, दार्शनिक, ब्रह्मवेत्ते तपस्वी यांची तपोभूमीसह पंचतत्त्वाला पल्लवित करणाऱ्या तीर्थराज प्रयागराज पुण्यक्षेत्रावर शतकानुशतके कुंभ, अर्धकुंभ, महाकुंभ, पूर्णकुंभ आणि माघ मेळा आयोजित होत असतो. गंगा, यमुना आणि सरस्वती यांच्या त्रिवेणी संगमावर स्नान करून भारताच्या प्राणशक्तीचा हुंकार कुंभमेळ्यातून निनादतो. कुंभमेळा सनातन वैदिक हिंदू धर्मातील महापर्व आहे. जगातील सर्वांत मोठ्या उत्सवात लाखो-करोडो श्रद्धाळू भाविक हरिद्वार, प्रयागराज, उज्जैन आणि नाशिक येथे कुंभस्नान करण्यासाठी ठरावीक वर्षांनी एकत्र येतात. यासोबतच कुंभ पर्वाचे आयोजन चार ठिकाणी म्हणजेच पहिला कुंभ हरिद्वार येथे, त्यानंतर तीन वर्षांनी दुसरा कुंभ प्रयागराज येथे, त्यानंतर तिसरा कुंभ तीन वर्षांनी उज्जैन येथे आणि चौथा कुंभ तीन वर्षांनी नाशिक येथे होतो. क्रमशः चार कुंभ झाल्यावर म्हणजेच १२ वर्षांनी महाकुंभ प्रयागराज येथे साजरा केला जातो. यासोबतच हरिद्वार आणि प्रयागराज येथे दोन कुंभांच्या मध्ये म्हणजे प्रत्येकी सहा वर्षांनंतर 'अर्धकुंभ' आयोजित करण्यात येतो. प्रत्येक १२ वर्षांनंतर महाकुंभ म्हणजेच पूर्ण कुंभाचे आयोजन केले जाते. पूर्णकुंभ किंवा महाकुंभ केवळ तीर्थराज प्रयाग येथेच होतो. असे १२ महाकुंभ झाले की त्यानंतर येणाऱ्या कुंभाला 'पूर्णकुंभ' म्हणतात. म्हणजेच यंदाचा कुंभ हा १४४ वर्षांनंतर येणारा पूर्णकुंभ असून पृथ्वीवरील मनुष्याच्या जीवनातील पहिला आणि शेवटचाच पूर्णकुंभ असणार आहे.

### कुंभाचा पौराणिक इतिहास

दर १२ वर्षांनी हरिद्वार, प्रयागराज, उज्जैन आणि नाशिक येथेच महाकुंभ का आयोजित केला जातो? लाखो-करोडो हिंदू भाविक, नागा साधू, संन्यासी आणि साधू-संत कुंभ महापर्वात स्नान करण्यासाठी का येतात? खरं तर कुंभपर्व पृथ्वीवरील सर्वांत मोठे धार्मिक आयोजन आहे. हा असा एक सामाजिक उत्सव आहे, ज्याचे कितीही वर्णन केले तरी जोपर्यंत आपण याचि देही याचि डोळा त्यात प्रत्यक्ष सहभागी होत नाही, तोपर्यंत कुंभातील हर्षोल्लास, तपोनिष्ठ ऋषी-मुनी आणि तेथील पवित्र वातावरण याचा केवळ अंदाज बांधू शकतो. असे म्हणतात की, कलियुगात कुंभमेळ्यात जाऊन पवित्र जलात स्नान केल्याने मोक्षदायिनी अलकनंदा मुमुक्षु साधकांवर प्रसन्न होते. महाकुंभ आयोजनाचा संबंध पुराणातील समुद्रमंथनासोबत आहे. कथेनुसार महर्षी दुर्वास यांच्या शापाने जेव्हा इंद्र आणि देवता शक्तिहीन झाले तेव्हा दानवांनी देवतांवर आक्रमण करून त्यांना पराजित केले. या घटनेनंतर समस्त देवता भगवान विष्णूजवळ पोहोचले. सगळा वृत्तांत कथन केल्यानंतर श्रीहरी विष्णूने देव आणि दैत्य यांना मिळून क्षीरसागराचे मंथन करून त्यातून अमृत काढण्याचा सल्ला दिला. श्रीहरी विष्णूंच्या या कथनानंतर देवदानव संधी झाली आणि समुद्रमंथन करण्याबाबत योजना आखली गेली. समुद्रमंथनातून अमृतकुंभ निघाल्यावर देवांचा इशारा मिळताच इंद्र पुत्र 'जयंत' अमृतकलश घेऊन आकाशातून उडू लागला. या अचानक घडलेल्या घडामोडीनंतर दैत्यगुरू शुक्राचार्य यांच्या आदेशानुसार दानवांनी अमृतकुंभ प्राप्त करण्यासाठी जयंताचा पाठलाग केला. सतत पाठलाग आणि अमृत प्राप्त करण्याची लालसा यामुळे वाटेतच दानवांनी जयंताला पकडले आणि अमृतकुंभावर अधिकार प्राप्त करण्यासाठी देव आणि दानव यांच्यात १२ दिवस भयंकर युद्ध झाले. कथेनुसार या युद्धात पृथ्वीवरील चार क्षेत्रात अमृतकुंभातून अमृतबिंदू पडले होते; ज्यातील पहिला बिंदू प्रयागराज, दुसरा शिवनगरी हरिद्वार, तिसरा उज्जैन आणि चौथा अमृतकण नाशिक येथे पडला. याच पौराणिक कारणाने कुंभमेळ्याचे आयोजन या चार पवित्र क्षेत्रात केले जाते. देवतांचे १२ दिवस म्हणजे मनुष्याचे १२ वर्ष असतात. म्हणूनच कुंभदेखील १२ होतात. यातील चार कुंभ पृथ्वीवर आणि आठ कुंभ देवलोकात होतात, अशी मान्यता आहे. पृथ्वीवरील कुंभमेळ्याचा उगम आठव्या शतकातील महान तत्त्वज्ञानी आदी शंकराचार्य परंपरेत आहे?

### कुंभ आयोजन- ज्योतिष गणना

धार्मिक आणि पौराणिक मान्यतेनुसार कुंभमेळ्याची आयोजन तिथी खगोलीय ग्रहस्थितीनुसार ठरते; ज्यात सूर्य आणि बृहस्पती यांचे योगदान असते. सूर्य देव आणि देवगुरू बृहस्पती हे एका राशीतून दुसऱ्या राशीत जेव्हा प्रवेश करतात, तेव्हा कुंभमेळ्याचे स्थान आणि तिथी यांची निवड केली जाते. यानुसार जेव्हा सूर्य मेष राशीत आणि बृहस्पती कुंभ राशीत असतो, तेव्हा कुंभमेळा हरिद्वार येथे साजरा करतात. ज्यावर्षी बृहस्पती वृषभ राशीत प्रवेश करतो आणि सूर्य मकर राशीत राहतो तेव्हा हा महोत्सव प्रयागराज क्षेत्रात आयोजित करण्यात येतो. बृहस्पती आणि सूर्य यांचा सिंह राशीत प्रवेश होतो तेव्हा महाकुंभ मेळा महाराष्ट्रातील नाशिक येथे साजरा केला जातो. यासोबतच बृहस्पती, सूर्य आणि चंद्र हे तीनही कर्क राशीत प्रवेश करीत असल्यास आणि तेव्हा अमावास्या असल्यास तेव्हाही कुंभ नाशिक येथेच होतो. बृहस्पती सिंह राशीत आणि सूर्य मेष राशीत प्रवेश करीत असल्यास उज्जैन येथे कुंभ आयोजन होते. सूर्य सिंह राशीत प्रवेश करीत असल्यास मध्यप्रदेशातील उज्जैन क्षेत्रात कुंभ होतो आणि 'सिंहस्थ' या नावाने ओळखला जातो. पौराणिक कथेनुसार अमृतकलशातील अमृताचे चार बिंदू पृथ्वीवर जिथे पडले, त्या ठिकाणी अमृतबिंदूला नदीचे रूप प्राप्त झाले. या चार पवित्र नद्या म्हणजे हरिद्वारमधील पुण्यसलीला गंगा, नाशिकमधील गोदावरी, प्रयागराजमधील संगमतीर्थ म्हणजेच गंगा, यमुना व सरस्वती आणि उज्जैन येथे क्षिप्रा नदी. गंगा, यमुना, सरस्वती, गोदावरी आणि क्षिप्रा या नद्यांमध्ये कुंभपर्व काळात स्नान करणाऱ्या सर्वांचे कष्ट आणि दुःख दूर होऊन जीवन मंगलमय होते, अशी श्रद्धा आहे.




### पुराणातील दाखले

स्कंद पुराणातील उल्लेखानुसार भारतातील समस्त पवित्र नद्या उत्तरेकडून दक्षिणेकडे प्रवाहित होतात; मात्र नदी उत्तरगामी आहे. कुर्म पुराणानुसार कुंभस्नान केल्याने समस्त पापांचा विनाश होतो, मनोवांछित फल प्राप्त होते आणि मनुष्याला देवलोक प्राप्त होतो. भविष्य पुराणानुसार कुंभस्नानाने स्वस्वरूप पुण्य आणि मोक्ष प्राप्ती होते. कुंभ, महाकुंभ, अर्धकुंभ आणि सिंहस्थ कुंभ या पर्वकाळात पवित्र नद्यांमधील जल औषधिकृत व अमृतमय होते, अशी मान्यता आहे. यामुळेच अंतरात्म्याच्या शुद्धीकरिता पवित्र स्नान करण्यासाठी देश-विदेशातून लाखो भाविक येतात. आध्यात्मिक दृष्टीने कुंभपर्व काळातील ग्रहस्थिती एकाग्रता आणि ध्यान साधनेसाठी सर्वोत्तम असते. भारताची प्राणशक्ती धर्म आहे. आसेतू हिमाचल वसलेल्या भारतातील समस्त जनतेच्या रोमारोमात धर्मरूपी प्राणाचा अनाहत नाद कायम असतो. भारताचा मुलाधार वेदजनित धर्म आहे. समस्त राग, लोभ, अहंकार, मोह, मद, मत्सर, विद्वेष आपसातील मतभेद यांना विसरून एका पुण्य क्षेत्रात एक लक्ष्य एक उद्देश आणि एक ध्येय घेऊन सामील होणारे भाविक हीच भारताची अंतरनिहित प्राणशक्ती आहे. अनादिकाळापासून आपल्याला असे दिसते की, कुंभक्षेत्रातील हे एकत्रीकरण कोणत्याही दिग्विजयी राजाची राजधानी नव्हे, कोणतीही वाणिज्य-ऐश्वर्यशाली नगरी नव्हे, तर हे स्थान पवित्र तीर्थक्षेत्र समूह गया, काशी, पुरी, प्रयागराज, कुरुक्षेत्र, नैमिषारण्य, अयोध्या, वृंदावन, मथुरा, द्वारका, हरिद्वार, नाशिक, उज्जैन हेच राहिले आहे. कुंभाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे कुंभाचे वेळापत्रक कोणत्याही सामाजिक किंवा राजकीय कारणांनी ठरत नाही. कुंभाचा उद्देशदेखील समस्यांची मीमांसापूर्ती नाही. एक उदात्त संकल्प आणि व्यापक दृष्टिकोन असलेल्या कुंभाचे ध्येय व्यष्टी आणि समष्टी जीवनाला उच्चादर्शी परमवैभवी सिंहासनावर सुप्रतिष्ठित करणे आहे. धर्मधारणेच्या अमृत संजीवनीचे शिंपण करून समाज आणि राष्ट्रीय जीवनातील प्रत्येक स्तराला देव-देश-धर्म या त्रिवेणीने संचारित करून शाश्वत विश्वकल्याण साधणे हेच तर भारताचे ईश्वरप्रदत्त कर्तव्य आहे.

### प्रयागराज पूर्णकुंभ २०२५

तीर्थराज प्रयागराजचा उल्लेख पदमपुराणात आला आहे. पांच योजन विस्तीर्ण पसरलेल्या प्रयाग क्षेत्रात आपला प्रवेश होताच प्रत्येक पावलावर अश्वमेध यज्ञाचे फल प्राप्त होते.

**पञ्चयोजन विस्तीर्ण प्रयागस्य तु मण्डलम् ।**
**प्रविष्टस्यैव तद् भूयावश्वमेधः पदे-पदे ॥**

(पद्मपुराण-४०)

प्रजापिता भगवान ब्रह्मा यांनी यज्ञ केलेल्या स्थानावर वेदी निर्माण केली. त्या चार वेदी म्हणजे प्रथम कुरुक्षेत्र, द्वितीय प्रयागराज, तृतीय गया आणि चतुर्थ पुष्कर. प्रयागराज क्षेत्रात तपस्वी मुनींच्या उपस्थितीमुळे पावन झालेले तापस वन आहे. याच तापस वनांचा राजा म्हणजे अक्षयवट शतकानुशतके स्थितप्रज्ञ अचल अक्षय आहे.

आदिवटः समाख्यातः कल्पान्ते अपि च दृश्यते।
शेते विष्णुर्यस्य पत्रे अतो अयमव्ययः स्मृतः॥

अशा या पुण्यपावन प्रयागराज नगरीत २०२५ चा पूर्णकुंभ मेळा आयोजित असून पौष पौर्णिमा-मकरसंक्रांती १३ जानेवारी २०२५ पासून महाशिवरात्री २६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत पर्व काळ आहे. या पर्व काळात स्नान, जप, तप, दान आदींचे महत्त्व आहे. संगम तटावर समस्त देवी-देवता, ऋषी-मुनींसह स्नान करायला येत असल्याने त्रिवेणी स्नानाचे महत्त्व आहे.

**न यत्र योगाचरणप्रतीक्षा न यत्र यज्ञेष्टिविशिष्टदीक्षा ।**
**न तारकज्ञानगुरोरपेक्षा स तीर्थराजो जयति प्रयागः ॥**
**चिरं निवासं न समीक्षते यो ह्युदारचित्तः प्रददाति च क्रमात् ।**
**यः कल्पिताथांश्च ददाति पुंसः स तीर्थराजो जयति प्रयागः ॥**

### प्रयागराज पुण्यपर्व स्नान तिथी

१३ जानेवारी २०२५ - पौष पौर्णिमा
१४ जानेवारी २०२५ - मकर संक्रांती
२९ जानेवारी २०२५ - मौनी अमावास्या
३ फेब्रुवारी २०२५ - वसंत पंचमी
१२ फेब्रुवारी २०२५ - माघ पौर्णिमा
२६ फेब्रुवारी २०२५ - महाशिवरात्री

तीर्थराज प्रयाग यांस धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चतुर्दिक पुरुषार्थाचा प्रदाता म्हटले गेले आहे. हिंदू संस्कृतीत, मोक्षाची संकल्पना वारंवार जन्म-मृत्यूपासून, म्हणजेच जन्म-मृत्यूच्या सततच्या चक्रातून मुक्तता म्हणून केली गेली आहे. मान्यतेनुसार, प्रयागराज येथील कुंभ कल्पवासात दान आणि पुण्यसंग्रह एकत्रित केल्याने माणूस चौऱ्यांशी लाख जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून मुक्त होतो आणि मोक्ष प्राप्त करतो.

### हरित कुंभ - 'एक थाळी एक थैली'

जगभरातील १०० देशांतून ४० कोटी लोक या भव्य पूर्ण कुंभास भेट देतील, असा अंदाज व्यक्त होत आहे. त्यामुळे विविध प्रकारे प्रदूषण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या महाकुंभ काळात एकदा वापरून फेकण्याचे म्हणजेच 'युज अँड थ्रो' प्रकारचे पॉलिथीन वापरले गेल्यास अंदाजे रोज १२०० टन प्लॅस्टिक ग्लास व प्लेटचा कचरा निर्माण होईल. कोट्यवधी टन स्वरूपातील हा कचरा घातक ठरू शकतो. या पृष्ठभूमीवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि विचार परिवाराने 'एक थाळी एक थैली' हा उपक्रम नियोजित केला आहे. या उपक्रमात स्टीलच्या थाळ्या, कापडाच्या पिशव्या दान स्वरूपात देणे किंवा निधी स्वरूपात सहभाग देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या अभियानाचे स्वरूप बघता आजवरचा सर्वांत विशालकाय हरित कुंभ म्हणून या पूर्णकुंभाची नोंद होणार आहे. आपली सनातन संस्कृती चिरपुरातन नित्यनूतन असल्याची ग्वाही त्या निमित्ताने जगाला देता येणार आहे.

### भारताचे परमलक्ष्य

दररोज भारतातील हजारो नर-नारी, आबालवृद्ध हे तीर्थदर्शन, साधुदर्शन, पुण्यार्जन आणि धर्मलाभ यासाठी पवित्र कर्म करतात. सांसारिक हानी, आत्मीय स्वजनांचा विरोध तसेच आपत्ती आणि आर्तनाद यांची सर्वथा उपेक्षा करून अत्यंत व्याकुळ भावाने भारतीय समाज तीर्थयात्रा करतात. भारतीय लोक धर्मासाठी सर्वस्व अर्पण करू शकतात आणि करतात देखील. धर्मासाठी घर, संसार, आत्मीय स्वजन, सुख, उपभोग, साधन आदी आकर्षणाचा त्याग आणि आसक्तीची उपेक्षा करणाऱ्या भारतीय समाजाची मूळ प्रकृती त्यागाची आहे. भारताचा मूलमंत्र त्याग आहे. भारतवासी या त्याग मंत्राला जाणतात, मानतात आणि विश्वासाने त्याचे पालन करतात. आपापले सामाजिक आणि व्यक्तिगत जीवनातील आचारनुष्ठान करतानादेखील त्यांच्या ठायी एकच भाव असतो तो म्हणजे, 'त्यागेनैकेने अमृत्वमानशुः' एकमात्र त्यागानेच अमृत्व प्राप्ती होते; याच त्याग भावनेचा अनुभव घेण्याचे उपादान म्हणजे कुंभपर्व होय. कुंभपर्व हे भारतीय संस्कृती, सामंजस्य, समरसता आणि परंपरा यांच्या विराट मिलनाचा महोत्सव आहे. ज्ञान, चेतना आणि वैचारिक परस्पर मंथन हे कुंभमेळ्याची फलश्रुती आहे. कोणत्याही औपचारिक आमंत्रणाशिवाय प्राचीन काळापासून हिंदू धर्माच्या अनुयायांच्या जागृत चेतनेला चैतन्यमयी करून कार्यप्रवण करणारा कुंभोत्सव म्हणजे चिती जागरणाचा महायज्ञच आहे.

संस्कृती सबकी एक चिरंतन खून रगों मे हिंदू हैं
विराट सागर समाज अपना हम सब इसके बिंदू हैं
रामकृष्ण गौतम की धरती, महावीर का ज्ञान यहां
वाणी खंडन मंडन करती, शंकर चारों धाम यहां
जिसने दर्शन राहें उतनी, चिंतन का चैतन्य भरा
पंथ खालसा गुरू पुत्रों की बलिदानी यह पुण्य धरा
अक्षय वट अगणित शखाऐं, जड में जीवन हिंदू है
विराट सागर समाज अपना हम सब इसके बिंदू हैं

तर चला तीर्थराज प्रयागला... जगातील सर्वात विशालकाय महासागररूपी एकत्रीकरणात आपणही बिंदू म्हणून सहभागी होऊया आणि नवभारताच्या जयकारात उद्घोष करूया... 'स तीर्थराजो जयति प्रयागः..!'

(लेखक भारतीय शिक्षण मंडळाचे नागपूर महानगर संयोजक आहेत.)
९६५७७२०२४२

## रविवारची पत्रे

### पालक-पाल्य संवाद कमी होतोय का?

नागपुरातील एक मन विचलित करणारी घटना घडली. या घटनेने बऱ्याच बाबतीत विचार करायला भाग पाडते. आपला पाल्य हा उच्च शिक्षित व्हावा, चांगली मिळकत घेणारा व्हावा व समाजात स्थिर व्हावा एवढीच अपेक्षा पालकांची मुलांप्रति असते. तेव्हा किती चांगले शिक्षण देऊ असे पालकांना होते व असे करताना मात्र काही गोष्टी ते विसरून जातात. लहानपणापासून मुलांची आवड कशात आहे, त्याची बौद्धिक क्षमता काय आहे, त्याची मानसिकता कशी आहे याचा विचार किती पालक करत असतील? अशावेळी मुलांशी वेळोवेळी सार्थक संवाद आपण करतो का? अपयशाची कारणीमीमांसा आपण करतो का? शिक्षणातील अपयश पालक पचवू शकत नाही की मुलांमध्ये सहनशीलताच शिल्लक राहिली नाही असा प्रश्न या घटनेवरून पडतो. खरे तर हा गहन चिंतेचा व चर्चेचा विषय आहे परंतु काही बाबतीत प्रत्येक पालकालासुद्धा विचार करायला लावणारा आहे.

इयत्ता दहावीची परीक्षा संपली रे संपली की अनेक क्लासेसचे फोन येणे सुरू होते. प्रत्येकजण आम्ही कसे चांगले व आमची फी किती व आम्ही सर्व म्हणजे अकरावी, बारावी ते जेईई अभ्यासक्रम पूर्ण घेतो असे मोठया दिमाखाने सांगत असतात. स्वतःच स्कॉलरशिप परीक्षा घेऊन ''तुमचा पाल्य स्कॉलरशिप मिळवता आहे त्यामुळे इतके रुपये कमी होतील'' असे सांगतात. प्रत्यक्षात तो पाल्य किती सक्षम आहे हे ना पालकांना कळते ना क्लासवाल्यांना. केवळ पैसे लाटण्यासाठी अशी प्रलोभने ते देत असतात आणि इकडे पालक फसतात. आपला मुलगा-मुलगी स्कॉलरशिप घेतो म्हणजे हुशारच आहे असे ते समजतात व श्रीमंत पालक पैसे भरून किंवा मध्यमवर्गीय कर्ज काढून ही भरघोस फी भरून मोकळे होतात. इकडे स्टॅण्डर्ड क्लास सुरू होतो. शाही वाहन, तो ड्रेस कोड, ती आठ-आठ तास क्लासची वेळ यातच सुरुवातीला पालक व विद्यार्थी भारावून जातात. आणि सहा-आठ महिन्यानंतर खरा खेळ सुरू होतो. सगळ्याच विद्यार्थ्यांचे नाही पण बहुतांश विद्यार्थ्यांना जेईई अभ्यासक्रम डोक्यावरून जातो. समजतच नाही. केवळ आठ तास घालवून ते घरी येतात. पालकांनी विचारल्यावर ''हो समजत आहे'' अशी थाप मारतात कारण वारेमाप फी पालकांनी भरली असते व हे सोडून दुसरे काय? प्रश्न कदाचित मुलांच्या डोक्यात येत असावा. एकदा मी मानेवाडा चौकातून येत असताना एका क्लासचा विद्यार्थी गाडीतून उतरला. माझा मुलगा दहावीला असल्याने त्या मुलाकडून क्लासेसबद्यल काही माहिती मिळते का म्हणून मी त्याला थांबवले. त्याची विचारपूस केली तर काही धक्कादायक सत्य मला लगेच कळले. तो म्हणाला की ''काका, माझ्यासारख्या अनेक मुलांना शिकवत आहे हे समजत नाही, अकरावी व बारावी तर काहीच शिकवत नाही. आणि बारावी पास होणे आवश्यक आहे. अशावेळी आम्ही नेमके काय शिकावे हाच प्रश्न आहे. आम्ही खूप चिंतेत आहोत.'' ही वास्तविक स्थिती आहे. अशा मुलांशी एकदा संवाद साधा म्हणजे अनेक क्लासेसचे सत्य बाहेर येते. सगळेच क्लासेस तसे नसतीलही पण आपण नेमके विद्यार्थ्यांना काय देतो हा प्रश्नही त्यांना पडला पाहिजे. त्यातही राजस्थानमधील कोटा किंवा दिल्ली स्थित मोठमोठे बॅनर असलेले क्लासेस आपापल्या फ्रॅन्चॉयसी विविध शहरात देतात. कमी पगाराचे टीचर असतात व कधी कधी अशा शिक्षकांना पगारही वेळेवर मिळत नाही आणि मध्येच ते क्लास सोडून निघून जातात. नुकसान होते ते कित्येक दिवस मुले नुसते क्लासमध्ये टाईमपास करीत बसले असतात. नागपुरात अशाच एका क्लासचा भंडाफोड काही दिवसांपूर्वी झाला होता. आयआयटी ला जाणे, डॉक्टर होणे हे प्रत्येक मुलांचे स्वप्न असते. परंतु हे स्वप्न दिवास्वप्न बनून तर राहात नाही ना याचाही विचार होणे आवश्यक आहे. अनेक विद्यार्थी 'ड्रॉप' घेतात. हा फंडाही मला समजला नाही.

शिक्षण कोणतेच वाईट नसते. प्रत्येकाने डॉक्टर, इंजिनीअर व्हावे ठरले तर इतर जॉबकडे कोण जाणार? आज कधी नव्हे ते इतके विविध कोर्सेस उपलब्ध आहेत की चांगला मार्ग निवडण्याची सुसंधी विद्यार्थ्यांना आहे, पालकांना पण आहे. अशा घटना पुन्हा घडू नये जर वाटत असेल तर गरज आहे पालकांनी मुलांशी मनमोकळी चर्चा करण्याची, संवाद साधण्याची, त्यांची समस्या जाणून घेण्याची, त्यांच्या मनाचा ठाव घेण्याची आणि मुलांनीही गरज आहे ती पालकांशी सुसंवाद साधण्याची.

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

### वृत्तवाहिन्यांनी गमावलेली विश्वसनीयता

सर्व वृत्तवाहिन्यांना विनंती आहे की, कृपया पत्रकारिता समाजासाठी करा. आपल्या सर्वांची सध्याची कामगिरी कशी आहे ते थोडक्यात आज दाखवलेली बातमी उद्या कशी खोटी आहे हे आपणच दाखवता आणि आपली स्वतःचीच विश्वसनीयता प्रश्नचिन्हित करत असता. हे कुठेतरी थांबलं पाहिजे असं तुम्हाला वाटत नाही का? सर्वांत महत्त्वाचे म्हणजे कोणीतरी राजकीय नेता, समाजातील व्यक्ती काहीतरी अभद्र वात्रट बोलतो. ती गोष्ट सगळीकडे पसरते आणि यावर दुसऱ्या नेत्याला किंवा व्यक्तीला विचारलं जातं की अमुक अमुक असे म्हणाले त्यावर आपली काय प्रतिक्रिया? सर्व वृत्त वाहिन्यांमध्ये काहीच फरक नाही. सत्यता सोडून आपण वेगावर अन् सनसनी घडवत असता. हे सगळे थांबले पाहिजे. बातमी उशिरा दाखवली तरी चालेल पण खरं तेच दाखवा तुम्हाला मनाला वाट्टेल ते दाखवू नये. बातमी कुठली आहे?, दाखवण्यासारखी आहे का?, आपण ती बातमी जशी आहे तशी दाखवत आहोत का?, त्याचे चांगले वाईट परिणाम काय होतील? तुम्हाला विश्लेषणात स्वातंत्र्य आहे; तर्क मांडू शकता पण बातमीत स्वातंत्र्य नसते तिथे तुम्हाला जबाबदारीने काम करावे लागेल. आपली काय अपरिहार्यता आहे समजत नाही. दाखवण्यासाठी काही नाही किंवा म्हणून असे करत असाल तर हे चुकीचं आहे. या गोष्टींचा विचार करावा आणि गेलेली विश्वसनीयता प्राप्त करण्याची संधी आहे. बघा जमलं तर नाही तर येरे माझ्या मागल्या चालूच होतं आणि चालूच राहील. सुधारणा करण्याची नामी संधी आहे. बदल घडवू शकता. सर्व आपल्यावर अवलंबून आहे.

**गणेश धर्माजी शेवते**/९०९६१५२९४९

### देशासह राज्यातील वनक्षेत्राची घट चिंताजनक

राष्ट्रीय वन अहवाल २०२३ च्या माहितीनुसार वनक्षेत्राच्या बाबतीत देशासह राज्याची परिस्थिती अत्यंत चिंताजनक स्थितीत येऊन ठेपली आहे. कारण देशात फक्त २१ टक्के व राज्यात फक्त १६ टक्के वनक्षेत्र शिल्लक असल्याचा खुलासा राष्ट्रीय वन अहवालात केला आहे ही अत्यंत गंभीर व धोकादायक स्थितीत नेणारी बाब आहे. आज निसर्ग आहे म्हणून सृष्टी आहे. निसर्गाची संपूर्ण जळमुळं वनक्षेत्रावर अवलंबून असते. वनक्षेत्र म्हणजेच वृक्ष आज वनक्षेत्रावर संपूर्ण मानवजातीने स्वतःच्या स्वार्थासाठी कुऱ्हाड चालवून घणाघाती प्रहार केला आहे. आज देशाचा विचार केला तर फक्त २१ टक्के वनक्षेत्र म्हणजे मानवजातीसह संपूर्ण जीवसृष्टीसाठी धोक्याची घंटा आहे. घटत्या वनक्षेत्रामुळे हवामानात बदल होऊन ग्लेशियर वितळणे, भूकंप, ज्वालामुखीचा उद्रेक, भूस्खलन, अति उष्णता, अति पाऊस, त्सुनामी, समुद्राची पातळी वाढणे अशा भयावह घटना दिवसेंदिवस वाढतच आहे. आजच्या आंतरराष्ट्रीय नियमांनुसार प्रत्येक देशाचे वनक्षेत्र कमीत कमी ३३ टक्क असणे गरजेचे आहे. परंतु आज भारतात फक्त २१ टक्के वनक्षेत्र शिल्लक असल्याचे सांगितले जाते व महाराष्ट्राचा विचार केला तर फक्त १६ टक्के वनक्षेत्र शिल्लक आहे. ही मोठी धोक्याची घंटा आहे. डेहराडून येथील सर्व्हे ऑफ इंडिया या संस्थेने नुकताच २०२३ चा राष्ट्रीय वन अहवाल (आयएसएफआर) दिल्ली येथील वन आणि पर्यावरण मंत्रालयाकडे सादर केला. हा अहवाल देशातील वनसंपत्ती आणि संसाधनावरील प्राथमिक माहितीच्या आधारावरचा मूल्यांकन अहवाल मानला जातो. वनक्षेत्राच्या बाबतीत देशातील राज्यात समतोल नसल्याने वनक्षेत्र घटतांना दिसते. आज आपण पाहिले तर देशातील आंध्रप्रदेश, कर्नाटक, केरळ, ओरिसा, तेलंगणा या राज्यांचे वनक्षेत्र गेल्या दोन वर्षांत वाढले आहे, तर घनदाट जंगलाच्या बाबतीत ज्या राज्यांची गणणा होते अशा मिझोराम, नागालँड, अरूणाचल प्रदेश, त्रिपुरा, मेघालय या राज्यातील वनक्षेत्र घटले आहे ही चिंतेची बाब आहे. वनक्षेत्रावर संपूर्ण मानवजाती, पशुपक्षी व जीवजंतू यांची दिनचर्या अवलंबून असते. त्यामुळे वनक्षेत्र सुरक्षित तर संपूर्ण जीवसृष्टी सुरक्षित हा मूलमंत्र सर्वांनीच अंगीकारला पाहिजे. आज संपूर्ण देशाचा विचार केला तर वनक्षेत्र ३३ टक्क्यांपर्यंत आणण्यासाठी १२ टक्के वनक्षेत्र वाढविण्याकरिता संपूर्ण ताकदीनिशी सरकारने व सामाजिक संघटनांनी पुढाकार घेतला पाहिजे. त्याचप्रमाणे आज राज्यात ३३ टक्के वनक्षेत्र आणण्यासाठी १७ टक्के वनक्षेत्र वाढविण्याची मोठी जबाबदारी सरकारने स्वीकारली पाहिजे. वनक्षेत्र वाढले नाही तर दिवसेंदिवस बदलत्या हवामानात आणखी भर पडून भयावह परिस्थिती निर्माण होऊ शकते याला नाकारता येत नाही. त्यामुळे वृक्ष लागवड काळाची गरज आहे. आज घटत्या वनक्षेत्रामुळे जंगली पशुपक्षी याचे हाल बेहाल होत आहे व त्यांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे. आपण रोज मीडियाच्या माध्यमातून पाहात असतो की, गावात, शहरात, कोणाच्या घरात, रोडवर हिंसक प्राणी (वाघ, बिबट्या, अस्वल इत्यादी) मोठ्या प्रमाणात वावरताना दिसतात. याला संपूर्ण मानवजाती जबाबदार आहे. देशात हत्ती कर्नाटक व ओडिशा राज्यात सर्वाधिक आहे म्हणजेच जगभरात असणाऱ्या हत्तींपैकी ६० टक्क्यांहून अधिक हत्ती भारतात आहे. परंतु जंगल कटाईमुळे व वनक्षेत्राच्या घटत्या परिणामामुळे हत्तीचे कळप आपल्याला इतरत्र राज्यात येताना दिसतात. यामुळे या महाकाय प्राण्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. जंगल कटाईमुळे वन्यप्राण्यांची तस्करी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. ओडिशात गेल्या ११ वर्षांत ८५७ हत्तींचा मृत्यू अपघात, आजार, शिकार, विजेचता झटका यामुळे झाला. अशाप्रकारे वन्यप्राण्यांवर मानवी अत्याचार वनक्षेत्र घटल्याने होत असल्याचे दिसून येते. अमेरिकेच्या हेल्थ इफेक्ट इन्स्टिट्यूटने स्टेट ऑफ ग्लोबल एअर २०२४ हा अहवाल सादर केला आहे. त्यात दावा करण्यात आला आहे की भारतातील वायुप्रदूषण अतिशय चिंताजनक पातळीवर पोहोचले आहे. वायुप्रदूषणामुळे जगभरातील मृत्यूच्या तुलनेत २५ टक्के मृत्यू भारतात होतात म्हणजेच भारत वायुप्रदूषणच्या बाबतीत अग्रेसर असल्याचे दिसून येते ही गंभीर बाब आहे याला रोखण्यासाठी वनक्षेत्र वाढविण्याची नितांत गरज आहे.

**रमेश लांजेवार**/९९२१६९०७७९

### भान ना राजकीय नेत्यांना ना मराठी वृत्तवाहिन्यांना

बीड येथील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या झालेल्या दुर्दैवी मृत्यूनंतर या ठिकाणी जातीपातीमध्ये परत एकदा सूडाचे राजकारण सुरू झाले. ते थांबण्याचे नाव दिसत नाही. आता त्यात नाहक एका अभिनेत्रीला गोवण्यात येत आहे. काही वर्षापूर्वीपर्यंत सर्वच शाळा, कॉलेजमध्ये स्नेहसंमेलनात उद्घाटन समारंभासाठी सिनेअभिनेत्री अथवा अभिनेत्याला बोलविण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात कमी झाले. आताच्या काळात फारसे कोणीच बोलवत नाही. आता राजकीय पुढारी आपल्या राजकीय कार्यक्रमासाठी सिनेअभिनेत्री, अभिनेत्यांना अलिकडील काळात प्रामुख्याने बोलावतात. हे सर्व कलाकार त्या समारंभास जातात कारण त्यांना एकतर याद्वारे प्रसिद्धी तसेच उदरनिर्वाहासाठी मानधन मिळते. त्यामुळे अशा कार्यक्रमांना बहुतांश कलाकार हजेरी लावतात. यात काही गैर नाही. पण आता या राजकारणी लोकांनी आपल्या विरोधी राजकारणासाठी त्याचा वापर करण्याची नवीन पद्धत सुरू केल्याची बाब बीड येथील घटनांवरून दिसून येते.

खरे तर या कलाकारांनी त्यांच्या कार्यक्रमांना हजेरी लावली म्हणजे त्याचे व याचे वेगळ्या प्रकारचे संबंध असल्याचा अजब तर्क लावून जर एखादा राजकारणी आपला राजकीय एजेंडा चालविण्यासाठी असल्या गोष्टींचा वापर करत असेल तर ही बाब अत्यंत गंभीर तसेच दुर्दैवी आहे. एकीकडे महाराष्ट्र पुरोगामी विचारांचा असून याला शाहू, फुले, आंबेडकर यांचा वारसा असा उद्घोष करायचा आणि एका अभिनेत्रीवर वाट्टेल ते आरोप लावायचे हा कोणता प्रकार आहे? मराठी वृत्तवाहिन्यासुद्धा यामध्ये आपल्या टीआरपीसाठी अशा आरोपांना मारेमाप प्रसिद्धी देऊन आपली पोळी भाजून घेत आहेत.

आज हा सगळा एकूण प्रकार पाहिला तर बीड येथील झालेल्या संतोष देशमुख हत्याप्रकरणात त्या मृत व्यक्तीच्या कुटुंबाला न्याय देण्याऐवजी सर्व पक्षीय स्थानिक नेते, आमदार, खासदार आपापले राजकारण करत आहे. पण त्यात कारण नसताना एका होतकरू मराठी अभिनेत्रीला गोवून तिचे एक प्रकारे चारित्र्यहनन करत तिचा नाहक बळी या सगळ्या प्रकरणात देत आहे. भरीस भर मराठी वृत्तवाहिन्या असल्या बातम्या उलटसुलट दाखवून त्यात अजून भर कशी टाकता येईल ते पाहत आहेत. एकूणच हा सर्व प्रकार निंदनीय असून कोठेतरी ताबडतोब थांबला पाहिजे.

**अविनाश देशपांडे**/९४२२९५०७५०

### पौष महिन्याचा बागुलबुवा कशासाठी ?

पौष महिन्यात शुभकार्य करू नयेत हा युक्तिवाद तकलादू आणि न पटणारा वाटतो. शास्त्रापेक्षा रूढी बलवान की शास्त्रापासून उत्पन्न झालेली रूढीच बलवान हा अभ्यासाचा विषय आहे आणि म्हणूनच तो सयुक्तिक्त वाटतो. ज्याची उत्पत्तीच नाही त्याचे नियम पाळायचे कसे? पेक्षा आणि पासून हे विभक्तीचे प्रत्यय चालीरीतीने वापरता येतात. पुष्य नक्षत्रावरून पौष हे नाव आले. पुष्य नक्षत्राचा स्वामी शनी आहे आणि हा ग्रह विवाहासौख्यास मारक असतो म्हणून विवाह करत नाहीत परंतु या नक्षत्राची देवता गुरू आहे त्याचा विचारच केला जात नाही .

१) श्री खंडोबा आणि श्री म्हाळसा देवी यांचा विवाह पौष शुक्ल १३ मृग नक्षत्रावर गोरज मुहूर्तावर पाली येथे होतो .

२) गृहप्रवेश व वास्तू शांतीसाठी हा महिना अजिबात वर्ज्य नाही. फक्त मुख्य घराचे बांधकाम या महिन्यात करू नये. ३) या महिन्यात धनु राशीत रवि ग्रह असेपर्यंत धनुर्मास असतो त्यातील काही दिवस पौष महिन्यात येतात. त्यानंतर रवि ग्रह मकर राशीत गेल्यावर मंगल कार्याला ते दिवस योग्य ठरतात. ४) पितृपंधरवडा सुद्धा वाईट नसतो; परंतु वाडवडिलांच्याप्रति असणारी श्रद्धा शुभ कार्यासाठी प्रवृत्त होत नाही एवढाच त्याचा अर्थ घ्यावा लागेल. ५) पौष शुक्ल अष्टमी ते पौर्णिमा हा काळ शाकंभरी देवीच्या नवरात्रोत्सवाला असतो. ६) पौष पौर्णिमेपासून माघस्नानाला प्रारंभ होतो; केवळ मकरसंक्रांतीशिवाय दुसरा सण या महिन्यात नाही म्हणून या महिन्याला भाकडमास संज्ञा प्राप्त झाली. हेमंत ऋतूतील हा दुसरा महिना याला तैष आणि सहस्य असेही म्हणण्याची प्रथा आहे. प्राचीन ग्रंथातून या महिन्यात केली जाणारी धर्मकृत्येही सांगितलेली आहेत. या सर्वांचा विचार करता या महिन्याविषयीची किल्मिषता दूर करून प्रत्येकाने योग्य निर्णय घेण्याची सध्या नितांत गरज आहे.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

### पोलिसांनी कर्तव्याला अधिक महत्त्व देण्याची गरज

राज्यात पोलिसांचा दबाव बनवणाऱ्या राजकीय व्यवस्थेची ताकद वाढवणारा समुदाय नागरिकांचा असतो. अलिकडेच सिंधुदुर्गातील पुतळा दुर्घटनेनंतर पोलिसांवर अरेरावीची राजकीय भाषा महाराष्ट्राने ऐकली. पोलिस कायद्याचे पालन करीत नाहीत. प्रकरण मिटवण्याकडे त्यांचा कल असतो हे खरे आहे. मात्र अशी प्रकरणे मिटवण्यासाठी आग्रही असलेला समाज आपल्यापासूनच बनतो, हे नागरिकांनी लक्षात ठेवायला पाहिजे. पोलिसांना जाब विचारणारा समुदाय नेते आणि लोकप्रतिनिधी तेवढ्याच ताकदीने प्रश्न विचारला पाहिजे. पोलिसांवरील दबाव ही काही नवी बाब नाही. आणि या दबावातूनच पोलिसांना जाहीर इशारे देण्याचे राजकीय प्रकार राज्यात घडत आहेत. कायदा-सुव्यवस्था राखण्याचे काम, लोकांच्या मालमत्ता आणि जीवनाच्या रक्षणाचे काम पोलिसांना करावे लागत असताना पोलिसांना कमालीच्या हतबल स्थितीत आणून ठेवणारी यंत्रणा दोषी आहे हे स्पष्ट आहे. संवेदनशील प्रकरणांमध्ये नागरिकांचा संताप सहज असतो. अशावेळी लैंगिक किंवा सामाजिक चिंतेचा विषय होणाऱ्या गुन्ह्याबाबत पोलिसांची जबाबदारी वाढलेली आहे. मात्र पोलिसांचे हात बांधणाऱ्या व्यवस्थेला समाजानेच खतपाणी घालून मोठे केलेले असते. लैंगिक अत्याचार किंवा संवेदनशील प्रकरणात पोलिस तातडीने गुन्हा करून घेत नाहीत. हे खरे आहे की गुन्हा दाखल केल्याचा किंवा न केल्यास किंवा उशिराने केल्यास त्याचा निष्पक्ष तपासावर अनिष्ट परिणाम होतो.

हे खरे आहे की संवेदनशील प्रकरणांमध्ये पोलिसांनी कर्तव्याला महत्त्व द्यायला पाहिजे. अत्याचार, अनाचार हत्या, हिंसा अशा सध्याच्या गढूळलेल्या वातावरणात पोलिस ठाणे सामान्यांसाठी विश्वास आणि दिलासा देणारी ठिकाणे असली पाहिजे. कुठल्याही राजकीय दबावाखाली न येता केवळ आणि केवळ आपल्या कर्तव्य पालनासाठी पोलिसांनी काम करायला पाहिजे. राजकीय प्रकरणांमध्ये पोलिसांकडून दिरंगाई दबावाच्या राजकारणामुळे एकवेळ समजून घेता येईल. परंतु लैंगिक अत्याचार, हत्या अशा संवेदनशील आणि सामाजिक चिंतेच्या विषयांमध्ये पोलिसांवरील जबाबदारी अनेकपटीने वाढलेली असते. अशावेळी झालेली दिरंगाई, कामचुकारपणा किंवा दबावाखाली येण्याची किंमत समाज समुदाय आणि व्यवस्थेला चुकवावी लागते. दबावाखाली दबणारा खरा पोलिस नसतो. पोलिसांची कायद्याचे रक्षक म्हणून असलेली प्रतिमा ही केवळ राजकीय हुकमांचे दावेदार अशी बदलण्यात आपलाही नागरिक म्हणून मोठा वाटा आहे. यात पोलिसांना दोष देऊन चालणार नाही.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४



## सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाच्या एन.बी.नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. यावेळेस महिलांच्या शिक्षणात सावित्रीबाई फुले यांचे योगदानावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सिंहगड संस्थेच्या सेंटर फॉर रिसर्च अँड डेव्हलपमेंट (सीआरटीडी) चे संशोधन संचालक, माजी कुलगुरू प्रा. डॉ. शिवाजी पवार, सिंहगड इन्स्टिट्यूटचे उपप्राचार्य डॉ. शेखर जगदे, उपप्राचार्य डॉ. रवींद्र व्यवहारे, ग्रंथपाल जी. एच घोगले, व्ही. एस. बाबर यांची उपस्थिती होती. तसेच उपप्राचार्य आर टी व्यवहारे, डॉ. एस. एच. पवार यांनीही सावित्रीबाई फुले यांच्याविषयी मनोगत व्यक्त करीत कार्याविषयी माहिती दिली. यावेळेस विद्यार्थिनीसह शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांची उपस्थिती होती.

# जबरी चोरीचे सात गुन्हे उघडकीस

## शहर गुन्हे शाखेची कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ जानेवारी-**

सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयातील शहर गुन्हे शाखेच्या पथकांनी तिघां चोरट्यांना अटक करून त्यांच्याकडून जबरी चोरीचे सात गुन्हे उघडकीस आणले. या कारवाईत पोलिसांनी ३ दुचाकी, ३ मोबाईल असा १ लाख ७८ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.

बसण्णा सत्तु शिंदे (वय ३०, रा. न्यू शिवाजी नगर, गोंधळे वस्ती, सोलापूर), अक्षय सिताराम कांबळे (वय २४, रा. भारतरत्न इंदिरा नगर, गेंट्याल टॉकीज पाठीमागे, सोलापूर), गोविंद यलगा कुंचीकोरवे (रा. विक्रोळी, मुंबई) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

दोन व्यक्ती बिगर नंबर प्लेटच्या दोन दुचाकी घेऊन अक्कलकोट रोडवरील पद्मशाली स्मशानभूमीजवळ थांबल्या असल्याची माहिती शहर गुन्हे शाखेच्या पोलिस पथकाला मिळाली होती. त्यावरून पोलिसांनी तात्काळ हालचाली करून त्याठिकाणी जाऊन बिगर नंबर प्लेटच्या दुचाकीवरून दोघांना ताब्यात घेतले. त्यावेळी त्यांनी त्यांची नावे बसण्णा शिंदे व अक्षक कांबळे अशी सांगितली. त्यांच्याकडे चौकशी केल्यानंतर त्यांच्याकडील दुचाकी या चोरीच्या असल्याचे समजले. त्यामुळे पोलिसांनी त्यांच्याकडे अधिक चौकशी केल्यानंतर त्यांच्याकडे चोरीचे मोबाईल मिळून आले. दोन्ही दुचाकी व मोबाईल हे सोलापूर मार्केट यार्ड येथून चोरल्याचे सांगितले. पोलिसांनी या दोघांकडून दोन दुचाकी, तीन मोबाईल जप्त करून त्यांच्याकडून जेलरोड पोलिस ठाण्यातील ४ आणि जोडभावी पेठ व एमआयडीसी पोलिस ठाण्यातील प्रत्येकी एक गुन्हा उघडकीस आणला.

तसेच गोविंद यलगा कुंचीकोरवे यास २ नंबर बस स्टॅन्ड येथून ताब्यात घेऊन चौकशी केल्यानंतर त्याने एस टी स्टॅन्ड येथून १४ ऑक्टोबर रोजी मोबाईल चोरल्याचे सांगितले. त्याच्याकडून १० हजार रुपये किंमतीचा मोबाईल जप्त करण्यात आला असून फौजदार चावडी पोलिस ठाण्यातील गुन्हा उघडकीस आला आहे. ही कारवाई पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त डॉ दिपाली काळे, सहायक आयुक्त राजन माने, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक संजय क्षिरसागर, पोलिस अंमलदार महेश शिंदे, अनिल जाधव, कुमार शेळके, राजू मुदगल, प्रविण शेळकंदे, प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड यांनी केली.



## शिवस्मारकच्या जिल्हा वक्तृत्व स्पर्धेत देवांश क्षीरसागर, राधा देशपांडे प्रथम

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळातर्फे झालेल्या जिल्हा कै. अनंतराव कुलकर्णी स्मृती वक्तृत्व स्पर्धेत बी. एफ. दमाणी प्रशालेचा देवांश क्षीरसागर आणि वि. मो. मेहता प्रशालेची राधा देशपांडे यांनी विविध गटांमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला.

शिवस्मारक सभागृहात स्पर्धेचे पारितोषिक वितरण उत्साहात झाले. प्रारंभी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे आणि भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख पाहुणे अभिनेते, कलाकार अमृत ढगे यांच्या हस्ते झाले. पारितोषिक वितरणावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे अमृत ढगे, शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर, परिक्षक श्रीकांत गोटे, प्रा. विजयालक्ष्मी कोकणे उपस्थित होते.

दोन्ही गटांतील प्रथम विजेत्यांना ३ हजार, व्दितीय विजेत्यास २ हजार रुपये तर तृतीय विजेत्यांना १ हजार रुपये आणि स्मृतीचिन्ह तसेत सर्व सहभागांना प्रमाणपत्र आणि पुस्तक देण्यात आले. परिक्षक श्रीकांत गोटे, प्रा. विजयालक्ष्मी कोकणे यांनी स्पर्धेचे परिक्षण केले. शिवस्मारकचे संचालक प्रसाद जिरांकलगीकर यांनी सूत्रसंचालन तर अध्यक्ष रंगनाथ बंकापूर यांनी आभार प्रदर्शन केले. याप्रसंगी शिवस्मारकचे सचिव गंगाधर गवसने, व्यवस्थापक मल्लिनाथ होटकर आदी उपस्थित होते.

### स्पर्धेचा निकाल याप्रमाणे (प्रथम तीन) :

**इयत्ता ५वी ते ७ वी गट :-** देवांश विजय क्षीरसागर (बी. एफ. दमाणी प्रशाला), आर्या अविनाश सुर्डे , श्रावणी मनोज सोनाग्रा (दोघी एस. आर. गर्ल हायस्कूल सेवासदन), अमूल्य पसुल (प्रिसिजन).

**इयत्ता ८वी ते १० वी :-** राधा नरेंद्र देशपांडे (वि. मो. मेहता प्रशाला), सायली योगेश थोरात (वि.मो. मेहता प्रशाला), गिरीश श्रीशैल शंकरशेट्टी (मॉर्डन हायस्कूल), अनुष्का अमोल गायकवाड (वि. मो. मेहता प्रशाला).

## आजच्या शिक्षित महिला समाजप्रबोधनात कमी पडत आहेत : सुर्यकांत पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

अपुऱ्या सुविधा उपलब्ध असताना जोतिबा आणि सावित्रीमाईने महिला सक्षमीकरण करण्यासाठी स्त्री शिक्षित झाली पाहिजे म्हणून अंगावर शेण चिखल दगड झेलले दारोदारी फिरून विद्यार्थी जमविले आणि त्यांना बुद्धीप्रामाण्यवादी बनवले.

शिक्षित महिला कोणापुढे नतमस्तक होऊ नये म्हणून विचार दिले. पण आज महिला प्रबोधनापासून दूर गेले आहेत. प्रत्येक भगिनींनी सावित्रीमाई फुले यांच खडतर जीवनप्रवास अभ्यासाव आणि ताटमानाने समाज प्रबोधन करावे, असे आवाहन मराठा सेवा संघाचे शहराध्यक्ष सुर्यकांत पाटील यांनी व्यक्त केले.

मराठा सेवा संघ संचलित छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेड सोलापूरच्यावतीने क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले जयंतीनिमित्त सोलापूर जिल्हा लेबर फेडरेशनच्या संचालक म्हणून अभिराज शिंदे, पुणे विभागीय बॉडी बिल्डर स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविलेले समाधान बाळासाहेब पुणेकर आणि कराटे स्पर्धेत राष्ट्रीय खेळाडूंचा सत्काराप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष डॉ. जी. के. देशमुख होते.

याचे आयोजन छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडचे शहराध्यक्ष हाजी मतीन बागवान आणि जिल्हाध्यक्ष म. शफीक रचभरे यांनी केले. याप्रसंगी तन्वीर गुलजार, राजू हुंडेकरी, बशीर सय्यद, हारुण शेख, राज पुणेकर, रिजवान शेख, रिजवान दंडोती, कादर भागानगरी, रियाज पैलवान आदी उपस्थित होते.



# जिल्हा परिषदेची फेब्रुवारीत अर्थसंकल्पीय सभा

## अर्थ विभागाने मागविल्या सर्व विभागाच्या तरतुदी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि ४ जानेवारी**

सोलापूर जिल्हा परिषदेचे सन २०२४-२५ चे सुधारित व २०२५-२६ चे मूळ अंदाजपत्रक सादर करण्यासाठी फेब्रुवारीच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात अर्थसंकल्पीय सभा आयोजित करण्यात येणार आहे. मुख्य लेखा वित्त अधिकारी मनीषा वाकडे यांनी अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यासाठी सर्व विभागाकडे आर्थिक तरतुदीची मागणी लेखी स्वरूपात सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

सध्या झेडपीच्या सर्वच विभागात अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर लगबग चालू झाली आहे. ४ मार्च २०२४ रोजी जिल्हा परिषदेच्या तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी जिल्हा परिषदेच्या स्वउत्पन्नाचे २०२३- २४ चे सुधारित व २०२४-२५ चे मूळ ४८ कोटी ११ लाख ६७ हजार रुपयांचा शिलकी अर्थसंकल्प सादर केला होता. २०२४-२५ च्या अंदाजपत्रकात ३ कोटी ४ लाख ९९ हजार इतकी वाढ करण्यात आली होती.

मागील अर्थसंकल्पात जिल्हा परिषद सेसच्या माध्यमातून ४८ कोटी ११ लाख ६७ हजार रुपयांची आवक मूळ अंदाजपत्रकात ग्राह्य धरण्यात आली होती. तर ४८ कोटी ०६ लाख ३३ हजार रुपये खर्च अपेक्षित धरण्यात आला आहे. आवक व खर्चातून ५ लाख ३४ हजार रुपये मूळ अर्थसंकल्पात शिल्लक अपेक्षित धरण्यात आली होती. यंदाच्या अंदाजपत्रकात मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम हे कोणत्या विभागाला झुकते माप देणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### शिक्षण, आरोग्य व ग्रामपंचायत विभागासाठी मोठी तरतूद

मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी विकास कामांचा फोकस शिक्षण, आरोग्य, महिला बालकल्याण व ग्रामपंचायत, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडे ठेवला आहे. त्यामुळे यंदाच्या अर्थसंकल्पात शिक्षण, आरोग्य, ग्रामपंचायत, महिला व बालकल्याण विभाग याबरोबरच पाणीपुरवठा विभागासाठी मोठी आर्थिक तरतूद केली जाण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.



### अर्थसंकल्पाची तयारी सुरु

सोलापूर जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्प फेब्रुवारीच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात सादर करण्यात येणार आहे. या संदर्भात सर्व विभागांना तरतुदीच्या मागणी लेखी स्वरुपात सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. याबाबत येत्या आठवडाभरात आढावा बैठका घेऊन अर्थसंकल्पाचे सुयोग्य असे नियोजन करण्यात येणार आहे.

**- कुलदीप जंगम, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सोलापूर.**

# 'वालचंद'मध्ये विद्यार्थ्यांना फूड फेस्टीव्हल अंतर्गत उद्यमशीलतेचे धडे

## आई फौंडेशनचे अध्यक्ष मोहन डांगरे यांच्याकडून विद्यार्थ्यांवर कौतुक सुमने

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जानेवारी -**



विद्यार्थ्यांमध्ये उदयमशील गुण अंगीकारण्या बरोबर यशस्वी उद्योजक बनविण्याच्या उद्देशाने हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स आणि वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'कॉमर्झ अरेना' या फूड फेस्टिवल मेळाव्याचे उदघाटन आई फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष श्री मोहन डांगरे यांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलनाने, फीत कापून आणि रंगीत फुगे आकाशात सोडून करण्यात आले. यावेळी वालचंद शिक्षण समूहाचे विश्वस्त पराग शहा, प्राचार्य डॉ सत्यजित शहा, डॉ.ओमप्रकाश अष्टनकर , प्राचार्य संतोष कोटी, प्राचार्य डॉ अश्विन बोदार्डे आदि उपस्थित होते.

श्री.मोहन डांगरे यांनी या अनोख्या उपक्रमाचे कौतुक करताना म्हणाले की, अशा उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास हातभार लागतो, आणि त्यांच्यातील उद्योजकता वाढीस लागते. तसेच विद्यार्थ्यांमधील उपक्रमशीलता, सर्जनशीलता, आणि व्यावसायिक दृष्टिकोन वाढतो. महाविद्यालयाने उपलब्ध करून दिलेल्या या संधीचा विद्यार्थ्यांनी पुरेपूर उपयोग करून घ्यावा, असे मार्गदर्शन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

'कॉमर्झ अरेना' या उपक्रमामध्ये महाविद्यालयातील ३५० विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष सहभाग होता. सर्व दालनांमधून नावीन्यपूर्ण खाद्यपदार्थ, आकर्षक जाहिरातीसह ग्राहकांना आकर्षित करणाऱ्या दालनांच्या सजावटी व त्यातून सर्वोत्कृष्ट दालन म्हणून बक्षिसे जाहीर करण्यात आली. यावेळी प्रदर्शनास सहा ते सात हजार खवय्यांनी भेट देऊन विविध खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला.

या मेळाव्यात भेळ, शेव-पुरी, पाणीपुरी, चायनिज भेळ, मन्चुरिअन, बास्केट चाट, मसाला खाकरा, कलकत्ता गुलाब जामून, सोलापुरी हुग्गी, फुर फुर वडे, मलई पनीर रबडी, आईसक्रिम, कोल्ड कॉफी, इटालीयन सॅन्डविच, स्वीट कोर्न कचोरी, मधुर वडे अशा विविध खाद्यपदार्थांची ७० दालने विद्यार्थ्यांनी उभी केली होती. नोकरी मागण्यापेक्षा नोकरी देणारे विद्यार्थी घडावेत आणि उद्योगशील कौशल्य आत्मसात करावे, या उद्देशाने महाविद्यालयाने हा कौतुकास्पद उपक्रम राबविला आहे.

वालचंद शिक्षण समूहातील विविध विभागातील विद्यार्थी, पालक, प्राध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी ग्राहक बनून या स्तुत्य उपक्रमात खाण्याचा आनंद लुटला, या मध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना उद्योजकतेच्या अनुभवासह व्यवसायिक कौशल्य प्राप्त होण्यास तज्ज्ञ शिक्षकांचे मोलाचे सहकार्य झाले.

## श्रीमय केसकर याचे आंतरराष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत प्रथम

**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**



श्रीमय श्रद्धा महेश केसकर याने आंतरराष्ट्रीय वेदिक मॅथ्स स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त केला. स्मार्ट किड्स अबॅकस आणि वेदिक मॅथ्स प्रा. लि. यांच्यातर्फे १४ वी राष्ट्रीय आणि ७ वी आंतरराष्ट्रीय अबॅकस आणि वेदिक मॅथ्स स्पर्धा पुणे येथे घेण्यात आली. या स्पर्धेत श्रीमय याने वेदिक अबॅकस मध्येही तिसरा क्रमांक मिळवला. तसेच गार्विक गीतांजली रवींद्र मुळे याने अबॅकस स्पर्धेत प्रथम तर वेदिक मॅथ्समध्ये तिसरा क्रमांक मिळवला. गीतांजली मुळे हिने बेस्ट फ्रेंचायसी म्हणून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळवले. श्रीमय केसकर आणि गार्विक मुळे यांना गीतांजली मुळे यांचे मार्गदर्शन लाभले.

## विनोदा अणवेकर यांचे निधन

**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**



भवानी पेठ येथील रहिवासी सराफ उद्योजक गजेंद्र ज्वेलर्सचे मालक सज्जन अणवेकर यांच्या मातोश्री विनोदा प्रभाकर अणवेकर (वय ७८) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुले ,सुना, नातवंडे असा परिवार आहे.



## रिझर्व्ह बँकेचे संचालक सतिश मराठे यांची विकास बँकेस भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ जानेवारी-**

विकास सहकारी बँक लि. येथे रिझर्व्ह बँक ऑफ़ इंडियाचे संचालक सतिश मराठे यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचा सत्कार बँकेचे चेअरमन कमल किशोरजी राठी यांनी केला.

याप्रसंगी विशेषतः सहकारी बँकानी छोट्या कर्जदारांना कर्ज वाटपविषयी रिझर्व्ह बँकेच्या धोरणाची माहिती दिली. या बाबतीत सहकारी बँकेच्या अडचणी समजून घेऊन रिझर्व्ह बँकेकडे सदर बाबतीत पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. त्यावेळी व्हा. चेअरमन राजगोपाल चंडक, राजगोपाल मिणीयार, हरिनिवास जाजू, राजकुमार राठी, ओमप्रकाश तिवाडी, नवनीत तोष्णीवाल, मनीष बलदवा, सुरेश बिटला, संचालिका अनुराधा चांडक व व्यवस्थापक पांडुरंग मंत्री व इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.




**अंगणवाडी आनंद मेळावा...**

**सोलापूर : क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जंयतीनिमित्त डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात अंगणवाडी महिला कर्मचाऱ्यांनी आनंद मेळाव्यात महिलांच्या सन्मानासाठी तोंडावर सावित्रीबाई फुले यांचे चित्र लावून निर्धार केला. (छायाचित्र : केवल तिवारी)**

# सोलापूर विद्यापीठाचा १० जानेवारीला २० वा दीक्षांत समारंभ

## राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची उपस्थिती राहणार

- १५ हजार २१९ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान होणार!
- ७१ संशोधकांना पीएच. डी पदवी तर ५७ सुवर्णपदकाचेही वितरण होणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा २० वा दीक्षांत समारंभ शुक्रवार, १० जानेवारी रोजी सकाळी अकरा वाजता विद्यापीठाच्या दीक्षांत मैदानात होणार असून यावेळी १५ हजार २९१ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत दिली.



याचबरोबर ७१ संशोधक विद्यार्थ्यांना पीएच. डी पदवी तर ५७ विद्यार्थ्यांना सुवर्णपदके देऊन सन्मानित करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. महाराष्ट्राचे महामहीम राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली हा समारंभ होणार आहे. या समारंभास प्रमुख अतिथी म्हणून इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी मुंबईचे कुलपती प्रा. जे. बी. जोशी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. प्रारंभी सकाळी साडेदहा वाजता प्रशासकीय इमारतीपासून ते दीक्षांत मंडपापर्यंत दीक्षांत मिरवणूक निघणार आहे. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे हे ज्ञानदंड हाती घेऊन मिरवणुकीच्या अग्रभागी असणार आहेत. त्यानंतर प्रत्यक्ष कार्यक्रमाला सुरुवात होईल. या समारंभात वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा, मानवविज्ञान विद्याशाखा, आंतर विद्याशाखा, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांना पदवी देऊन सन्मानित करण्यात येईल.

यावर्षी ७१ विद्यार्थ्यांना पीएच. डी पदवी प्रदान केली जाणार आहे. त्याचबरोबर यंदा ५७ विद्यार्थी सुवर्णपदकाचे मानकरी ठरले आहेत. विविध विषयात गुणानुक्रमे प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना देणगीदारांनी दिलेल्या रकमेतून सुवर्णपदक देऊन त्यांचा यथोचित सन्मान केला जातो. अशा एकूण ५७ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक देऊन सन्मानित केले जाणार आहे.

दीक्षांत समारंभाचा कार्यक्रम झाल्यानंतर महाविद्यालयांना पदवी प्रमाणपत्र वाटप केले जाणार आहे. यासाठी विद्यापीठ परीक्षा विभागाने खास सोय केलेली आहे. या पत्रकार परिषदेस प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव योगिनी घारे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे, वित्त व लेखा अधिकारी महादेव कराडे, उपकुलसचिव मलिक रोकडे, जंनसंपर्क अधिकारी राहूल वंजारे आदी उपस्थित होते.

### अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनचरित्राविषयी चित्रांचे प्रदर्शन

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त विद्यापीठामार्फत अहिल्यादेवी यांच्या जीवनचरित्र विषयांवरील चित्रांचे प्रदर्शन यानिमित्त आयोजन करण्यात आले आहे. या चित्रांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन राज्यपाल आणि मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. या प्रदर्शनात ५५ चित्रे ठेवण्यात येणार असून महाराष्ट्रातील मान्यवर चित्रकारांनी रेखाटलेली चित्रांचा यात समावेश आहे.

**CHANGE IN NAME**

I HAVE DECLAIRED THAT MY OLD NAME IS **Altaf Beg Shabbir Beg Mirza** HAS BEEN CHANGED TO **Altaf Shabbir Mirza**

Resi. - Railway Quarters, Modi Police Station Javal, Solapur.

**KINDLY NOTE THE SAME. (P-24110140)**

### चुकीची दुरुस्ती

**दै. तरुण भारत मध्ये दि. ०४/०१/२०२५ रोजी पान नं ५ वर प्रसिध्द केलेल्या ग्रामपंचायत भेंड टेंडर नोटीस जाहिरातीमध्ये लेखाशिष - भेंड ग्रामपंचायत १५ वा वित्त आयोग सन २०२४-१५ ग्रामनिधी असे नजरचुकीने छापून आले आहे. त्या ऐवजी लेखाशिष - भेंड ग्रामपंचायत १५ वा वित्त आयोग सन २०२४-२५ ग्रामनिधी असे वाचावे.**

**- जाहिरात व्यवस्थापक**

## बळीराजाच्या आर्थिक उन्नतीसाठी...

# 'धार्मिक पर्यटना'ला 'कृषी पर्यटना'ची द्यावी सांगड!


अविनाश गायकवाड
मो. ९४२१८७६३४०


आपल्या सोलापूर जिल्ह्यातील विविध तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी वर्षाकाठी दाही दिशातून तब्बल ३ कोटीपर्यंत भाविकांची वर्दळ असते; यामुळे जिल्ह्यातील शेतकरी बांधवांनी शेतीला जोड व्यवसाय म्हणून कृषी पर्यटनाकडे वळावे आणि येणाऱ्या धार्मिक पर्यटनप्रेमींना धार्मिक पर्यटनाबरोबर कृषी पर्यटनाचाही आनंद द्यावा. एकंदरीत धार्मिक पर्यटनाला आता कृषी पर्यटनाची सांगड घालण्याची वेळ असून, यातून शेतकरी बांधवांसह स्थानिक युवकांनाही रोजगार निर्मिती होते. इतकेच नाहीतर ग्रामीण संस्कृती, परंपरा, कलाकृती लोप पावत चालल्या आहेत. पूर्वी गावागावातील महिलांचा गट प्रत्येक घरा घरात जाऊन गाणी गायचे. जुने गाणी, कथा, संस्कृती, परंपरा नष्ट होत आहेत. हे सर्व कृषी पर्यटनाच्या माध्यमातून जतन करता येईल. गावातील ग्राम ीण संस्कृती संपत आहे. ग्रामीण भागात पूर्वी लुगडे, धोतर पगडी परिधान करत असत. गावातील संस्कृतीवर शहरांचा पगडा वाढत आहे. गावातील



घरे, रस्ते, गल्लीबोळ यात मोठ्या प्रमाणत बदल होत आहेत. पूर्वीची कौलारू घरे, घर शेणाने सारवणे, घराची रचना, अंगण तसेच वेशभूषा, केशभूषा, पारंपरिक पेहराव, राहणीमान, बोलीभाषा, चित्रकला इ. चे जतन आणि संवर्धन पर्यटन केंद्राच्या माध्यमातून होत आहे. शहरी भागातील पर्यटक मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागात येतात. त्यांना ग्रामीण संस्कृतचे विशेष आकर्षण असते. कृषी पर्यटनातून लोक ग्रामीण जीवन पाहतात, अनुभवतात आणि जगतात. यातूनच आपल्या ग्रामीण संस्कृतीचे संवर्धन होते.

### गावाची एक वेगळी ओळख निर्माण होते

कृषी पर्यटन केंद्र उभारणीसाठी मनुष्यबळ लागते. पर्यटकांचे नियोजन, मार्गदर्शन, स्वयंपाकासाठी, शेतीकामासाठी, माळी काम, लॉड्री, ट्रेकिंग, बोटिंग, शिवार फेरी, बाजार खरेदी, ऑनलाईन मार्केटिंग, जाहिराती, व्यवस्थापनासाठी मोठ्या प्रमाणत कामगार लागतात. काही केंद्रांवर हंगामी कामगार काम करतात बैलगाडी, टॅक्टर, उंट, विहिरीत पोहणे, यासाठी प्रशिक्षकांची गरज भासते. यामुळे ग्रामीण भागातच रोजगार मिळू शकेल. ग्रामीण भागात महिला पुरणपोळी, भाकरी, विविध प्रकारच्या चटणी बनवतात. या कौशल्याचा उपयोग करून त्या मोठ्या प्रमाणात कृषी केंद्रासाठी रोजगार निर्माण करू शकतात. तसेच ग्रामीण भागातील पापड, लोणचं, स्थानिक खाद्य पदार्थ तयार करून कृषी पर्यटन केंद्रावर विक्रीसाठी ठेवता येते. स्थानिक कलाकार, हस्तकला, कलाकृती, दुर्मिळ वास्तू इ. दाखवण्यासाठीही मनुष्यबळाची गरज भासते. या व्यतिरिक्त प्रत्येक गावाची एक वेगळी ओळख व वैशिष्ट्य असते. नदी, ओढे, विहारी तलाव, धरण, शेततळे इत्यादी ठिकाणी रोजगार निर्मिती होते. सुतार, कुंभार, लोहार, यांच्या वस्तू पर्यटक खरेदी करतात. जत्रा यात्रा, उरूस, महोत्सव (आंबा, अंगूर) इ महोत्सवात पर्यटक सहभाग नोंदवतात आणि यातून गावातील प्रत्येक कलेचे संवर्धन होते. इतकेच नाहीतर याद्वारे आपापल्या गावाची एक वेगळी ओळख निर्माण होते.



### गावच्या विकासाला प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मदत

कृषी पर्यटन ही ग्रामीण विकास मधील संधी नव्हे तर सुवर्णसंधी आहे. पर्यटक कृषी पर्यटन केंद्रात राहण्यासाठी येतात. गावात, शेतात फिरतात. ग्रामीण भागात काही दुर्मिळ औषध वनस्पती, विविध रोपांचे निर्मिती केले जाते. या दुर्मिळ घटकांची माहिती पर्यटकांना नसते. गावात एखादी मोठी नर्सरी असेल, फळबाग असेल, प्रसिद्ध ठिकाण, गूळ निर्मित केंद्र, अशा ठिकाणी फिरतात आणि वस्तू खरेदी करू शकतात. यामुळे ग्रामीण भागाचा व्यवसाय वाढतो. यातून गावाचा विकास होण्यास मदत होते. ग्रामीण भागातील वस्तू शहरात जाऊन विक्री करण्यापेक्षा तीच वस्तू जर कृषी पर्यटन केंद्रावर मिळत असेल शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळेल. यातून गावच्या विकासाला प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मदत होते.



### शहराकडे जाणारे तरूणांचे लोंढे थांबतील

कृषी पर्यटनातून ग्रामविकास आणि ग्रामविकासातून महाराष्ट्राचा विकास या संकल्पनेतून कृषी पर्यटनाचा विकास करता येईल. ग्रामीण भागातील तरुणांची संख्या शहराकडे येत आहेत. याचे मुख्य कारण म्हणजे बेरोजगारी होय. ग्रामीण भागात कोणतेच व्यवसाय, उद्योग मोठे नाहीत. काही छोटे मोठे व्यवसाय आहेत पण कामगारांना पगार कमी आहे. इतर सोई-सुविधा नाही. या म हागाईच्या काळात पाच-सहा हजार पगार परवडत नाही. यामुळे तरुणांचा ओढा शहराकडे मोठ्या प्रमाणत वाढत आहे. हे स्थलांतर थांबवायचे असेल तर कृषी पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार निर्मिती होण्यास वाव आहे. गावाचा इतिहास, गावाबद्दल माहिती असलेल्या तरुणांनी पर्यटकांना माहिती सांगण्याचे काम तरुणांच्या माध्यामतून होऊ शकते. गावाचा इतिहास, संस्कृती, विविध वनसंपती यांविषयी माहिती हे तरुण पर्यटकांना देऊ शकतात. यातून गावाची संस्कृती जपली जाते आणि प्रत्येक पर्यटन केंद्रांना कमीत कमी पाच, जास्तीत जास्त शंभर लोकांनाही रोजगार मिळू शकतो.



### शासनस्तरावरूनही शेतकऱ्यांसाठी राबताहेत विविध योजना

राष्ट्रीय कृषी विकास योजना, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान आदींसह इतरही योजनांद्वारे शेतकरी आणि शेतकरी कंपन्यांना सहकार्य शासन सहकार्य करीत आहे. यामध्ये सोलार पंप असो, शेततळी, पिकविमा, कोल्ड स्टोअरेज, पॉलिहाऊस, विविध कृषी विषयक औजारे, सवलतीच्या दरात ट्रॅक्टर्स देणे, माती नमुने तपासून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे, खते, बि-बियाणे आदींचाही शासनस्तरावरून मुबलक पुरवठा होतो. सोलापूर जिल्ह्यातील विविध ठिकाणच्या बाजारपेठातही अत्याधुनिक शेतीसाठी विविध यंत्रे, तंत्रज्ञान येवू लागल्याने कृषी व्यवसाय करणारे शेतकरी आता डिजीटल शेतकरी होवू लागले आहेत आणि आता हेच शेतकरी कृषी पर्यटन क्षेत्रातही उतरू लागले आहेत.



### शेतकरी आत्महत्या थांबतील

दुष्काळी स्थिती किंवा अतिवृष्टीमुळे शेतकरी दादा सतत अडचणीत येत असतो. याचा फटका कुटुंबाला आणि अप्रत्यक्ष गावाच्या आर्थिक उलाढालीत जाणवतो. शेतकरी नेहमीच आर्थिक अडचणीत जीवन जगत असतो. या सगळ्यातून बाहेर पडायचे किंवा मार्ग काढायचा असेल तर काही तरी शेती पूरक व्यवसाय करणे जिकीरीचे ठरत आहे. मराठवाडा आणि विदर्भात तर शेतकऱ्यांच्या जास्त आत्महत्या होतात. कृषी पर्यटनाच्या माध्यमातून या आत्महत्या आपण रोखू शकतो. कृषी पर्यटनाच्या माध्यमातून आज असंख्य शेतकरी आपल्या पायवर उभे राहत आहेत. शेतकरी ताठ मानेने गावात कृषी व्यवसाय करत आहेत. या व्यवसायातून कुटुंबाचा आणि पर्यायाने गावाचाही विकास होताना दिसत आहे.



### गावातील कलाकृती दाखविण्याची नामी संधी

गावातील काही महिला बचत गट असेल तर त्यांचे पापड, लोणचं (आंबा, आवळा, लिबु) शेवई इ. ग्राहक थेट खरेदी करू शकतात. तसेच परिसरातील ऐतिहासिक, धार्मिक, धरण, धबधबा, या ठिकाणी अनेक छोटे मोठे दुकान, टपरी लावून स्थानिक लोक व्यवसाय करतात. यातून गावाचा नक्कीच विकास होते. गावातील कलाकृती उदाः बांबूचे टोपले, सूप बनवणे तसेच नीरा काढणे, मध काढणे तसेच इतर ग्रामीण भागातील पदार्थ वस्तू विक्रीतून विकास होऊ शकते. भाजीपाला लागवड, पशुपक्षी व्यवस्थापन, स्वयंचलित खत देणारी प्रणाली, चारा पिके, पॉलीहाऊस, फळप्रक्रिया, बीजप्रक्रिया, कृषी पर्यटन, शेततळी, पाणी देण्याची विविध पद्धती येथे एकाच ठिकाणी शेतकऱ्यांना पाहायला मिळणार आहे.



### पंचतारांकीत हॉटेललाही लाजवेल बळीराजाचे पर्यटन केंद्र

शेतातच सुंदर मैदानाची निर्मिती करणे, त्या मैदानात काही प्रकारची झाडे लावणे... त्या झाडांना पूरक पाणी... येणाऱ्या पाहुण्यांसाठी चांगला रस्ता व काही खुर्च्या, मध्यम स्वरूपाचे टेबल... एक किंवा दोन लाकडी पलंग... जेवणासाठी लागणारी सर्व भांडी... रात्रीला लाईट, पांघरून, गाद्या, उशांची सोय असावी. सकाळी नाश्त्याची सोय...नैसर्गिक हवेसाठी गडद सावली... स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय... आकर्षक मेणबत्त्या जेणेकरून रात्रीला पाहुणे बोर होणार नाहीत...सोबतच मनोरंजनासाठी काही साउंड सिस्टम... दोन ते तीन वेळा चहाची सोय... सकाळी अंघोळीसाठी गरम पाण्याची सोय... टॉयलेट बाधरुम...टीव्हीची सोय. जेणेकरून आलेल्या पाहुण्यांचा चांगला पाहुणचारही होईल आणि आपली आर्थिक प्रगती होईल. थोडक्यात सांगायचे म्हणजे शहरातील पंचतारांकीत हॉटेललाही हे बळीराजाचे पर्यटन केंद्र लाजवेल, यात शंकाच नाही. कृषी पर्यटन केंद्र आहे. पण त्याचे पर्यावरणाशी घट्ट नाते जुळलेले असावे. म्हणजे त्याठिकाणी शक्यतो प्लास्टिक, सनमायक, इत्यादी गोष्टी टाळा. येणारे पर्यटक ते शेतावर येत आहेत याची अधिक जाणीव करून द्यावी. म्हणजे, एअर कंडिशन व स्विमिंग पूल, च्या अभावी ते मोकळ्या मनाने पश्चिमेचा गार वारा व नदीत पोहणे, याचा आनंद लुटू शकतील.





### महिनाकाठी लाखोंची उलाढाल

कृषी पर्यटन हा एक शेती पूरक व्यवसाय आहे जो की, आज काल बरेचसे शेतकरी या व्यवसायाकडे वळले आहेत. आपल्या सोलापूर जिल्ह्यातही १०० पेक्षा जास्त कृषी पर्यटन केंद्रांची निर्मिती झाली आहे. कारण कमी खर्चात जास्त उत्पन्न देणाऱ्या व्यवसायांमध्ये हा एक व्यवसाय आहे. एक वेळा यासाठी निर्मितीचा खर्च केला की नंतर कोणत्याही प्रकारची आर्थिक तजवीज करावी लागत नाही. उत्पन्नही भरघोस आहे. यामुळे कृषी पर्यटनातून लाखोंची उलाढाल होवू शकते. पडीक जमिनीवरही हा उद्योग उभारता येवू शकतो.

### उजनी जलपर्यटनाची 'पहाट' लवकरच उगवेल



जिल्ह्यासह राज्यातील पर्यटन विकासाला चालना देण्याबरोबरच स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरण परिसरातील २८२ कोटी ७५ लाख रुपयांच्या एकात्मिक जल पर्यटन विकास आराखड्याला शासनाकडून सप्टेंबर २०२४ मध्ये म्हणजे निवडणूक आचारसंहितेच्या अगोदरच मंजुरी मिळाली होती. याच्या प्रत्यक्ष कामाला आता लवकरच सुरूवात होणार असून, प्रारंभी या जलाशयात चालविण्यात येणाऱ्या विविध स्वरूपाच्या प्रवाशी बोटींची निविदा लवकरच काढण्यात येवून आता कृषी पर्यटनाबरोबर उजनी जलपर्यटनाची नवी पहाटही लवकरच उगवणार आहे. या आराखड्यात धार्मिक पर्यटनासाठी २५ कोटी, जल पर्यटनासाठी १९०.१९ कोटी, कृषी पर्यटनासाठी १९.३० कोटी, विनयार्ड पर्यटनासाठी ४८.२६ कोटी रुपयांची तरतूद आहे. यामुळे सोलापूरकरांचे हे उजनी पर्यटनाचे स्वप्न लवकरच मार्गी लागून राज्यातील पर्यटन विकासालाही गती मिळणार आहे. यातून सोलापूरच्या हजारो युवकांना रोजगार निर्माण होईल.

**- कुमार आशीर्वाद, जिल्हाधिकारी सोलापूर**

### गावांचा आर्थिकस्तर उंचावेल



गावोगाव कृषी पर्यटनाचा ध्यास घेवून शेतकरी बांधवांनी याची निर्मिती केली तर अनेकांना आपल्या गावातच रोजगार निर्माण होईल. गावाचा आणि शेतीचा विकास, गावच्या आर्थिक स्तर उंचावेल. रोजगार संधी, शेती मालाला बाजारपेठ, शेतकऱ्यांना पैसा आणि प्रतिष्ठा, ग्रामीण महिलांचे सबलीकरण, स्थानिक कलाकारांना व्यासपीठ, ग्रामीण व शहरी संस्कृतीचा संगम, माहिताचे संक्रमण, उज्ज्वल भविष्य, ग्रामीण लोककला / संस्कृतीचे संरक्षण, शाश्वत शेती आणि पर्यटन, विविधतेत एकता, औषध वनस्पतीचे संवर्धन, शैक्षणिक सहलीचे ठिकाण, सेंद्रिय शेतीचा प्रसार अशी अनेक आव्हाने कृषी पर्यटन क्षेत्रात आहेत.

**- अमृत नाटेकर,**
**महसूल उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा पर्यटन अधिकारी**

### कृषी प्रदर्शनाद्वारे रोज १२०० शेतकऱ्यांना मार्गदर्शन



सोलापूर येथील श्री सिध्देश्वर गड्डा यात्रेनिमित्त होम मैदानावर श्री सिध्देश्वर देवस्थान समितीच्या वतीने प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात कृषी विभागाचेही दोन स्वतंत्र स्टॉल लावण्यात येणार आहेत. या स्टॉलमधून रोज ३ तालुक्यातील १२०० शेतकऱ्यांना कृषीविषयक मार्गदर्शन करण्यात आले. यामुळे अनेक शेतकरी अत्याधुनिक शेती करण्याकडे वळतील, हा त्यांचा हेतू होता. या प्रदर्शनात जिल्ह्यातील काही शेतकऱ्यांनी शेतात घेतलेल्या दर्जेदार पिकांचे नमुनेही ठेवले होते. गुणवत्ताधारक पीक काढणाऱ्या शेतकऱ्यांचा सत्कार सोहळाही यंदा पार पडला. एकंदरीत, शेतीबाबत प्रचार, प्रसिध्दी करण्याचे काम आम्ही या यात्रेद्वारे प्रतिवर्षी करीत असतो.

**- शुक्राचार्य भोसले,**
**जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, सोलापूर**

### शासनस्तरावरून कृषीपर्यटनाचा प्रचार-प्रसार व्हावा



जिल्हाभरातील विविध ठिकाणी आता धार्मिक पर्यटनाबरोबर कृषी पर्यटनाचीही निर्मिती होवू लागली आहे. शासनाच्या नियमानुसार या कृषी पर्यटनाची आम्ही रचना केली आहे. यासाठी शासन स्तरावर आर्थिक मदत नाहीतर किमान प्रचार, प्रसार करण्यासाठी सहकार्य करावे. प्रशासनाकडून सोलापुरी अस्सल हुरडा, शेंगा चटणी, बोरे आदींची मार्केटिंग झाली तर आम्हीही आपल्या येथील युवावर्गाला रोजगार मिळवून देवू.

**- लहू आवताडे,**
**संस्थापक सीनाई ॲग्रो टुरिझम ॲन्ड रिसॉर्ट सेंटर**

### विदेशातही अस्सल सोलापुरी हुरड्याची क्रेझ...



मी अनेकदा पदरमोड करून सोलापूरचा अस्सल हुरडा, शेंगा चटणी, कडक भाकरीची आपल्या देशातच नाहीतर विविध देशातही मार्केटिंग केली आहे. आता किलोवर नाहीतर टनावर मला ऑर्डर येत आहेत. हुरडा, बाजरीची कडक भाकरी, शेंगा चटणीला मोठ्या प्रमाणात मागणी आहे. शेकडो महिलांना मी आता रोजगार देत आहे. माझे कृषी पर्यटनाचे प्रयत्न यशस्वी झाल्याने अनेक लोक माझ्या कृषी पर्यटनात सहकुटुंब येवून हुरडा पार्टीचा आस्वाद घेवू लागले आहेत. यामुळे माझ्यासह अनेकांना रोजगार निर्मिती झाली आहे.

**- काशिनाथ भतगुणकी,**
**कृषी पर्यटक केंद्र चालक, सोलापूर**

### भविष्यात कृषी पर्यटन हा सर्वोत्तम जोडधंदा



निसर्गाचा लहरीपणा, कोरडा दुष्काळ, ओला दुष्काळ, बदलते ऋतुचक्र, पर्यावरणाचे असमतोल अशा निसर्गाच्या संकटात शेतकरी सापडला आहे. भारत हा कृषीप्रधान देश आहे. आदिम काळापासूनच शेती केली जाते. याच शेतीवर अनेक पिढ्या आपला उदरनिर्वाह करीत आल्या आहेत. पूर्वीची शेती करण्याची पद्धत आणि आताच्या पद्धतीत मोठ्या प्रमाणात बदल झाले आहेत. या बदलांसह शेतीपूरक व्यवसायातही अनेक बदल झाले आहेत. काळानुसार बदलणे हे विकासाचे तसेच समृद्धी मार्गावर जाण्याचे लक्षण आहे. शेतीपूरक अनेक व्यवसाय आहेत. त्यापैकी एक म्हणेज कृषी पर्यटन. कृषी पर्यटनाचे वाढते महत्त्व लक्षात घेता, भविष्यात कृषी पर्यटन हा सर्वोत्तम जोडधंदा नक्कीच ठरेल. असे वाटते.

### कृषी पर्यटन केंद्राची वैशिष्ट्ये

कृषी पर्यटन केंद्र उभे करण्यासाठी लागणारा खर्च फार मोठा नसून आणि तोही एकदाच करावा लागतो. यातून पारंपरिक भारतीय संस्कृतीचे दर्शन, जतन व संवर्धन होण्याची शक्यता आहे. पर्यटन केंद्र निसर्गाशी संबंधित असल्यामुळे पर्यावरण मैत्रीचे नियम आवर्जून पाळले जातील. शहर व खेड्यातील बांधवांच्या ओळखीतून मैत्रीचा नवा मार्ग निर्माण होईल. संपत्ती व ज्ञानाचा शहराकडून खेड्याकडे प्रवास सुरु होईल.

## संक्षिप्त वृत्त



### कुचन प्रशालेत बालिका दिन उत्साहात

**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

कुचन प्रशाला, कनिष्ठ महाविद्यालय व व्यवसाय शिक्षण विभागात आज बालिका दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रथमतः प्राचार्य युवराज मेटे व उपप्राचार्य अनिल निंबाळकर यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सावित्रीबाई फुले यांच्या वेशभूषेत आलेल्या संजना झगवे, दीक्षा डोंगिल, शुभ्रा देशमुख, आराध्या चव्हाण, जोया शेख यांनी सावित्रीबाईवर आधारित ओव्यांचे गायन केले. सिद्धार्थ येलुटला याने तत्कालीन परिस्थितीत सावित्रीबाईंना आलेल्या अडचणी व त्या अडचणीवर मात करत महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाची ही गंगा अविरत कशी वाहती ठेवली याची माहिती दिली. प्रेरणा श्रावणकर हिने मुलींना शिक्षणाचे द्वार उघडले गेल्याने ज्ञानाच्या पंख बळकट झाले. त्यामुळे आज अनेक स्त्रिया या विविध क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत असल्याचे मत आपल्या भाषणातून व्यक्त केले. याप्रसंगी उपमुख्याध्यापक मधुकर धर्मसाले, पर्यवेक्षक दत्तात्रय मेरगू, प्रणिता सामल, मल्लिकार्जुन जोकारे व कविता गेंगाणे उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन माधुरी कुलकर्णी यांनी केले.



### मूकबधीर विद्यार्थ्यांनी साकारले क्रांतिज्योती सावित्रीबाईंचे कार्य

**सोलापूर, दि. ४ जानेवारी -**

येथील रोटरी नॉर्थ राधा किशन फोमारा मूकबधिर विद्यालयात क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रारंभी उपस्थितांचे स्वागत आणि कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या मुख्याध्यापिका क्षितिजा गाताडे यांनी केले. कार्यक्रमास लाभलेल्या प्रमुख पाहुण्या रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थच्या अध्यक्षा डॉ. जानवी माखिजा आणि शाळेचे सचिव सुनील दावडा यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन आणि दीप प्रज्वलन करण्यात आले. या प्रसंगी स्वाती भंडारी या विद्यार्थिनीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्याबद्दलचे आपले विचार भाषणातून व्यक्त केले. तीन जानेवारी हा दिवस सावित्री बाईंचा जन्मदिवस - बालिका दिंन म्हणून साजरा केला जातो. त्या निमित्ताने शाळेतील बालिकांना शालेय साहित्य देण्यात आले.

या कार्यक्रमास सुनील दावडा, दौलत सीताफळे, बळीराम पावडे, रेणुका पसपुळे, संध्या चंदनशिवे, विजया पितालकर, योगिता बोधले, गजानन गडगे, नागनाथ बासाते ,सोमनाथ ठाकर, दिनेश ताटे,सकलेन बडे खान आनंद पारेकर, विठ्ठल सातपुते, चिदानंद बेनुरे, गंगाधर मदभावी, अजित पाटील, साहेबगौडा पाटील, सोमनाथ थोरात, बाबासाहेब पवार, शनाना शेख आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आभार गंगाधर मदभावी यांनी मानले.



### पोलिस रेझिंग डे निमित्त जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात महिला दक्षता समितीची बैठक

**सोलापूर, दि. ४ जानेवारी -**

जोडभावीपेठ पोलीस ठाणे येथे पोलीस रेझिंग डे च्या अनुषंगाने पोलीस ठाणे अंतर्गत महिला दक्षता समितीची बैठक घेण्यात आली.

३ जानेवारी रोजी सायंकाळी जोडभावी पेठ पोलीस ठाणे येथे पोलीस ठाणे हद्दीतील महिला दक्षता समितीची मिटींग सहाय्यक पोलीस आयुक्त प्रताप पोमण, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुहास चव्हाण, पोलीस निरीक्षक शबनम शेख , पोलीस उप-निरीक्षक नसीपुन शेख इतर पोलीस स्टाफ व महिला दक्षता समिती सदस्य यांच्या उपस्थितीत घेण्यात आली. या बैठकीमध्ये पोलीस रेझिंग डे चे महत्व, समाजामध्ये महिलांना कोणकोणत्या समस्या येतात, पोलीसांच्या वतीने महिला व बालकांच्या सुरक्षिततेबाबत कोणकोणत्या उपाययोजना राबविल्या जातात याबाबत माहिती देण्यात आली. तसेच प्रसार माध्यमांचा उपयोग कसा करावा व सोशल मिडीया वापराचे फायदे व तोटे समजावून सांगण्यात आले. महिला व मुलींचे तसेच कौटुंबीक हिंसाचार किंवा छळातील पिडीत महिलेचे समुपदेशन करणेकरिता मदत करण्याकरिता चर्चा करण्यात आली. महिलांना समाजामध्ये कोणकोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते याबाबत उपस्थित महिलांची मते जाणून घेण्यात आली. या बैठकीमध्ये उपस्थित महिलांनी शाळा, कॉलेज, ट्युशन या ठिकाणी वेळोवेळी गस्त वाढविण्याबाबत तसेच इतर सोयायटीमध्ये पोलीस ठाणेच्या वतीने महिलांची अधिकाधिक मिटींग घेवून कायद्याबाबत योग्य ते मार्गदर्शन करण्याबाबत सुचविण्यात आले. त्यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुहास चव्हाण यांनी शाळा, कॉलेज, ट्युशन येथे गस्त वाढविण्याबाबत व सोसायटी मध्ये पोलीसांच्या वतीने आश्वासन दिले.या बैठकीकरिता दक्षता समितीच्या सदस्या मत्स्यगंधा चंद्रशेखर सुत्रावे, ॲड किर्ती हिरेमठ, डॉ. सोनाली घोंगडे, लताताई विजयकुमार फुटाणे, उषा भिमपुरे, वंदना अजित गायकवाड, कोमल बेंगाने, अपर्णा बुरांडे, राजश्री बैलकुरमठ, रोहिणी हांडगे, गौरी भिमपुरे आदी महिला उपस्थित होत्या.

# चारही ऋणातून मुक्त होणे हे सर्वांचे कर्तव्य : श्रीशैल जगद्गुरु

## मल्लिकार्जुन देवस्थान ट्रस्टतर्फे डॉ. शैलेश पाटील यांचा गौरव

**तीन जगद्गुरूंच्या उपस्थितीत समारंभ थाटात**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

शास्त्रात चार प्रकारच्या ऋणांचा उल्लेख आहे. मातृ, पितृ गुरु आणि समाज ऋण या चारही ऋणातून मुक्त होणे हे सर्वांचे कर्तव्य आहे. डॉ. शैलेश पाटील हे चारही ऋणातून मुक्त होण्याचा मनोभावे प्रयत्न करतात आहेत. ही समाधानाची बाब आहे. विनय व विद्या जवळ असते तो पात्र ठरतो. त्यांच्याजवळ धन येते. तेच धन धर्मासाठी योग्य आहे. तोच मनुष्य जीवनात सुखी समाधानी राहू शकतो. पाटील यांच्याकडे सर्व गुण आहेत, असे प्रतिपादन श्रीशैल जगद्गुरु डॉ. पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामी यांनी केले.

ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन देवस्थान ट्रस्ट शेळगी यांच्या वतीने उज्जैन, श्रीशैलम आणि काशीपीठ समितीवर ट्रस्टी म्हणून निवड झाल्याबद्दल तसेच त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून हृदयम हॉस्पिटलचे प्रमुख डॉ. शैलेश पाटील यांचा गौरव समारंभ भवानी पेठ येथील पाटील इस्टेट येथे उज्जैन जगद्गुरु सिद्धलिंग राजदेशीकेंद्र शिवाचार्य महास्वामी, श्रीशैल जगद्गुरु डॉ. पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामी व काशी जगद्गुरू डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य महास्वामीजी यांच्या दिव्य सान्निध्यात शुक्रवारी सायंकाळी थाटात पार पडला. त्याचबरोबर नवनिर्वाचित आमदार आणि विविध क्षेत्रांतील पदाधिकाऱ्यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी ते बोलत होते.

या गौरव समारंभाचे स्वागताध्यक्ष औसाचे माजी आमदार बसवराज पाटील हे होते तर अध्यक्षस्थानी आ. विजयकुमार देशमुख हे होते. या गौरव समारंभास नागणसूरचे श्रीकंठ शिवाचार्य महास्वामीजी, मैंदर्गीचे नीलकंठ शिवाचार्य महास्वामीजी, शहापूरचे सुगरेश्वर शिवाचार्य महास्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ. शैलेश पाटील आणि डॉ. मनीषा पाटील यांचा जगद्गुरुंच्या अमृतहस्ते कृपा वस्त्र आणि प्रतिमा देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी आ. देवेंद्र कोठे, उमाकांत आचवले (चाकूर), आदिनाथ सांगवे (लातूर),माधवराव पाटील (लातूर), माधवराज पाटील (लातूर), प्रदीपकुमार दिंडेगावे (लातूर) आदी मान्यवरांचा यावेळी सन्मान करण्यात आला. याप्रसंगी होटगी संस्थेच्या सचिव शांतय्या स्वामी, शरणाप्पा स्वामी हिरेमठ, बसवराज शास्त्री हिरेमठ, शिवयोगी शास्त्री हिरेमठ, विश्वजित नंदीमठ शेळगी , अन्नछत्र मंडळाचे अध्यक्ष जन्मेजय राजे भोसले, डॉ. राजेंद्र घुली, ॲड. नितिन हबीब, स्वामी समर्थ सूतगिरणीचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे, उद्योजक शिरीष उटगे, निराणी शुगरचे रविकांत पाटील, मनोरमा परिवाराचे प्रमुख श्रीकांत मोरे , बाजार समितीचे संचालक केदार उंबरजे, बसवराज इटकळे, रंजीता चाकोते, पूर्ण सोलापूर सिद्धाराम चाकोते, सुदीप चाकोते, आनंद तानवडे , माजी नगरसेवक डॉ. किरण देशमुख, अविनाश पाटील, गुरुशांत धुत्तरगावकर, नागेश भोगडे, अनंत जाधव, भाजपचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे, भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार, ज्ञानेश्वर कारभारी, प्रकाश हत्ती, ॲड. अमित आळंगे, कृष्णा हिरेमठ, संजय कणके यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष जगदीश पाटील, जयश्री पाटील, सतीश पाटील, सुनील पाटील, दिलीप पाटील, प्रकाश पाटील आदींसह पाटील परिवार उपस्थित होता. प्रास्ताविक वेदमूर्ती सिद्धया हिरेमठ यांनी केले. स्वागत ट्रस्टी ॲड. केदार पाटील यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. स्वामिनाथ कलशेट्टी यांनी केले. उज्जैन जगद्गुरु म्हणाले, मनुष्य जीवनाचे सार्थक धर्म परंपरा आणि गुरुपरंपरा जोपासण्यात आहे. डॉ. शैलेश पाटील हे वृत्तीने डॉक्टर असले तरी प्रवृत्तीने धर्मपरायण आहेत. काशी जगद्गुरू यांचेही आशीर्वचन झाले.



### डॉ. पाटील यांची वैद्यकीयबरोबरच धार्मिक, सामाजिक सेवा : आ. देशमुख

अध्यक्षीय भाषणात आ. विजयकुमार देशमुख म्हणाले, सोलापुरात डॉ. शैलेश पाटील हे एकमेव व्यक्ती आहेत की या तिन्ही पिठांवर ट्रस्टी म्हणून त्यांची नियुक्ती झाली. तिन्ही पिठाच्या ट्रस्टी पदावर नियुक्ती झाली ही गौरवास्पद बाब आहे. आपल्या वैद्यकीय क्षेत्रामध्ये काम करत करत त्यांनी अध्यात्मिक, धार्मिक, सामाजिक क्षेत्रातही सेवा दिली. आपल्या सगळ्यांना पाटील परिवारामुळे तिन्ही जगतगुरु एकत्र येऊन आपल्याला आशीर्वाद घेण्याचा योग आला.

### वैद्यकीय सेवा देताना पैशाचा विचार केला नाही : डॉ. पाटील

सत्काराला उत्तर देताना डॉ. शैलेश पाटील म्हणाले, तिन्ही पिठांच्या सेवेची संधी मला या माध्यमातून मिळाली मी कृतज्ञ आहे. सर्व जगद्गुरूंचा ऋणी आहे. माझ्या कुटुंबाचा आध्यात्मिक वारसा आहे. माझे पणजोबा, खापर पणजोबा, आजोबा मल्लिकार्जुन पाटील व वडील हे पोलीस पाटील म्हणून लोकसेवा केली आणि त्याचबरोबर त्यांनी आध्यात्मिक सेवा सुद्धा केली. जर्मनीमध्ये काम करण्याची संधी मिळाली होती मात्र मातृभूमीची सेवा करावी या उद्देशातून सोलापुरात थांबलो. वैद्यकीय सेवा देताना पैशाचा विचार केला नाही. केवळ चांगली सेवा देण्याचा प्रयत्न मी करीत आहे. त्यांचे सर्वांचे आशीर्वाद मला मदत केली मिळाले. मोठे इन्स्टिट्यूट उभारून अधिकाधिक लोकांना वैद्यकीय सेवा देण्याचा मानस त्यांनी यावेळी व्यक्त केला.

## ज्योतिबा-सावित्री पुरस्काराने डॉ.अंजली शिरसी-आलेगावी सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

प्रहार शिक्षक संघटनेकडून दिला जाणाऱ्या यंदाचा सन २०२५ सालच्या ज्योतिबा-सावित्री पुरस्काराने सेवासदन प्रशालेच्या शिक्षिका डॉ. अंजली शिरसी-आलेगावी यांना सन्मानित करण्यात आले.



जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिनजी जगताप, मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी प्रमुख मंगेश चिवटे यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण झाले. याप्रसंगी प्रहार शिक्षक संघटनेचे अध्यक्ष सचिन नागटिळक आणि संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ. अंजली शिरसी-आलेगावी यांच्यावर सर्वस्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. डॉ. अंजली शिरसी-आलेगावी यांना आजपर्यंत अनेक नामांकित पुरस्कारांनी गौरविण्यात आलेले आहे.



## अय्यप्पास्वामी अन्नदान सेवा संघातर्फे महापडीपूजा भक्तिभावात

**केरळहून आलेले गुरूस्वामी कृष्णन कल्लमपिल्ले यांच्या दिव्य सान्निध्यात पूजाविधी**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ जानेवारी -**

अक्कलकोट रोड एमआयडीसी भंडारी सन्निधानम् येथील श्री. अय्यप्पास्वामी अन्नदान सेवा संघातर्फे शनिवारी श्री अय्यप्पास्वामींची महापडीपूजा (१८ पायऱ्यांची पूजा) व लक्षपुष्पार्चना कार्यक्रम मोठ्या भक्तिभावात पार पडला. या निमित्त सुमारे ११ हजार ५०० भाविकांना महाप्रसाद देण्यात आला. कार्तिक पौर्णिमा ते मकर संक्रांती अशा ४१ दिवसांच्या कालावधीत अय्यप्पास्वामींचे भक्तगण कडक अनुष्ठान (व्रत) करतात. याअंतर्गत महापडीपूजा करण्यात येते.

श्री. अय्यप्पास्वामी अन्नदान सेवा संघातर्फे शनिवारी याचे आयोजन केले होते. पहाटेपासूनच विविध पूजाविधी केरळहून आलेले गुरुस्वामी कृष्णन कल्लमपिल्ले यांच्या सान्निध्यात करण्यात आले. यामध्ये महागणपती होमहवन, अभिषेक, सुब्रमण्यमस्वामी अभिषेक, धर्मशास्ता आवाहन, लक्षपुष्पार्चना व महाआरती आदींचा समावेश होता.

याप्रसंगी श्री परिपूर्णानंदगिरी स्वामी, श्री.असंगानंदगिरी स्वामी, श्री. सच्चिदानंद स्वामी, बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक डी. राम रेड्डी यांची उपस्थिती होती. महाआरती अगोदर मोठ्या उत्साहपुर्वक वातावरणात भजन करण्यात आले. यावेळी हजारो भक्तगण सहभागी झाले होते.

### भक्त शबरीमलयला जाऊन अय्यप्पास्वामींचे दर्शन घेणार...

सोलापुरात श्री अय्यप्पास्वामींचे हजारो भक्तगण आहेत. पैकी शेकडो भक्त गट स्थापून सामूहिक अनुष्ठान करतात. सोलापुरात असे १० ते १५ गट आहेत. हे जानेवारीच्या पहिल्या आठवड्यापासून विविध तीर्थक्षेत्रे करीत मकरसंक्रांती रोजी केरळ येथील शबरीमलय येथे असलेल्या अय्याप्पास्वामी मंदिरात जाऊन दर्शन घेतात व त्याच दिवशी तेथील डोंगरांदरम्यान दिसणाऱ्या चमत्कारिक अशा पवित्र मकरज्योतीचेही दर्शन घेऊन धन्य होतात. त्यानंतर अनुष्ठानाची समाप्ती होते.

## मुबारक शेख यांना नारायण सुर्वे साहित्य पुरस्कार प्रदान



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

येथील प्रसिद्ध ज्येष्ठ कवी मुबारक शेख यांच्या अजान आणि चालिसा या लक्षवेधी काव्य संग्रहास नाशिकच्या सार्वजानिक वाचनालयातर्फे कविवर्य नारायण सुर्वे साहित्य पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक रावसाहेब कसबे व उत्त कांबळे यांच्या हस्ते नाशिक येथे सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले. दहा हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ, स्मृती चिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते. अजान आणि चालिसा हा काव्य संग्रह राजहंस प्रकाशनने प्रकाशित केली आहे यात कवि मुबारक शेख यांनी मुस्तीम समाजातील अनेक मूलभूत प्रश्न ऐरणीवर घेतले आहेत. अखिल भारतीय मुस्तीम मराठी साहित्य परिषदेचे संस्यापक सहसचिव असलेले मुबारक शेख यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेतर्फे प्राचार्य इ.जा. तांबोळी, अय्यूब नल्लामंदू, हसीब नदाफ, प्राचार्य शकीळ शेख, प्रा. बेन्नूर यांनी अभिनंदन केले










हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.









## क्राईम वृत्त...

### भांडण सोडविण्यासाठी गेलेला तरूण जखमी

**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

मोहोळ येथील ब्रिजखाली भांडण सोडविण्यासाठी गेलेल्या तरूणास लोखंडी रॉड लागून जखमी झाला. सुशांत सुधिर विभुते (वय २३, रा. मोहोळ) असे जखमी तरूणाचे नाव आहे. ३ जानेवारी रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास मोहोळ येथील कुरूल रोडच्या ब्रिजखाली मित्रांची भांडण चालू असताना ते भांडण सोडविण्यासाठी सुशांत विभुते हा गेला होता. त्यावेळी सुशांत यास भांडणामध्ये लोखंडी रॉड खांद्याला लागून जखमी झाला. त्यामुळे त्यास उपचारासाठी सोलापुरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### ५० जणांच्या मारहाणीत दोघे जखमी

**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

मुलांच्या भांडणावेळी ४५ ते ५० जणांनी केलेल्या मारहाणीत दोघे जखमी झाले. शमशाद गुलाब बागवान (वय ६०), आयेशा सरदार बागवान (वय ५०, रा. मोहोळ) अशी जखमींची नावे आहेत. ३ जानेवारी रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास शमशाद बागवान व आयेशा बागवान या दोघी घरासमोर बसल्या होत्या. त्यावेळी मुलांचे भांडण झाल्याने दोघींना विकि विभुते, साहिल गोरे व इतर ४५ ते ५० जणांनी मिळून लाकडांनी व दगडांनी मारहाण केली. यामध्ये दोघीही जबर जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात रहिम हुंडेकरी यांनी दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### बुलेट दुचाकीने धडक दिल्याने दोघे जखमी

**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

बुलेट दुचाकीने धडक दिल्याने दुचाकीवरील दोघे जखमी झाले.महेश सुरेश भोसले (वय ४२, रा. गणेश गौरी नगर, बाळे) आणि सुदर्शन मलप्पा हिटनळी (वय ४४, रा. खंडोबा मंदीर, बाळे) अशी जखमींची नावे आहेत. ३ जानेवारी रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास ज्ञानप्रबोधिनी येथून दुचाकीवरून घराकडे जात असताना पाठीमागून आलेल्या बुलेट दुचाकीस्वाराने धडक दिली. त्यामध्ये दोघेही जखमी झाल्याने त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### गुळवंची येथे महिलेकडून किटकनाशक प्राशन

**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

गुळवंची (ता. उत्तर सोलापूर) येथे अज्ञात कारणावरून महिलेने विषारी औषध प्राशन केले. शितल महेश गायकवाड (वय २८, रा. गुळवंची) असे उपचारासाठी दाखल झालेल्या महिलेचे नाव आहे. ४ जानेवारी रोजी शितल गायकवाड




या भोगाव येथील स्वतःच्या शेतात काम करीत होत्या. दुपारच्या सुमारास अज्ञात कारणावरून शितल यांनी किटक नाशक विषारी द्रव्य प्राशन केले. त्यामुळे त्यांना त्रास होऊ लागल्याने पती महेश गायकवाड यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### गॅदरिंगमध्ये धक्काबुक्कीवरून मारहाण; तीन जण जखमी

**सोलापूर, दि. ४ जानेवारी -**

मोहोळ येथील गरड कॉलेज येथे गॅदरिंगमध्ये धक्काबुक्की लागल्याच्या कारणावरून झालेल्या मारहाणीत तीन जण जखमी झाले. सुफियान जाकीर हुंडेकरी (वय ३५), अलिम महमंद बागवान (वय ३०), आजिम हारूण बागवान (वय ३२, तिघे रा. महेबूब नगर, मोहोळ) अशी जखमींची नावे आहेत. ३ जानेवारी रोजी रात्री नऊच्या सुमारास मोहोळ



येथील लोकसेवा हॉटेलसमोर गरड कॉलेज येथे गॅदरिंग वेळी झालेल्या धक्काबुक्कीचा राग मनात धरून अज्ञात १५ ते २० जणांनी सुफियान व इतर दोघांना दगडांनी तसेच लाकडांनी मारहाण करून जखमी केले. या तिघांच्या सर्वांगास मुका मार लागल्याने सर्वांना उपचारासाठी नातेवाईक आजिम यांनी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# विठ्ठल मंदिराच्या सुरक्षेची ऐशीतैशी

**● मंदिर सुरक्षेचा लाखो रुपयांचा ठेका देवूनही मंदिरात श्वानाची एन्ट्री**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ४ जानेवारी-**

येथील विठ्ठल मंदिराच्या सुरक्षेची ऐशीतैशी झाल्याचा अनुभव याचि देहि, याची डोळा प्रत्यक्ष विठ्ठल- रुक्मिणी दर्शनासाठी मंदिरात उपस्थित असलेल्या शेकडो भाविकांना आज अनुभवयास मिळाला. कारण लाखो रुपये खर्चे करुन विठ्ठल मंदिर सुरक्षेचा ठेका दिलेला असताना शनिवारी मंदिरात चक्क एका श्वानाची एन्ट्री झालेली पहावयास मिळाली. त्यामुळे मंदिराच्या सुरक्षेची जबाबदारी असलेल्या मंदिर सुरक्षा ठेकेदाराकरवी राबविण्यात आलेल्या मंदिर सुरक्षा विभागातील अधिकारी व सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या भोंगळ, मनमानी कारभारा बद्दल भाविकांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे.

येथील विठ्ठल मंदिर म्हणजे संपूर्ण महाराष्ट्राचे आराध्य दैवत. लाखो वारकरी भक्तांचे मायबाप म्हणजे साक्षात भगावान विठ्ठल आणि रखुमाई. याच विठ्ठल-रखुमाईच्या दर्शनासाठी दररोज पंढरपूरात हजारोंच्या संख्येने भाविकांची रिघ लागलेली असते. त्यामुळे या विठ्ठल मंदिराच्या सुरक्षे संदर्भात शासनाकडून देखील खास सूचना विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीला दिलेल्या आहेत. त्यामुळे मंदिर सुरक्षेबाबत मंदिराचे व्यवस्थापन पाहणाऱ्या शासकीय अधिकारी आणि मंदिर समितीला कायमच सतर्कता बाळगणे आवश्यक असते. त्यामुळेच विठ्ठल रुक्मिणी मंदिर सुरक्षेची जबाबदारी विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीकडून लाखो रुपये खर्चुन एका खासगी ठेकेदाराकडे देवू केलेली आहे. या ठेकेदाराकडे मंदिरातील आतील आणि बाहेरील सुरक्षेसाठी खास कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती करण्यात आलेली आहे.

दरम्यान मंदिर सुरक्षेचा ठेका घेतलेल्या ठेकेदाराने देखील मंदिराच्या सुरक्षेसाठी २४ तास सुरक्षेची व्यवस्था पाहिली जावी यासाठी सुमारे दीडशे ते दोनशे कर्मचाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. एकीकडे शनिवारी (ता.४) राज्याचे जलसंपदा आणि आपत्तीव्यवस्थापन मंत्री गिरीष महाजन हे विठ्ठल मंदिरात राज्यातील पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली सुरु असलेल्या विठ्ठलरुक्मिणी मंदिर व परिवार देवतां मंदिराचे जतन व संवर्धनाच्या कामाची पाहणी करण्यासाठी येणार होते. त्यामुळे मंदिराची सुरक्षा सहाजिकच नेहमी पेक्षा अधिक सतर्क असणे सर्वानाच अपेक्षीत होते. मात्र मंत्री महोदयाच्या मंदिर प्रवेशाच्या अगोदर काही वेळ विठ्ठल मंदिरात चक्क एका श्वानाची एन्ट्री झाली. मंदिरातील



#### मंदिरातील अंतर्गत सुरक्षेसाठी खास जवान

या खासगी सुरक्षेची जबाबादारी असलेल्या सुरक्षा ठेकेदारा बरोबरच राज्य शासनाकडून खास बाब म्हणून राज्याच्या गृहविभागाने येथील शहर पोलिसांकडे अतिरिक्त पोलिस अधिकारी आणि पोलिस कर्मचारी देवून मंदिराच्या बाहेरची सुरक्षा व्यवस्थेला हातभार लावलेला आहे. या बरोबरच मंदिरातील अंतर्गत सुरक्षेसाठी खास निवृत्त जवान देखील विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीकडून नियुक्त करण्यात आलेले आहेत.

मंदिरातील आजच्या प्रकाराची आपण गांभिर्याने दखल घेतलेली आहे. सुरक्षेची जबाबदारी असलेल्या सुरक्षाठेकेदाराला तंबी दिलेली असून आज मंदिर सुरक्षेतील त्रुटीची चौकशी करुन या मध्ये जे दोषी सुरक्षा कर्मचारी असतील त्यांच्यावर योग्य ती कारवाई केली जाणार आहे.

**- मनोज श्रोत्री,**
व्यवस्थापक- विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर

श्वानाच्या एन्ट्रीमुळे मंदिरात दर्शनासाठी आलेले भाविक एकदम अवाक झाले. एरव्ही सर्वसामान्य भाविकांवर शिस्तीचा बडगा उगारणाऱ्या सुरक्षारक्षकांच्या कार्यतत्परतेवरच यामुळे प्रश्नचिन्ह निर्माण झाले. दर्शनासाठी आलेल्या शेकडो भाविकांनी मंदिरातील या प्रकारा बद्दल कमालीची नाराजी व्यक्त केली. या बरोबरच अचानक श्वानाची मंदिरात झालेल्या एन्ट्री वरुन मंदिर सुरेक्षाचा देखील प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यामुळे येत्या काळात या बाबत शासन तसेच मंदिर समिती सध्याच्या सुरक्षाठेकेदाराला काय शासन करते याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.



# रखडलेल्या आसरा पूल रुंदीकरणासाठी मारली बोंब

**● संभाजी ब्रिगेडचे तीव्र आंदोलन; आमदार, खासदारांचा नोंदवला निषेध**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

जुळे सोलापूरला जोडणारा आसरा रेल्वे पूल रुंदीकरण गेल्या अनेक वर्षापासून रखडल्याने महानगरपालिका प्रशासन महारेल प्रशासन आमदार, खासदार यांच्या निषेधार्थ आसरा पुलावर संभाजी ब्रिगेडच्या पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम यांच्या नेतृत्वाखाली बोंबाबोंब आंदोलन करून निषेध करण्यात आला.

होटगी रोड आणि विजापूर रोड ला जोडणारा महत्त्वचा आसरा पुल अरुंद असल्याकारणाने वेळोवेळी वर्दळीमुळे ट्राफिक जामचा प्रश्न उद्भवत होता तसेच या पुलावर अपघात होऊन चार जणांचा बळी सुद्धा गेला होता. जुळे सोलापूर भागात अनेक नवीन नागरी वसाहती व लोकसंख्या कित्येक पटीने वाढल्यामुळे या आसरा पुलाचे रुंदीकरण होणे अत्यंत गरजेचे होते. तसेच होडगी रोड ते विजापूर रोड हा रस्ता मॉडल रस्ता होणे अत्यंत गरजेचे आहे तरच या भागातील वर्ग व वाहतुकीची कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे. आसरा पुलाच्या रुंदीकरणासाठी संभाजी ब्रिगेडच्यावतीने वेळोवेळी निवेदने व आंदोलन केलं होते. केंद्रीय वाहतूक मंत्री नितीनजी गडकरी यांच्या प्रयत्नाने २०२३ मध्ये आसरा पुलरुंदीकरणाच्या कामाला मंजुरी मिळून सुमारे ३५ कोटीचा निधी सुद्धा प्राप्त झाला होता. महारेल च्या वतीने जुलै २०२३ मध्ये पुलाच्या कामाला सुरुवात करण्याचे फलक ही लावण्यात आले होते पण पुलाखालील जलवाहिनी स्थलांतरित केल्याशिवाय पुलाचे काम करता येणार नाही, जलवाहिनी स्थलांतर करण्यास सुमारे दहा-बारा कोटीची गरज असून महानगरपालिका व महारेल यांच्या टोलवाटोलवीमुळे आसरा पूल रुंदीकरणाचे काम गेल्या दोन वर्षापासून रखडलेले आहे. सोलापुरातील खासदार, आमदारांच्या दुर्लक्षामुळे आसरा पूल रुंदीकरणाच्या कामाला मंजुरी मिळून देखील दोन वर्षापासून हा प्रश्न प्रलंबित आहे आणखी कुण्या नागरिकाच्या बळी गेल्यावर हे काम सुरू होणार आहे का? त्यामुळे प्रशासनाला व लोकप्रतिनिधींना जाग आणण्यासाठी संभाजी ब्रिगेड व नागरिकांच्या वतीने बोंबाबोंब आंदोलन करण्यात आले. यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष शाम कदम, जिल्हा अध्यक्ष संभाजी राजे भोसले, शिरीष जगदाळे, मोनाली धुमाळ, कार्याध्यक्ष अरविंद शेळके, संपर्कप्रमुख छत्रगुण माने, माधुरी चव्हाण, मनीषा कोळी, राजनंदनी धुमाळ आदी उपस्थित होते.

#### आसरा चौक ते विजापूर रोड हा दोन पदरी मॉडेल रस्ता होणे गरजेचे

खा. प्रणिती शिंदे, आ. सुभाष देशमुख यांनी महानगरपालिका आयुक्त, महारेलचे व्यवस्थापक, जिल्हाधिकारी, रस्ते विकास महामंडळ तसेच संबंधित ठेकेदार यांची संयुक्त बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच आसरा चौक ते विजापूर रोड हा दोन पदरी मॉडेल रस्ता होणे अत्यंत गरजेचे आहे.

**- श्याम कदम, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष, संभाजी ब्रिगेड**

# जोडभावी पेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतून तीन दुचाकींची चोरी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ जानेवारी -**

शहरातील जोडभावी पेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील विविध भागातून तीन दुचाकींची चोरी करण्यात आल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे.





अशोक अंबुसा पवार (वय ६७, रा. भवानी पेठ, सोलापूर) या वृध्दाने त्यांची ३० हजार रुपये किंमतीची एमएच १३ एई १०३२ क्रमांकाची दुचाकी ही १ जानेवारी रोजी रात्री घरासमोर हॅन्डल लॉक करून ठेवली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याबाबत जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार शिवशरण पुढील तपास करीत आहेत.

जमीर मुन्ना शेख (वय २२, रा. धोत्रीकर वस्ती, रघोजी ट्रान्सपोर्ट बाजूला, सोलापूर) याने त्याची ६० हजार रुपये किंमतीची एमएच १३ ऐजी २०२६ क्रमांकाची दुचाकी ही २५ डिसेंबर रोजी रात्री हॅन्डल लॉक करून घरासमोर पार्क केली होती. ती दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याबाबत जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार आरेनवरू पुढील तपास करीत आहेत. तर काशिनाथ नागप्पा घोंगडे (वय ५२, रा. जय जलाराम नगर, जुळे, सोलापूर) यांनी त्यांची ३५ हजार रुपये किंमतीची एमएच ४५ यू ५०१० क्रमांकाची दुचाकी ही ३ मे २०२४ रोजी रूपाभवानी मंदीराच्या मुख्य गेटच्या डाव्या बाजूस असलेल्या ऊसाच्या दुकानाच्या शेजारील मोकळ्या जागेत हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. पोलिस हवालदार शिवशरण पुढील तपास करीत आहेत.

# होळकर स्मारकाचे पतंपप्रधान मोदींच्या हस्ते ३१ मे रोजी लोकार्पण

**▸ कुलगुरु प्रा.डॉ.महानवर : तीन वर्षांपासून रखडलेल्या कामाला गती देणार**





**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि. ४ जानेवारी-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकाच्या बांधकामाचे काम प्रगतीथावर आहे. त्यांच्या ३०० जयंतीदिवशी म्हणजेच ३१ मे रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण करण्याचा मानस असल्याचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी सांगितले.

स्मारक समितीची बैठक शनिवारी विद्यापीठात झाल्यानंतर त्यांनी ही माहिती पत्रकारांना दिली. येत्या १० जानेवारी रोजी या समितीची परत बैठक होणार असून दर १५ दिवसाला समितीची बैठक घेऊन स्मारकाच्या कामाचा पाठपुरावा करण्यात येईल. स्माराकाकडे जाण्यासाठी रस्ता ही एक अडचण आहे. परंतु हे कामही ३१ मे २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे विद्यापीठ प्रशासनाचे प्रयत्न राहतील, असेही प्रा. महानवर यांनी सांगितले

**निधीची असूनही काम रखडले**

या स्मारकासाठी शासनाकडून २०१९ मध्ये १४ कोटीचा निधीही प्राप्त झाला असून विद्यापीठाने २ कोटीची निधी दिला. २०२१मध्ये वर्क ऑर्डर निघाल्यानंतर पायाभरणी कार्यक्रम झाल्यानंतर वनविभागाने यातील अर्ध्या जागेवर दावा केल्यामुळे प्लॅन बदलावा लागला. विलबांचे तेही एक कारण आहे. तरीही गेल्या ३ वर्षापासून याचे काम रखडले होते. तसेच हे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे. त्यामुळे संबंधित विभाग, विद्यापीठ प्रशासन, ठेकेदार व वास्तुविशारद यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळेही हे काम रखडले होते. मात्र, कुलगुरुच्या प्रयत्नामुळे हे स्मारक ३१ मे ला उभा राहण्याच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.




सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १९४

**जोडोनियां पाणी सेना करी विनवणी।**
**म्हणे धन्य पुंडलीका माथा ठेविला चरणीं ।।**

आम्ही आषाढी पायी वारीत पंढरीला पोहचलो होतो. पोर्णिमेचा काला उद्या होणार असल्याने आज भूवैकुंठ असणाऱ्या पंढरपुरात जास्तीत जास्त संत महात्म्याच्या भेटीगाठी घ्यायच्या असे ठरवून आम्ही चंद्रभागेत आलो आणि स्नान केले. ज्या पुंडलिकाने सेना महाराजांच्या,

**धन्य महाराज पुंडलिक मुनी। वैकुंठींचा सखा आणिला भूतळा लागोनी।। केला उपकार जग तारिलें सकळ। निरसली भ्रांति माऊली स्नेहळ।। आली चंद्रभागा गर्जना करीत। तुझिया भेटीसाठी उतावीळ धांवता।। जोडोनियां पाणी सेना करी विनवणी। म्हणे धन्य पुंडलीका माथा ठेविला चरणीं ।।**



या अभंगाप्रमाणे वैकुंठनाथाला पृथ्वीवर आणून या पंढरपुराला वैकुंठाचे स्थान मिळवून दिले, तो पुंडलिक धन्य आहे. पुंडलिकाच्या या पावलामुळे जगाला महामायेतून तरण्याचा मार्ग गवसला. अहंकार, व्देष, ईर्षा, मत्सरात अडकून यालाच सत्य मानणाऱ्या जीवाची भ्रांती दूर झाली. पुंडलिकाची ही महती व अधिकार विचारात घेऊन जगाचा उध्दार करणारी चंद्रभागा माता आवाज देत पुंडलिकाच्या भेटीसाठी उताविळ होऊन धांवत आली. हे सर्व लक्षात घेऊन सेना महाराजांनी पुंडलिकाची धन्यता मान्य केली व त्याच्या चरणांवर आपला माथा ठेवला. साक्षात् वैकुंठाधिपतींनी ज्या सेना महाराजांसाठी बांधवगडच्या राजाची सेवा केली, त्या सेना महाराजांनी या पुंडलिकाची महती गायीली आहे. अशा या महान विठ्ठल भक्तांच्या भेटीसाठी आम्ही ज्या दर्शन रांगेत थांबलो होतो, त्या रांगेत आमच्यापासून थोडे मागे असणारी एक माऊली अचानक जोरात बोलतांना म्हणाली,ïïï;अहो माऊली, या ईहायपी (व्ही.आय. पी.) माऊलीला फुढं जाऊ द्या, त्यांना लई घाई हाय, आपण घेऊ निवांत दर्शन !ïïï; आम्ही मागे फिरून पाहिले. ती माऊली एका चांगल्या कपड्यातल्या मोबाईधारी सुशिक्षित व्यक्तीबद्दल बोलत होती. त्या व्यक्तिने मोबाईलवरून सतत जोरजोरात बोलणे चालू ठेवले होते. त्याचे हे संसारिक, व्यावहारिक बोल या ठिकाणी उचित नव्हते. ज्या पुंडलिकासाठी साक्षात् भगवंत अठ्ठावीस युगापासून त्याची वाट पाहत उभा आहे, त्या पुंडलिकाला भेटण्यासाठी उभ्या असलेल्या भक्तांच्या पंक्तीत उभा असणाऱ्या भक्ताने पुंडलिकाचा गजर करीत, नामस्मरण किंवा गुणगाण करीत उभे राहणे या माऊलींना अपेक्षित होते. खरे म्हणजे हे योग्यही होते. पण ही व्यक्ती पुंडलिकाचे गुणगाण तर करीतच नव्हती उलट रांगेतील मागच्या-पुढच्या भक्तांची शांती, एकाग्रता भंग पावेल अशी कृती करीत होती. म्हणून व्यत्यय करणाऱ्या या व्ही.आय.पी माऊलींना अगोदर दर्शन घेऊन जाऊ द्या, असे ती माऊली म्हणाली होती. संसारिक क्षेत्रात आपणाला व्यत्यय, अडथळा करणाऱ्याला लोक दूर करण्याचा, काढून टाकण्याचा प्रयत्न करतात. पण वारकरी संप्रदायात अशा लोकांनाही अत्यंत सकारात्मकतेने हाताळले जाते.मोबाईलवरून संसारातल्या गप्पा मारणाऱ्या या व्यक्तीवर ती माऊली चिडली होती. चिडूनही त्या माऊलीने रांगेतील इतर माऊलींना त्या व्यक्तीला प्रथम दर्शन घेऊ देण्याची विनंती केली. विशेष म्हणजे या व्यक्तीला अरे कारे न म्हणता, ३९;व्ही आय पी माऊली३९; असे म्हटले. अर्थात, नव्याने आलेल्या व साक्षात् पुंडलिकाच्या दारात उभा राहूनही संसारात अडकलेल्या आणि इतरांना अडथळा निर्माण करणाऱ्या या व्यक्तीलाही त्या माऊलीने ३९;माऊली३९; ही मायेची उपाधी द्यावी, ही बाब महत्त्वपूर्ण आहे. प्रसंगानुरूप का होईना आपण अशी अनुभूती संसारात घेतली तर संसारात वाद, भांडण-तंटेच होणार नाहीत. अर्थात, आनंद लहरीला उणीव राहणार नाही.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : रविवार
दि. ५ जानेवारी २०२५
विक्रम संवत् २०८०-८१
शके - १९४६
संवत्सर - क्रोधी नाम
मास - पौष
शु. पंचमी - (१०.००)
ऋतु - शिशीर
नक्षत्र - शतभिष (२१.२४)
योग - सिध्दी (१०.०७)
करण - बव (१०.५३)

दिनविशेष -
चांगला दिवस

....राहू काल....
रविवार : दु.४.३० ते ६.००
सोमवार : स. ७.३० ते ९.००
मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०
बुधवार : दु. १२ ते १.३०
गुरुवार : दु. १.३० ते ३.००
शुक्रवार : स.१०.३० ते १२
शनिवार : स. ९ ते १०.३०

### राशीभविष्य

**मेष** : मुलांच्या बाबतीत कठोर निर्णय घ्यावे लागतील. अपेक्षित मित्रांची मदत मिळेल.

**वृषभ** : आपल्या भोळ्या स्वभावाचा इतर गैरफायदा तर घेत नाही ना याकडे लक्ष द्या. जास्त ताण घेऊ नका.

**मिथुन** : मनाचा दाखविलेला मोठेपणा नातेसंबंधातील तेढ कमी करणारा ठरेल.

**कर्क** : एखादी मौल्यवान वस्तूची खरेदी सर्वांच्या संमतीने होणे शक्य. घरामध्ये पूर्वी ठरलेला शुभ समारंभ पार पडेल.

**सिंह** : मोठ्या व्यवहारातून पुरेशी काळजी घेत वाटचाल करायची आहे. हितशत्रूंचा काही प्रमाणात त्रास होणे शक्य.

**कन्या** : आपल्या लहानसहान इच्छा:आकांक्षाना पूर्ण होण्यासाठी आवश्यक ती आवक झाल्याने तुम्ही खूश असाल.

**तुळ** : एकाच वेळी नोकरी आणि घर या दोन्ही गोष्टींवर लक्ष केंद्रित करावे लागल्याने तुमच्यावर एकप्रकारचा दबाव येईल.

**वृश्चिक** : धंदा व्यवसायात कामाचा व्याप वाढेल. घरामध्ये छोट्या समारंभाच्या निमित्ताने प्रियजनांची गाठभेट होईल.

**धनु** : कोणताही टोकाचा विचार किंवा अतिरेकी कृती आपल्याच पायावर दगड पाडून घेणारी ठरेल.

**मकर** : संततीच्या दृष्टीने येणाऱ्या शुभवार्ता अभिमानास्पद ठरतील. मात्र, त्यांचे आरोग्याचे प्रश्नाबाबत वेळीच लक्ष द्या.

**कुंभ** : इतरांना न जमणारी कामे तुम्ही यशस्वीरीत्या हाताळाल.

**मीन** : एकत्रित होणाऱ्या सहली आनंददायक ठरतील. मुलांच्या हट्टापायी चैनीच्या वस्तूसाठी खर्च करावा लागेल.

# सुआरोग्यासाठी जेष्ठ नागरिकांची चालण्याची स्पर्धा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

द्वारकाधीश मंदिर, जुळे सोलापूर येथे जेष्ठ नागरिकांची चालण्याची स्पर्धा दि. १ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आली होती.

विरंगुळा, प्रेरणा, समर्थ, नंदनवन, साक्षेप, विवेक, बांथनाल श्री द्वारकाधीश, जेष्ठ नागरिक संघ, जुळे सोलापूर अध्यक्ष व सचिव आणि समनवयक यांनी स्पर्धा यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. आ. सुभाष देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली व उद्योजक जयश पटेल, संजय शाह, सामाजिक कार्यकर्ते चेतन चौधरी, चंदू काका सराफ यांच्या सौजन्याने ही स्पर्धा आयोजित केली होती. सोलापुरातील जास्तीजास्त जेष्ठ नागरिकांमध्ये व्यायामाची आवड निर्माण होऊन त्यांचे सुआरोग्य व्हावे यासाठी अशा स्पर्धांचे आयोजन केले जाते. दरवर्षी जास्तीत जास्त ज्येष्ठांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन अध्यक्ष अरुण कदम यांनी केले.


**विजेते पुढीलप्रमाणे -**

१) पुरुष वय ६०/७० वर्षे द्वारकाधीश मंदिर ते सहयोग सोसायटी व परत २ की मी., २) पुरुष ७० + द्वारकाधीश मंदिर ते शिवदारे कॉलेज व परत १.०० की. मीटर, ३) महिला ६०/७० वर्षे श्री द्वारकाधीश मंदिर ते विजापूर रोड व परत १.५ किमी, ४) महिला ७०+ वर्षे द्वारकाधीश मंदिर ते हरेकृष्ण विहार सोसायटी १ किमी अशी स्पर्धा होती. या स्पर्धेत ६०० पुरुष व ५० महिला यांनी भाग घेतला.

या स्पर्धेत ६०/७० वयोगट पुरुषांमध्ये १) अजित डोके, २) सुनील काशीद, ३) सुदाम वैजिनाथ घाळे यांनी बक्षिस मिळवले. तर ७० वर्षांवरील पुरुषांमध्ये १) मधुकर आलू जाधव,२) श्रीमंत नागप्पा कलबुर्गी, ३) सुहास माने यांनी अनुक्रमे बक्षिस पटकावले.

६०/७० वयोगटातील महिलांमध्ये १)शामल प्रकाश रसाळ,२) सुवर्णा मार्तंड,३) सुलभा घोडके यांनी नंबर पटकावला तर ७० वर्षांच्या पुढील महिलांमध्ये १) विमल जयप्रकाश चौधरी, २) जयश्री जहागीरदार यांनी बक्षिस मिळवले.

## संघ हीच जीवनगाथा



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.

**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक
प्रमुख राष्ट्र सेविका समिती
मो. ९९६००५३५२१

### अलक:- (८) सीमोल्लंघन

दसऱ्याचा दिवस होता. सीमोल्लंघनाची मिरवणूक, नंतर रावण वध म्हणजे लोकांची गर्दी स्वदेशीचा प्रचार करण्यास योग्य संधी आहे. असा विचार करून केशव व त्याचे दोन मित्र भगोरे व डबीर यांनी वंदे मातरम हे गीत गायले व त्यानंतर केशवने खरे रावण मारणे म्हणजे काय यावर अत्यंत जहाल असे भाषण केले. नेहमीप्रमाणे दसऱ्याच्या दिवशी मिरवणुकीने गावाबाहेर जाऊन रावणाचा फटाके उडवून वध करणे; या लोकांच्या बोथट वृत्तींना आज केशवने खरेच सीमोल्लंघन घडवले होते. पण केशवची ही देशभक्ती लक्षात आल्यावर सरकारी गुप्तचरांचा ससेमिरा चालू राहिला तो कायमचाच. वंदेमातरम् चा उद्-घोष करणाऱ्यांना दंडही ठोठावत असत.

### अलक:- (९) हिंदू राष्ट्रवाद

यवतमाळ व पुणे येथील राष्ट्रीय विद्यालयातून केशवने दहावीपर्यंतचे शिक्षण घेतले व नंतर १९१० मध्ये कलकत्त्याला नॅशनल मेडिकल कॉलेज मध्ये डॉक्टरी शिक्षणासाठी ॲडमिशन घेतली तिथून १९१५ साली डॉक्टर बनून नागपूरला परत आले, आता केशव खराखुरा डॉक्टर बनला होता. परंतु डॉक्टरी न केलेला डॉक्टर असे लोकमत तयार झाले होते. त्यातच त्यांचे थोरले बंधू महादेव यांचा प्लेगमुळेच मृत्यू झाला होता. देशात हिंदू-मुस्लीम ऐक्याचे नगारे झडत होते. वास्तविक हिंदुस्थानात हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, पारशी, यहुदी अशा अनेक धर्माचे लोक रहात होते. या सर्वांची एकी हवी होती. पण महात्मा गांधींना हे पटले नाही. मुसलमान आक्रमक आहेत हे गांधींना मान्य होते म्हणूनच त्यांना प्रेमाने जिंकण्याचा प्रयत्न करत होते. आणि या चर्चेतूनच हिंदू राष्ट्रवाद उदयास आला हळूहळू संघाची उज्वल प्रतिमा डॉक्टरांच्या मनात फेर धरू लागली. या प्रतिमेला हिंदुत्वाचा शेला पांघरल्यानंतर ती अधिक तेजस्वी दिसू लागली. आणि संघाचा जन्म झाला.

**क्रमशः**



# जिजामाता प्राथमिक शाळेत सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ बाळे संचलित जिजामाता प्राथमिक शाळा तुळशीदासनगर कोंडी येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक चंद्रकांत कुंटेलूसर होते तर प्रमुख अतिथी म्हणून बाल विद्यार्थीनी प्राची पवार, नम्रता चाफेकर उपस्थित होत्या.यावेळी विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित कविता, ओव्या,नाटीका, भाषण सादर केले.शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनींचे मुख्याध्यापक चंद्रकांत कुंटेलूसर यांच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. याप्रसंगी सुंदर भाषण सादर केलेला संस्कार स्वामी या विद्यार्थ्यांचे रोख रक्कम देऊन सत्कार करण्यात आला. यासर्व सहभागी विद्यार्थ्यांचे संस्थापिका माजी आमदार श्रीमती निर्मलाताई ठोकळ, अध्यक्ष सचिनभैय्या ठोकळ, सचिवा शिल्पाताई ठोकळ यांनी अभिनंदन केले.यानिमित्ताने सर्व शिक्षक शिक्षिकांनी मनोगत व्यक्त केले. मुख्याध्यापक चंद्रकांत कुंटेलूसर यांच्या मार्गदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# श्राविका विद्यालयास पालकांकडून संविधान ग्रंथ भेट



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

उमाबाई श्राविका प्रशालेच्या पालकांकडून पंचवीस भारतीय संविधान ग्रंथाची अमूल्य भेट देण्यात आली. संविधानाला ७५ वर्ष पूर्तीनिमित्त शासनाकडून घर घर संविधान या कार्यक्रमाचे आयोजन येत आहे याचाच एक भाग म्हणून उमाबाई श्राविका विद्यालयातील शिक्षक व विद्यार्थ्यांना संविधानाची ओळख व्हावी आणि यानिमित्ताने संविधानाचे वाचन व्हावे या उद्देशाने पालक वर्गाने एका छोट्याशा कार्यक्रमात शाळेमध्ये येऊन प्रत्येक वर्गाला संविधान भेट दिले.

याप्रसंगी प्रशालेचे मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ व प्रशालेत संविधान भेट देणारे दत्तात्रय काटकर, शहाजी भोसले, भाग्यश्री सुरवसे, पद्मश्री रत्नपारखे, चित्रा भांगे, अनिल धसाडे, लक्ष्मी बंडगर उपस्थित होते. सूत्रसंचालन सुकुमार वारे सरांनी केले तर आभार क्रीडा शिक्षक सुहास छंचुरे यांनी मानले. या पालकांना प्रोत्साहित करण्यासाठी अभिजीत पाटील, ऋषभ सोनटक्के, सरस्वती शेटे, सोनाली उंडे यांनी परिश्रम घेतले.





# ए. जी. पाटील पॉलिटेक्निकमध्ये 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रम


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

तरुण पिढीला ग्रंथ वाचनाकडे आकर्षित करण्यासाठी व वाचन संस्कृतीचा विकासाच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ग्रंथ वाचनाकडे आकर्षित करण्याच्या उद्देशाने वाचन संकल्प महाराष्ट्राचा अभिनव उपक्रम वाचन पंधरावडा हा ए.जी. पाटील पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट येथे आयोजित केला होतो, अशी माहिती कॉलेजचे प्राचार्य डॉ. एम. ए.चौगुले यांनी दिली. या अभियांतर्गत ३ जानेवारीपासून महाविद्यालयातील ग्रंथालयात ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले. ६ जानेवारी रोजी ग्रंथालयातील वाचनकक्षात विदयार्थ्यांसाठी सामुहिक वाचन घेण्यात येणार आहे. वाचन कौशल्य संवाद कार्यशाळा ८ जानेवारी रोजी राबवण्यात येणार आहे. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक एन. बी. पवार व प्राध्यापिका एल. एस. बिराजदार हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. पुस्तक परीक्षण या स्पर्धेचे १३ जानेवारी रोजी आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेतील प्रथम तीन उत्कृष्ट परीक्षणास महाविद्यालयाच्या वतीने प्रमाणपत्र व रोख रक्कम बक्षीस स्वरूपात देऊन गौरवण्यात येणार आहे. या स्पर्धेतील विजेत्या परीक्षणाचा समावेश महाविद्यालयाच्या वार्षिक अंकामध्ये करण्यात येणार आहे. अशी माहिती महाविदयालयाचे ग्रंथपाल. एम. एम. आडम यांनी दिली. या उपक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष एस.ए. पाटील, उपाध्यक्ष एस. एस. पाटील, प्राचार्य डॉ. एम.ए. चौगुले व उपप्राचार्य एस. के. मोहिते यांचे मार्गदर्शन लाभले.

# सामाजिक नाटकांची दहा पुस्तके; नव्या वर्षात चपराक प्रकाशनचा साहित्यिक धमाका

**तभा वृत्तसेवा,**
**संगमनेर, दि.४ जानेवारी-**

'चपराक प्रकाशन'च्या वतीने डॉ. सोमनाथ मुटकुळे यांची दहा नाटकांची पुस्तके एकाचवेळी प्रकाशित होत आहेत. ही नाट्य चळवळीसाठी आणि प्रकाशन क्षेत्रासाठी सुद्धा अभिमानाची गोष्ट आहे. अलीकडच्या कालखंडात नाट्य चवळीत फारसे दखलपात्र घडताना दिसत नाही. ग्रामीण भागातील नाट्य चळवळी नव्याने पुढे येत नाहीत. अशावेळी संगमनेरसारख्या शहरातून गेली ४० वर्षे नाट्य चळवळीमध्ये योगदान देणारे डॉ. सोमनाथ मुटकुळे यांची निवडुंग व इतर नाटके, चक्र व इतर नाटके आणि राजर्षी व इतर नाटके अशा एकूण दहा नाटकांची तीन पुस्तके प्रकाशित होत आहेत. डॉ. मुटकुळे यांची नाटके केवळ माणसांचे मनोरंजन करणारी नाहीत तर त्यापलीकडे माणसाला चिंतन, मनन करायला भाग पाडणारी आणि भविष्याकडे पाहण्यास प्रेरित करणारी





आहेत. माणसांचे जगण्याचे प्रश्न आणि महापुरुषांच्या विचारांची कास धरून पुढे जाताना त्यांच्याच विचाराकडे झालेले दुर्लक्ष, महापुरुषांच्या स्वप्नातील समाज व्यवस्थेचे वाजलेले तीन तेरा यासंदर्भातील अत्यंत मनोवेधक वेध या पुस्तकात घेण्यात आला आहे. समाजामध्ये निर्माण होणारे प्रश्न आणि त्या प्रश्नांच्या मुळाशी असणारे मूलभूत प्रश्न यांचा विचार करून नाटकातून माणसाला चिंतन करायला भाग पाडले आहे. त्यामुळे ही दहा नाटके एकाच वेळी मराठी साहित्य क्षेत्रात प्रकाशित होत आहेत हा विक्रम म्हणायला हवा. चपराक प्रकाशनाने सुद्धा एकाच वेळी दहा नाटकांची तीन पुस्तके प्रकाशित करून प्रकाशन व्यवसायात विक्रम प्रस्थापित केला आहे.

या पुस्तकांचे लोकार्पण ज्येष्ठ विचारवंत, साहित्यिक संजय सोनवणी यांच्या हस्ते होत आहे. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रकाशक घनश्याम पाटील, विधान परिषदेचे माजी सदस्य डॉ. सुधीर तांबे, माजी नगराध्यक्ष दुर्गाताई तांबे उपस्थित राहणार आहेत.

# अभियांत्रिकी प्रवेशाकरिता ऑनलाइन फॉर्म भरण्याचे 'बिगसी'चे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

अभियांत्रिकी प्रवेशाकरिता सीईटी २०२५-२६ शैक्षणिक वर्षाकरिता ऑनलाइन फॉर्म भरण्याची प्रक्रिया दिनांक ३०/१२/२०२४ पासून सुरू झाली असून भविष्य करिता पात्रतेनुसार सीईटी फॉर्म भरणे विद्यार्थ्यांच्या अनिवार्य आहे. महाराष्ट्र राज्य सामूहिक प्रवेश प्रक्रिया २०२५- २६ च्या वेबसाईटवर नोंदणी करण्यासाठी ज्या विद्यार्थ्यांना अडचण आहे किंवा शहर व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सोयी सुविधा उपलब्ध नसल्यास भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजीनियरिंग केगाव सोलापूर यांनी मोफत सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे ज्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांचे फॉर्म भरण्याकरिता सोयीसुविधा उपलब्ध नसल्यास आमच्या कॉलेजमधील तज्ञ प्राध्यापकद्वारे महाविद्यालयामध्ये येऊन फॉर्म भरण्याची व्यवस्था केली आहे तरी कनिष्ठ महाविद्यालयातील अभियांत्रिकीसाठी इच्छुक उमेदवाराची फॉर्म भरण्याच्या लाभ घ्यावा व अभियांत्रिकी प्रवेशापासून इच्छुक उमेदवारांनी वंचित राहू नये, असे आवाहन संस्थेचे प्राचार्य डॉ. अनिल देशमाने यांनी केले आहे.

# शिवालय संकुलामध्ये स्नेहसंमेलन उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

शिवालय शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळ संचलित शिवालय प्राथमिक / माध्यमिक आश्रम शाळा व ओम वैष्णव कनिष्ठ महाविद्यालय तळे हिप्परगा (ता. उत्तर सोलापूर) जि. सोलापूर या आश्रम शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात झाले.

यावेळी ॲड. जयदीप माने, पत्रकार प्रशांत जोशी, प्रदीप कुलकर्णी, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दत्तात्रय गणेशकर, ओम गणेशकर, प्राचार्या वाघचवरे आदी मान्यवरांच्या हस्ते सरस्वतीचे प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी संस्थेच्या उपाध्यक्ष डॉ. वैष्णवी गणेशकर मंचावर उपस्थित होते. प्राचार्य कांचन वाघचवरे यांनी प्रास्ताविकमध्ये आश्रम शाळेचा वार्षिक आढावा दिला. यावेळी ॲड. माने म्हणाले, आपल्या शालेय जीवनातील गंमती जमंती सांगितल्या व गणेशकर यांनी अपार कष्टाने ही संस्था उभी केली. त्याचा वटवृक्ष होवो अशा शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रशांत जोशी यांनी मनोगत व्यक्त केले. स्नेहसंमेलन कार्यक्रमाची सुरवात प्रथमत: अधीर गुलाल या अभंगाने करण्यात आली. स्नेहसंमेलनामध्ये शाळेतील ३०० विद्यार्थी सहभागी झालेले होते. स्नेहसंमेलन झाल्यानंतर पालक, नागरिक माजी विद्यार्थ्यांना अल्प उपहार देण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन नेताजी इंगळे यांनी केले तर आभार अभिमान जाधव यांनी मानले.



# सोलापूर विद्यापीठाच्या २०२५ दैनंदिनी डायरीचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या २०२५ दैनंदिनी डायरीचे प्रकाशन कुलगुरु प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांच्या हस्ते करण्यात आले. कुलगुरू कार्यालयात पार पडलेल्या दैनंदिनी डायरी प्रकाशनाच्यावेळी प्र-कुलगुरु प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, दैनंदिनी समितीचे अध्यक्ष डॉ. गौतम कांबळे, डॉ. अर्चना लावंड, डॉ. राजीवकुमार मेंते , प्रा. चंद्रकांत गार्डी, अधिसभा सदस्य प्रा. वीरभद्र दंडे तसेच दैनंदिन समितीचे सदस्य सचिव, सहायक कुलसचिव सोमनाथ सोनकांबळे आदी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



### यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

**करमाळा दि.४ जानेवारी-**

करमाळा येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयांमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. सावित्रिबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव विलासरावजी घुमरे, तालुक्याचे युवानेते दिग्वीजय बागल, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, संस्थेचे सहसचिव विक्रमसिंह सूर्यवंशी, प्राचार्य डॉ.एल.बी.पाटील, उपप्राचार्य संभाजी किर्दाक, प्रमुख व्याख्याते प्रा. नितिन तळपाडे, भाजपचे जिल्हा सरचिटणीस किरण बोकन, जिल्हा उपाध्यक्ष श्याम सिंधी, तालुका अध्यक्ष सचिन पिसाळ उपस्थित होते. प्रस्ताविक व सूत्रसंचालन अनिता देशमुख-साठे यांनी केले. आभार प्रा.एम.डी.जाधव यांनी मानले.



### जि. प. शाळा मुली क्रमांक दोन येथे बालिकादिनाचे आयोजन

**करकंब, दि. ४ जानेवारी-**

जि. प. प्राथमिक शाळा मुली क्रमांक २ करकंब येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.यानिमित्त बालिकादिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रथमतः सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन उपसरपंच आदिनाथ देशमुख, ग्रामपंचायत सदस्य मुस्तफा बागवान, रेखा गायकवाड, पत्रकार विजय नलवडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मधुरा पुरवत यांच्या हस्ते करण्यात आले. मुख्याध्यापक खंदारे यांनी सावित्रीबाईंचे शैक्षणिक कर्तृत्व सांगितले. उपसरपंच आदिनाथ देशमुख यांनी सावित्रीबाईंच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला.याप्रसंगी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षिका पोतदार, महामुनी, मुलाणी, शिक्षक गोरे, शेख यांनी परिश्रम घेतले.



### कोंडीबा इंगळे हायस्कूल येथे सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**अक्कलकोट, दि. ४ जानेवारी-**

कर्जाळ येथील कोंडीबा इंगळे हायस्कूल येथे माता सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. यावेळी संपूर्ण कार्यक्रम शाळेतील मुलींनी पार पाडले. यावेळी महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, शेतकरी, डॉक्टर, अशा वेशभूषा करून विद्यार्थी आले होते. या प्रसंगी संस्था अध्यक्ष चंद्रकांत इंगळे यांनी आपल्या भाषणात विद्यार्थिनींनी मोठया पदावर गेल्या पाहिजे, त्यासाठी संस्था सर्वतोपरी मदत करण्यासाठी तयार असल्याचे सांगितले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील महिला शिक्षिका सक्करगी, श्रीमती राजमाने, श्रीमती किरनल्ली यांनी परिश्रम घेतले.



### अक्कलकोटमध्ये सावित्रीबाई फुलेंना अभिवादन

**अक्कलकोट दि ४ जानेवारी**

सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा, जिल्हा परिषद कन्नड मुले व कन्नड मुलींची शाळा दुधनी यांच्या संयुक्त रित्या सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करून अभिवादन करण्यात आले. प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस शोभा म्हेत्रे, ज्योती चनशेट्टी यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी सिध्दाराम गोरे, महादेव बासरगाव, गणपती पवार, शिवचलप्पा बाबा, परमेश्वर वाघोली, सुभाष अतनूरे, संजीवकुमार बेण्णेसूर, रविकुमार कोरचगाव, सुहास पवार व शाळेतील मुख्याध्यापक व सर्व शिक्षक उपस्थित होते. सूत्रसंचालन महांतेश कर यांनी केले तर आभार सिध्दाराम चौधरी यांनी मानले.



### संकल्प संस्थेच्या वतीने सावित्रीबाईंची जयंती साजरी

**नातेपुते, दि. ४ जानेवारी-**

शहरी आरोग्यवर्धिनी आमराई बारामती येथे संकल्प बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई यांची जयंती साजरी करण्यात आले. प्रथमता आरोग्यवर्धिनीचे वैद्यकीय अधिकारी राहुल सोमवंशी व संस्थेचे अध्यक्ष विलास भोसले यांच्या हस्ते सावित्रीमाईंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उषा भोसले, सागर सवाने, सुप्रिया कांबळे, प्रवीण पोंदकुले, संतोष कांबळे, शारदा जगताप, कोमल सवाने, आराध्या चव्हाण, राजश्री मोहिते, आराध्य पाटोळे, संगीता वसव, आदी उपस्थित होते.

# मोडनिंब जि.प. शाळेसाठी नवीन खोल्याची पूर्तता करणार

## आमदार अभिजित पाटील; मोडनिंब येथे किशोरी मेळाव्याचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ४ जानेवारी-**

मोडनिंब (ता.माढा) येथील जिल्हा परिषद शाळेच्या धोकादायक वर्गखोल्या पाडून नवीन खोल्याची पूर्तता करणार असल्याचे आमदार अभिजित पाटील यांनी सांगितले. शुक्रवार(दि. ३)सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित किशोरी मेळाव्यात आमदार पाटील बोलत होते.

ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून दिपप्रज्वलन करून मेळाव्याचे उदघाटन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर भारत शिंदे, सरपंच लक्ष्मी पाटील, बाबुराव सुर्वे, विजय गिड्डे, दिपक सुर्वे, माणिक लांडे यासह ग्रामस्थ उपस्थित होते. अन्य उपक्रमांसह किशोरी हितगुज मेळाव्याची खऱ्या अर्थाने गरज आहे.प्रत्येक उपक्रमांमध्ये किशोरींनी उत्साहाने सहभाग घेण्याचे आवाहन केले. गुणवत्तेत अग्रेसर जिल्हा परिषद शाळा, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे आमदार पाटील यांनी कौतुक केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ईश्वरी गायकवाड तर प्रमुख पाहुणे म्हणून वेदिका ढवळे या विद्यार्थीनी होत्या. विद्यार्थिनीना माजी जि.प. अध्यक्षा निशिगंधा कोल्हे, ॲड. रत्नप्रभा जगदाळे, पोलिस उपनिरीक्षक सुरवसे यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. प्रारंभी प्राणायाम, योगासोबत गीतमंच आणि कृतियुक्त गीते सादर करण्यात आली.

यावेळी पोस्टर स्पर्धा, लिंबू चमचा, संगीत खुर्ची, रांगोळी स्पर्धा घेण्यात आले. यशस्वी विद्यार्थिनींना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.प्रास्ताविक गटशिक्षणाधिकारी विकास यादव यांनी केले. सूत्रसंचालन काझी आणि टिळेकर यांनी केले तर आभार शाळा व्यवस्थापन समितीच्या अरुणा सुर्वे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी केंद्रप्रमुख शिवराज ढाले, मुख्याध्यापक हरिदास जाधव, राजन सावंत, शिक्षकवृंद आदींनी परिश्रम घेतले.





### आ. अभिजित पाटीलांनी घेतला जलजीवन योजनेचा आढावा

जलजीवन मिशन योजनेअंतर्गत फेरअहवाल तयार करून रखडलेले काम तत्काळ सुरू करण्याची सूचना आमदार अभिजित पाटील यांनी जलजीवन मिशनच्या अधिकाऱ्यांना केली आहे.जलजीवन मिशन योजने संदर्भात आढावा घेण्यासाठी मोडनिंब ग्रामपंचायतीत बैठक झाली.आमदार पाटील यांनी श्रीकृष्ण गोशाळा येथे भेट दिली. गोमातेची पूजा करण्यात आली.

### उल्हास मेळावा; शिक्षकांचे कौतुक

नवभारत साक्षरता अभियाना अंतर्गत तालुकास्तरीय उल्हास मेळाव्याचेही आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याचे उद्घाटन करून आमदार पाटील यांनी उल्हास मेळाव्यात २१ केंद्रानी प्रस्तुत केलेल्या शैक्षणिक साहित्याची पाहणी केली. साक्षरतेच्या अग्रदूत शिक्षकांचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या साहित्य विकसनासाठी योगदानासाठी गौरव करण्यात आला.

## शेंद्री-वारदवाडी रस्त्यावर २३ जनावरांची अवैध वाहतूक पकडली

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.४ जानेवारी-**

दि. ३ जानेवारी रोजी सायंकाळी गोपनीय माहितीनुसार, बार्शी तालुक्यातील शेंद्री-वारदवाडी रस्त्यावर जनावरांची अवैध वाहतूक करणारे वाहन पकडण्यात आले. प्राणीमित्र किशोर आकोसकर यांनी पोलिसांना माहिती दिल्यानंतर बार्शी तालुका पोलिसांनी तत्काळ कारवाई करत बोलेरो पिकअप वाहन (क्रमांक चक१३०८२२५) ताब्यात घेतले.

वाहनाची तपासणी केली असता, त्यामध्ये २३ जनावरे दाटीवाटीने भरलेली आढळली. त्यामध्ये २ जर्सी गायी, १४ जर्सी गाईंची वासरे, ७ म्हशींची रेडके यांचा समावेश होता. यापैकी एका जनावराचा मृत्यू झाला होता. वाहनात जनावरांसाठी चारा, पाणी किंवा औषधाची कोणतीही सोय नव्हती.

वाहनचालक आजम माहमुद पठाण (वय २८, रा. इंदापूर) आणि त्याचा साथीदार वसिम इसाक कुरेशी (वय ४४, रा. इंदापूर) यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्यांनी जनावरे धाराशिव येथील कत्तलखान्यास नेण्याचे कबूल केले. तपासादरम्यान, ही वाहतूक अरबाज सैफल कुरेशी (रा. इंदापूर) याच्या सांगण्यावरुन होत असल्याचे निष्पन्न झाले आहे. अधिक तपास तालुका पोलीस करीत आहेत.



## शंकरलिंग प्रशालेत बालिका दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. ४ जानेवारी-**

वळसंग (ता. द. सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती व बालिका दिन उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी सावित्रीबाई फुले यांच्या वेशभूषेत कुमारी श्रेया बसवराज शाबादे, तर महात्मा ज्योतिबा फुले यांच्या वेशभूषात कुमार विशाल घोडके हा होता.

सर्वप्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य वीरेश थळंगे व पर्यवेक्षक शिवानंद घोडके यांच्या हस्ते करण्यात आले. शिक्षिका गंगा बागलकोटी यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना लेखन साहित्य देऊन गौरविण्यात आले. यावेळी प्रशालेतील सिध्दाराम भैरामडगी, बाळकृष्ण गुंड, नीलकंठ कवटगी, श्रीमंत भोसले, सिद्धारूढ हिरेमठ, गंगाधर बिराजदार, संतोष कस्तुरे, बसवराज दुधगी, विरेश थळंगे, विजय प्याटी, प्रा. संतोष शिंदे, प्रा.शरणय्या मसुती, अजय माणकोजी, शिवराज अष्टगी, विजयालक्ष्मी थळंगे, स्नेहा हळगोडे, रूपाली कलशेट्टी, प्राध्यापिका प्रतिभा तांडुरे, लिपिका राजश्री दुधगी, कर्मचारी कट्टेप्पा कोळी, विनोद दुधगी आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख तानाजी जमादार यांनी मानले.

## वैभव जाधव यांची सावता सेनेच्या जिल्हाध्यक्षपदी निवड

**तभा वृत्तसेवा**
**करकंब, दि. ४ जानेवारी-**



करकंब (ता. पंढरपूर) येथील वैभव लक्ष्मण जाधव यांची 'सावता सेना' संघटनेच्या सोलापूर जिल्हाध्यक्षपदी निवड झाली असून त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तुकाराम सातव, महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा स्वाती गोरे यांनी त्यांच्या कार्याची दखल घेऊन सावता सेनेचे संस्थापक अध्यक्ष मुंजाजी गोरे यांच्या हस्ते त्यांना निवडीचे पत्र देण्यात आले.त्यांच्या या निवडीचे सावता सेनेच्या ओबीसी सेलच्या सर्व पदाधिकार्यांकडून स्वागत करण्यात आले.जिल्हा परिषदचे मा. अध्यक्ष बाबुराव जाधव,वरिष्ठ अधिव्याख्याता गट अ डायटचे अरुण जाधव, स्व. चेअरमन दत्ता खारे प्रतिष्ठान, तालुका पत्रकार संघ, श्रीगणेश तरुण मंडळ यांच्याकडून शुभेच्छा देऊन अभिनंदन करण्यात आले.

सावता सेनेच्या माध्यमातून सामाजिक कार्य करुन विवीध सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी कटीबद्ध राहीन.विविध ठिकाणी 'सावता सेनेच्या'शाखा काढून त्या माध्यमातून लोकोपयोगी कामे करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे वैभव जाधव यांनी सांगितले.



## केतूरच्या स्टेट बँकेकडून बिभिषण भिल यांच्या वारसांना दिला धनादेश

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.४ जानेवारी-**

करमाळा तालुक्यातील मांजरगाव येथील बिभीषण सदाशिव भिल हे काही दिवसापूर्वी अपघातामध्ये मरण पावले होते. त्यांच्या नावे भारतीय स्टेट बँकेच्या केतुर शाखेमध्ये प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेचा विमा उतरवला होता. सर्व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर त्यांचे वारसा मीनाक्षी बिभीषण भिल यांना दोन लाख रुपयाच्या विमा कवचाच्या चेकचे वाटप केतुर येथील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेत शाखाधिकारी निलेश उकुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. मयताच्या वारसदाराने आवश्यक ती कागदपत्रे आणि दावा कलम फॉर्म जमा केल्यानंतर लवकरात लवकर त्यांना या धनादेशाची वाटप करण्यात आले यासाठी शाखाधिकारी आणि बँकेतील कर्मचाऱ्यांनी योग्य ते सहकार्य केले. यावेळी पंचायत समितीचे माजी सभापती बापूसाहेब पाटील, जिल्हा दूध संघाचे संचालक राजेंद्रसिंह पाटील मकाई सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक हरिश्चंद्र खाटमोडे, सरपंच सचिन वेळेकर, उपसरपंच भास्कर कोकणे, ग्रा.प. सदस्य शहाजी पाटील, प्रशांत नवले, रवींद्र विघ्ने, एसबीआय सीएसपी मनीषा माळशिकारे, नितीन कटारिया, सचिन खराडे, नंदकुमार जोशी आदी उपस्थित होते.

## शिक्षक भारतीच्या पुरस्कारांचे आज वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.४ जानेवारी**

शिक्षक भारती संघटनेच्या जिल्हास्तरीय पुरस्कारांचे आज रविवार, दि. ५ जानेवारी रोजी जगदीशश्री लॉन्स अँड हॉल, विजापूर रोड, जुळे सोलापूर येथे वितरण होणार आहे.

सोलापूर जिल्ह्यात शिक्षण क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या उपक्रमशील शाळा, विद्यार्थ्यांना घडवणारे आदर्श शिक्षक, कला व क्रीडा विषयाचे आदर्श शिक्षक, आदर्श लिपिक व आदर्श शिक्षकेतर कर्मचारी यांची निवड शिक्षक भारतीच्या 'सावित्री फातिमा पुरस्कार २०२५' करिता करण्यात आलेली आहे. या निवडी जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधून करण्यात आलेल्या असून या गुणगौरव सोहळ्यात जिल्ह्यातून ७५ पुरस्कारांचे वितरण होणार आहे. या पुरस्कारांची घोषणा शिक्षक भारती सावित्री फातिमा पुरस्कार संयोजन समितीच्या वतीने करण्यात आली. पुरस्कारांचे वितरण खा. प्रणिती शिंदे, जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, शिक्षक भारतीचे संस्थापक मुंबई शिक्षक मतदार संघाचे माजी आमदार कपिल पाटील तसेच राज्याध्यक्ष अशोक बेलसरे, राज्य कार्याध्यक्ष सुभाष मोरे, प्राथमिक राज्याध्यक्ष नवनाथ गेंड यांच्या हस्ते होणार आहे. या पुरस्कार वितरण कार्यक्रमास सातारा, सांगली, कोल्हापूर, पुणे व अहिल्यानगर येथील शिक्षक भारतीचे अध्यक्ष व पदाधिकारी उपस्थित राहणार असल्याचे सोलापूर शिक्षक भरतीचे जिल्हाध्यक्ष सुजितकुमार काटमोरे यांनी सांगितले. शिक्षक भारती सावित्री फातिमा पुरस्कार २०२५ च्या संयोजन समितीचे काम देवदत्त मेटकरी, नितीन रुपनर, शरद पवार, अभिनंदन उपाध्ये, शरीफ चिक्कळी यांनी पार पाडले आहे. जिल्हा संघटनेचे सचिव सूर्यकांत कणमुसे, उपाध्यक्ष रियाज अहमद अत्तार, प्रकाश आतनुर, शाहू बाबर, जिल्हा संपर्कप्रमुख रामेश्वर सोलापूरे, रणजीत दडस, कार्याध्यक्ष शशिकांत पाटील, कोषाध्यक्ष राज देवकाते यांनी पुरस्कारासाठी निवड झालेल्या शाळा, शिक्षक, कला क्रीडा शिक्षक, लिपिक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे संघटनेच्या वतीने अभिनंदन केले.

## शहीद जवान संस्थेच्या वतीने सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि. ४ जानेवारी -**

सांगोल्यातील शहीद जवान संस्थेच्यावतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती नेहरू चौक येथे साजरी करण्यात आली. सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस इनरव्हील क्लब अध्यक्षा स्वाती अंकलगी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी दिपाली कोळसे पाटील म्हणाले बालिका दिन हा आपल्या समाजातील मुलींचे महत्त्व सांगून आपण सर्वांनी एकत्र येऊन मुलींचे भविष्य उज्वल करूया हीच खरी सावित्रीबाईंना आदरांजली ठरेल असे मत व्यक्त केले. विद्यार्थीनी तेजस्विनी शितोळे हिचा बालिका दिनाचे औचित्य साधून सन्मान करण्यात आला. यावेळी आरती जाधव, शितोळे, पोपटराव घुले, सुरेश फुले, मकरंद अंकलगी, संजय माळी, ओंकार साळुंखे, धनाजी शिर्के, देवा मासाळ, आजित जाधव व शहीद जवान संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.




## वाचन हे व्यक्तिमत्त्व विकासाचे एक माध्यम : डॉ. पालके

### शिक्षणशास्त्र महाविद्यालयात लेखक व विद्यार्थी वाचन संवाद उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ४ जानेवारी-**

वाचन हे व्यक्तिमत्त्व विकासाचे एक माध्यम असून व्यक्तिगत व सामाजिक पातळीवरील विविध घटकांचे आकलन त्यामधून होवू शकते. त्यासाठी बहुभाषी व बहुसांस्कृतिक होणे गरजेचे आहे. शब्दांच्या विश्वाला वाचन समृद्ध करत लेखकाच्या प्रवासाकडे नेते. माणसांच्या सहवासातून अनुभवांचे विश्व विस्तारते, असे मत डॉ. राहुल पालके यांनी व्यक्त केले.

येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात वाचन, संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत आयोजित केलेल्या लेखक व विद्यार्थी वाचन संवाद या उपक्रमांतर्गत आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. सुग्रीव गोरे व नॅक समन्वयक प्रा. विष्णु शिखरे उपस्थित होते. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य गोरे यांनी शिक्षणाचे ध्येय विषद करुन जीवनात यशस्वी होण्यासाठी वाचन परंपरा समृद्ध झाली. त्यासाठी विविध विषयातील ज्ञान घेवून अद्ययावत राहण्याचे विद्यार्थ्यांना सांगितले. त्यांनी लेखक होण्यासाठी नित्य वाचन, मनन, चिंतन व प्रकटीकरण करावे असे सांगितले.



प्रास्ताविक जाधव यांनी केले तर प्रमुख पाहुण्यांची ओळख डिसले सर यांनी करून दिली तसेच आभार पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन नरळे यांनी केले.

## वैराग पत्रकार संघाच्या उपाध्यक्षपदी रामदास पवार

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ४ जानेवारी-**



वैराग पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी बलभीम लोखंडे (दै.सकाळ) तर उपाध्यक्षपदी रामदास पवार (दै. तरुण भारत) यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. वैराग (ता. बार्शी ) येथे ३ जानेवारी रोजी शुक्रवारी ज्येष्ठ पत्रकार भागवत वाघ यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजीत करण्यात आली होती यावेळी वैराग पत्रकार संघाच्या विविध पदाधिकाऱ्यांच्या सर्वानुमते निवडी करण्यात आल्या आहेत .वैराग पत्रकार संघाची अन्य कार्यकारणी पुढील प्रमाणे आहे.सचिव भागवत वाघ (दै . तरुण भारत संवाद) , खजिनदार राहुल दळवी (दै . दिव्य मराठी ) सहसचिव काशिनाथ क्षिरसागर ( दै. पुढारी ) प्रसिद्धी प्रमुख अण्णासाहेब कुरूलकर (दै. संचार) संघटक कालिदास देवकते (दै . जनमत ) सदस्य सुजित काकडे (दै. जनसत्य ) आदींची निवड करण्यात आली. यावेळी इतर पत्रकार बांधव उपस्थित होते. वैराग ग्रामीण पत्रकार संघाच्या निवडी जाहीर झाल्यानंतर नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत पत्रकारांचे विविध प्रश्न सोडविणे, सामाजीक उपक्रम राबविणे आदी विषयावर चर्चा करण्यात आली.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## उत्कर्ष प्राथमिक विद्यालयाची शैक्षणिक सहल उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३ जानेवारी-**

उत्कर्ष प्राथमिक विद्यालयाची इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल उत्साहात पार पडली. पाठ्यपुस्तकातील इतिहास व गड किल्ले यांची प्रत्यक्ष माहिती मुलांना व्हावी म्हणून पन्हाळा गड व शाहू पॅलेस या ठिकाणी सहलीचे आयोजन करण्यात आले होते. पन्हाळा गड येथे उपस्थित गाईडने इतिहासातील पन्हाळगडाचे महत्व सांगितले.

गडावरील सज्जा कोटी, अंबरखाना, तीन दरवाजे यांच्या विषयी माहिती दिली. यामुळे



मुलांच्या डोळ्यासमोर इतिहास उभा राहिला. तसेच कोल्हापूर येथील शाहू पॅलेस येथे विद्यार्थ्यांनी शाहू महाराजांचे साहित्य, शस्त्र, त्यांच्या वापरलेल्या वस्तू, वेगवेगळे प्राणी पाहिले. ते पाहताना मुलांना खूप कुतूहल वाटत होते. यावेळी विद्यार्थ्यांनी प्रवासात गाण्यांच्या भेंड्या, नावाच्या भेंड्या, कोडे सांगणे, गाण्यांवर नृत्य करून आनंद घेतला. सदर सहल यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका विश्रांती मागाडे, उपमुख्याध्यापिका स्वराली कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक नवनाथ शेळके, शिक्षिका दिपाली माळी, स्नेहल रसाळ, पुनम भाकरे, अश्विनी भोसले, दिपाली होनराव, प्रिया देशपांडे, सुरेखा केंगार, वैशाली निराळी यांनी परिश्रम घेतले.



## संक्षिप्त वृत्त...



### माढ्यात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना जयंतीनिमित्त अभिवादन

**माढा, दि. ४ जानेवारी-**

महात्मा फुले प्रतिष्ठान व महात्मा फुले युथ फौंडेशनच्या वतीने माढा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांच्या १९४ व्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी नगराध्यक्षा ॲड. मिनलताई साठे, तहसीलदार विनोद रनवरे, सपोनि नेताजी बंडगर, उपनगराध्यक्ष कल्पनाताई जगदाळे, माजी जिल्हा परिषद सदस्य झुंजार भांगे, राष्ट्रवादीचे नेते दादासाहेब साठे, सभापती विकास साठे, नितीन साठे, नगरसेवक शहाजी साठे, अरविंद खरात, नगरसेविका सुनीता राऊत, संजीवनी भांगे, शबाना बागवान, निर्मला थोरात, रेश्मा लंकेश्वर,वंदना लंकेश्वर, अर्चना राऊत, विद्या राऊत, कविता राऊत, दिनेश जगदाळे, गोरख वाकडे, प्रमोद वेदपाठक, डॉ . अभय लुणावत, डॉ. पंकज दोशी, डॉ. विकास मस्के, माजी नगराध्यक्ष गंगाराम पवार, नागनाथ घाडगे, आनंद भांगे, शहाजी चवरे, भैय्या खरात, सुधीर लंकेश्वर, शिवाजी जगदाळे, दिनेश गाडेकर, प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष डॉ. हनुमंत क्षीरसगार, सचिव लक्ष्मण राऊत, महात्मा फुले फाऊंडेशनचे संग्राम राऊत, सागर राऊत, हनुमंत भोसले, धनाजी वसेकर, पांडुरंग पुजारी, सुनील राऊत, रामहरी वहील आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन दत्तात्रय चवरे व लक्ष्मण राऊत यांनी केले. अंकिता आनंद भांगे आणि दीप्ती विकास कदम यांनी सीए परीक्षेत यश मिळविल्याने त्यांचा सत्कार करण्यात आला.



### जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत मोडनिंब जि. प. शाळा विजयी

**मोडनिंब, दि. ४ जानेवारी-**

बार्शी येथे जिल्हा परिषदेच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेमध्ये लहान गटात मोडनिंब येथील जि.प. शाळेने विजेतेपद पटकावत सोलापूर जिल्ह्यामध्ये अजिंक्य राहण्याचा मान पटकावला. मुख्याध्यापक व मुख्य प्रशिक्षक राजन सावंत आणि सहप्रशिक्षक दादा गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली या शाळेच्या मुलांनी अथकपणे कबड्डीच्या मैदानावर सराव केला होता. केंद्र स्तरापासून ते जिल्हा स्तरापर्यंत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नं. एकच्या लहान गटातील विद्यार्थ्यांनी कबड्डी खेळामध्ये आपल्या उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत व सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यामधील विजेत्या संघाशी टक्कर देत जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांक पटकाविला आहे. सर्व खेळाडू व मार्गदर्शक राजन सावंत, दादा गायकवाड, वैभव शिंदे, वृषाली भोसले यांचे गटशिक्षणाधिकारी यादव व शाळा व्यवस्थापन समितीने अभिनंदन केले.



### उपळे दुमाला येथील वृद्धाश्रमामध्ये सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**बार्शी, दि. ४ जानेवारी-**

तालुक्यातील उपळे दु. येथील सहारा वृद्धाश्रममध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. आसावरी जाधव मॅडम यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करुन व वृद्धाश्रममधील आजी-आजोबांना फळे व अन्नदान करुन जयंती साजरी करण्यात आली. यावेळी सहारा वृद्धाश्रमचे संस्थापक राहुल भड तसेच वृद्धाश्रममधील आजी-आजोबांच्या उपस्थितीमध्ये सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

### धर्मपुरीतील जाधव वस्ती जि. प. शाळेच्या इमारतीचा लोकार्पण सोहळा

**नातेपुते, दि. ४ जानेवारी-**

धर्मपुरी येथील जिल्हा परिषद प्राथ शाळा जाधववस्ती शाळा इमारतीचा लोकार्पण सोहळा क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंती दिनी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. धर्मपुरी येथील जाधववस्ती ही शाळा पुणे पंढरपूर पालखी महामार्ग सुधारणात बाधित झाली होती. १ जानेवारी १८१८ रोजी सावित्रीमाई फुले यांनी मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. त्यांच्या जयंतीचे औचित्य साधून या शाळेच्या नूतन दोन वर्गखोल्यांचे लोकार्पण गटविकास अधिकारी आबासाहेब पवार, सरपंच नीता नवनाथ झेंडे यांनी केले. यावेळी माजी सरपंच बाजीराव काटकर यांनी मनोगत व्यक्त केले. शाळेला जागा दिल्याबद्दल दिलीप जाधव यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी विस्तार अधिकारी सुनिल जाधव, उपसरपंच नितीन निगडे, मुख्याध्यापक दत्तात्रय झेंडे, अमित मसुगडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष निलेश निगडे, उपाध्यक्ष सोनाली कुलाळ, गोरख निगडे, संतोष धुमाळ उपस्थित होते.

## महायुतीच्या मंत्र्यांना नक्की झालंय तरी काय...?







पंढरपूर : दोनच दिवसापूर्वी राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी आपल्या गाड्यांचा ताफा थेट मंदिरापर्यंत नेला. त्यानंतर सारवासरव करीत आपणाला गर्दीची कल्पना नव्हती असे म्हणत वेळ मारुन नेली. दरम्यान भाजपाचे दुसरे जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री गिरीष महाजन यांनी विखे-पाटलांचीच री ओढत शनिवारी आणि रविवारी पंढपुरात विठुरायाच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी असतानादेखील आपल्या समवेत असलेल्या गाड्यांचा ताफा थेट विठ्ठल मंदिरापर्यंत नेला. एरव्ही जाऊ द्या, निदान गर्दीच्या वेळी तरी भाविकांना त्रास होणार नाही, याची दक्षता मंत्र्यांसह सर्वांनीच घेतली पाहिजे. गर्दीच्या वेळी मंदिर परिसरात गाड्या शिरल्याने सर्वसामान्य भाविकांचे विशेषत: वृध्द, लहान मुले आणि महिलांना याचा कमालीचा त्रास सहन करावा लागतो आहे. त्यामुळे मंत्री महोदयांच्या या कृतीबद्दल सर्वसामान्य भाविकांमधून मात्र नाराजीचा सूर अळविला जात आहे.

## बांधकाम कामगारांना वेठीस धरण्याचे थांबवा

### बाळासाहेब तुपसमिंदर : ऑनलाईन वेबसाईट खुली करा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ४ जानेवारी -**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून बांधकाम कामगारांना नवीन नोंदणी, नोंदणीचे नूतनीकरण, बांधकाम कामगारांच्या शिक्षण घेणाऱ्या पाल्यासाठीच्या शिष्यवृत्तीचे व विविध योजना अंतर्गत अर्ज करता येणारी ऑनलाईन वेबसाईट पूर्वीसारखीच खुली करा आणि बांधकाम कामगारांना वेठीस धरण्याचे थांबवा, अशी मागणी राष्ट्रजनहित असंघटित कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब तुपसमिंदर यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

बांधकाम कामगारांची कामे जलद गतीने व्हावी म्हणून महाराष्ट्र सरकारने ऑनलाईन प्रणाली चालू केली होती. सदरची ही ऑनलाईन प्रणाली सर्वांसाठी खुली व सुरळीतपणे सुरु होती. त्यामुळे बांधकाम कामगारांना त्यांच्या सोयीच्या वेळी विविध योजनेचे ऑनलाईन अर्ज करण्यास वेळ मिळत होता.

परंतु नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहितेच्या निमित्ताने सदरची वेबसाईट ही बंद करण्यात आली होती आदर्श आचारसंहिता संपल्यानंतर सदरची वेबसाईट सुरु झाली असून ती फक्त तालुका कामगार सुविधा केंद्रावरच आणि तालुक्याच्या ठिकाणीच सुरु झाल्यामुळे महाराष्ट्रातील लाखो कामगारांना गैरसोयीचे झाले आहे. त्यामुळे एकाच ठिकाणी सुरु



असलेल्या केंद्रावर प्रत्येक तालुक्यातील बांधकाम कामगारांचा त्यांच्या विविध योजनांचे ऑनलाईन करण्यात येणारी कागदपत्रे भरण्यासाठी प्रचंड वेळ लागत असून दिवसातून केवळ पन्नास लोकांचीच कामे करण्याचे केंद्राचे टारगेट असून बांधकाम कामगारांच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शिष्यवृत्ती ,आरोग्याचे फायदे, बांधकाम कामगार नूतनीकरण व इतर ऑनलाईन प्रणालीसाठी येणाऱ्या हजारो बांधकाम कामगारांना स्वतःचा रोजगार बुडवून या केंद्रावरती लाईन मध्ये उभे राहण्याची वेळ आली आहे.

दिवसातून केवळ पन्नासच लोकांची नोंदणी व इतर कामे करण्याचे टार्गेट असल्यामुळे हजारो कामगारांचे अतोनात हाल होत असून यामुळे शासन कामगारांना वेठीसच धरत आहे की काय अशी भावना बांधकाम कामगारांमधून व्यक्त होत आहे.

#### अन्याय थांबवा

बांधकाम कामगारांच्या आर्थिक उन्नतीसाठी सुरू केलेली ही योजना महाराष्ट्र इमारत कामगार मंडळाने सदरची ऑनलाइन वेबसाईट पूर्वीसारखी सर्वांसाठी खुली करून कामगारांवरती होणारा अन्याय थांबवावा अन्यथा या विरोधात संपूर्ण महाराष्ट्रातून तीव्र स्वरूपाचे आंदोलन उभे केले जाईल असा इशारा राष्ट्रीजनहित असंघटित कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब तूपसमिंदर यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

## जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी घेतले श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन

### श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर संवर्धन कामांची केली पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.४ जानेवारी-**



राज्याचे जलसंपदा (विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी आज सहकुटुंब श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले.यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगांवकर व शकुंतला नडगिरे यांच्या हस्ते शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला.

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिराचे जतन व संवर्धनाचे काम पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली सुरू जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी सदर कामांची पाहणी करुन, पुरातत्त्व विभाग व संबधित कंत्राटदारानी सदर कामास गती देऊन वेळेत व गुणवत्तापूर्ण करवीत अशा सूचना यावेळी दिल्या तसेच सुरु असलेल्या कामांना उपलब्ध निधीची माहिती घेवून, उपलब्ध निधीची कमतरता भासल्यास तात्काळ निधीची उपलब्धता शासनस्तरावरुन तात्काळ येईल असेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी आमदार समाधान आवताडे, माजी आमदार प्रशांत परिचारक, सोलापूर शहरचे पोलीस आयुक्त एम राज कुमार, उपविभागीय अधिकारी सचिन इतापे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, जलसंपदा विभागाचे अधिक्षक अभियंता श्री खांडेकर, प्र. तहसीलदार सचिन मुळीक, कार्यकारी अभियंता सोमशेखर हरसुरे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी मंदीर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात सुरू असलेल्या व करण्यात येणाऱ्या भविष्यातील कामांची माहिती यावेळी महाजन यांना दिली.

## कोयत्याचा धाक दाखवून मायक्रो फायनान्स लुटण्याचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ४ जानेवारी-**

परांडा रोड वैद वस्ती येथील ग्रामीण पुटटा मायक्रो फायनान्स ऑफिसमध्ये शिरुन दोघांकडून कोयत्याचा धाक दाखवून लुटण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी आदम अस्लम शेख यांनी शहर पोलीसात फिर्याद दिली आहे.

दि २ जानेवारी रोजी दुपारी ३.३० वाजण्याचे सुमारास दोघेजण सदरील मायक्रो फायनान्स आफीसमध्ये प्रवेश करुन कर्मचारी विलास नामवडे तसेच फिर्यादीच्या मानेवर कोयता धरुन कोयत्याचा धाक दाखवून कपाटाची चावी दे कपाटातील पैसे दे असे म्हणून कोयत्याने खुर्च्या टेबल भिंतीवर तसेच लॉकर व सीसीटिव्हीवर मारून नुकसान करुन पळुन गेला. त्या दोघांविरुद्ध बार्शी शहर पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे .



## योगासनाने कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ४ जानेवारी-**

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त योगासन स्पर्धा आयोजित संत तुकाराम सभागृह येथे घेण्यात आल्या होत्या , स्पर्धेमध्ये सोलापूर जिल्ह्यातील व धाराशिव जिल्हयामधील विविध ठिकाणावरुन ७२ स्पर्धक आलेले होते.

या स्पर्धेचे आयोजन यावर्षी बी.पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, यांच्याकडे देण्यात आले होते.स्पर्धा १४, १७ व १९ वर्षा खालील ( मुले व मुली ) महाविद्यालयीन व खुला गट अशा पद्धतीने उत्साहामध्ये पार पडल्या. स्पर्धेचं पारितोषिक वितरण सोहळा प्राचार्य डॉ. एस.बी. करंडे , प्रा. प्रफुल्ल गाढवे, पंच वेदपाठक, साबळे, उपळकर, सुरवसे, लोमटे, सरवदे सर, मोरे मॅडम, दिशा व निशा परदेशी , हिमानी राऊत व खैरनार मॅडम यांनी पारदर्शकपणे पर्यवेक्षण केले. प्रत्येक गटामधून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या खेळाडूस संस्थेच्यावतीने प्रमाणपत्र, पुस्तक व एक रोप देऊन त्यांचा सत्कार केला. तसेच प्रत्येक गटामधून उत्तेजनार्थ दोन खेळाडूस संस्थेचे प्रमाणपत्र देण्यात आले.

स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी क्रीडाशिक्षिका शिंदे रुपाली व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. दत्तप्रसाद सोनटक्के यांनी परिश्रम घेऊन स्पर्धा पार पाडल्या.

## औद्योगिक ग्राहकांचे वीजपुरवठ्याबाबतचे प्रश्न प्राधान्याने सोडवणार

### मुख्य अभियंता धर्मराज पेठकर यांची हमी

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. ४ जानेवारी-**

बारामती एमआयडीसी, पणदरे एमआयडीसी, बारामती सहकारी औद्योगिक वसाहतीसह परिसरातील औद्योगिक ग्राहकांचे वीज पुरवठ्यासंबंधी प्रश्न सोडणवण्यासाठी आपण प्राधान्य देऊ अशी ग्वाही महावितरण बारामती परिमंडळाचे नवनियुक्त मुख्य अभियंता धर्मराज पेठकर यांनी दिली.

मुख्य अभियंता पदाचा कार्यभार पेठकर यांनी नुकताच स्विकारल्यानंतर बारामती इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट



असोसिएशनचे अध्यक्ष धनंजय जामदार, सचिव अनंत अवचट, सदस्य महादेव गायकवाड, संभाजी माने व हरिश्चंद्र खाडे यांनी सदिच्छा भेट घेतली त्यावेळी पेठकर बोलत होते. धनंजय जामदार म्हणाले बारामती एमआयडीसीतील ट्रान्सफॉर्मर पंधरा ते वीस वर्षापूर्वी बसवलेले असून त्यातील बहुसंख्येने ओव्हरलोड झाले आहेत. त्यामुळे उद्योगांनी नवीन अथवा वाढीव वीजपुरवठा मागितला तर लोड शिल्लक नसलेचे सांगितले जाते व यामुळे उद्योग वाढीवर विपरीत परिणाम होत आहे तसेच महावितरणचा महसूल देखील बुडत आहे.

यासाठी महावितरणने संपूर्ण औद्योगिक क्षेत्रातील सर्व ट्रान्सफॉर्मर्सचे सर्वेक्षण करावे व उद्योगांची वाढीव वीज पुरवठ्या बाबतची मागणी विचारात घेऊन महावितरणच्या खर्चाने आवश्यक तेथे मोठ्या क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर्स बसवणे आवश्यक आहे. पणदारे एमआयडीसी मधील उद्योगांच्या वीज पुरवठाबाबत प्रदीर्घ काळापासून अनेक तक्रारी असून त्यासाठी ढाकाळे येथील मंजूर वीज उपकेंद्र तातडीने कार्यान्वित करावे व पणदरे मधील उद्योजकांना दिलासा द्यावा अशी आग्रही मागणी अध्यक्ष धनंजय जामदार यांनी यावेळी केली.

#### आढावा घेऊन समस्या सोडवणार

बारामती इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी वीज पुरवठा विषयी उपस्थित केलेले प्रश्न महत्वाचे असून आपण त्याचा आढावा घेऊन समस्या सोडवण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करू अशी ग्वाही मुख्य अभियंता धर्मराज पेठकर यांनी बिडा असोसिएशनच्या शिष्टमंडळाला यावेळी दिली.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## अॅड. व्यंकटराव गुंड यांच्या वाढदिवसानिमित ५१ रक्तदात्याचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जानेवारी -**

प्रति वर्षा प्रमाणे याही वर्षी भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा रुमापाता समूहाचे प्रमुख अॅड. व्यंकटराव गुंड यांच्या ५ जानेवारी वाढदिवसानिमित समर्थ नगर धाराशिव व पाडोळी (आ) येथे भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरामध्ये ५१ रक्तदात्याचे रक्तदान केले माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुधाकर गुंड गुरुजी यांची



प्रमुख उपस्तिथ होते.

रक्तदान शिबीराचे उदघाटन व्यवस्थापकीय संचालक अजित गुंड, रुपामाता अर्बन मल्टीस्टेट संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यनारायण बोधले, रूपामाता मल्टीस्टेट संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद खांडेकर, प्रशाशकीय अधिकारी विशाल गुंड यांनी केले या प्रसंगी जनरल जनरल मॅनेजर डी.जे. शितोळे, बालाजी यादव, गुरुदत्त लोंढे, तुषार पाटील, महादेव डोंगरे, विकास मुळे, महादेव झोंबाडे, व्ही. एस. शिंदे, प्रसन्न देशमुख, श्रीनिवास गाजरे, विकास पेठे, आनंद गलांडे, सचिन सोमवंशी व गावकरी उपस्तीत होते.

या शिबीरामध्ये हर्षल मोहिते, राहुल यादव यांनी परिश्रम घेतले.



### संक्षिप्त वृत्त...



### तेर येथे रथाचे स्वागत

**तेर, दि.४ जानेवारी -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथे चोखोबा ते तुकोबा एक वारी समतेची रथाचे स्वागत करण्यात आले. संत चोखामेळा अध्यासन केंद्र व वृंदावन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'चोखोबा ते तुकोबा' या समता वारीचे प्रतीवर्षीप्रमाणे आयोजन करण्यात आले आहे. समता वारी धाराशिव जिल्ह्यातून प्रबोधन प्रवास करत असून ४ जानेवारीला तेर येथे श्री संत गोरोबा काका मंदिरासमोर समता रथाचे आगमन झाले. यावेळी हभप. दिपक महाराज खरात यांनी समता रथाचे स्वागत केले. यावेळी नवनाथ पांचाळ, नरहरी बडवे, गोरख माळी, राहुल गायकवाड, सुनिल गायकवाड आदी उपस्थित होते. यावेळी समता वारी निमंत्रक सचिन पाटील, महादेव ढेंबरे, पांडुरंग काळे, मल्हारराव पिंपळे, तात्यासाहेब येरमाळकर आदी समता वारी प्रतिनिधी उपस्थित होते.



### भाजपा दिनदर्शिकेचे प्रकाशन

**परंडा, दि.४ जानेवारी -**

भारतीय जनता पार्टी, परंडा तालुकाच्या वतीने नवीन भाजपा दिनदर्शिका तयार करण्यात आलेल्या आहेत. या दिनदर्शिकेचे प्रकाशन भाजपा नेते मा. आ. सुजितसिंह ठाकूरसाहेब व जिल्हाध्यक्ष संताजीराजे चालुक्य-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रदेश कार्यकारिणी सदस्य अॅड. अनिल काळे, जिल्हा सरचिटणीस विकास कुलकर्णी, इंद्रजित देवकते, तालुकाध्यक्ष अॅड. गणेश खरसडे, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष अॅड. संतोष सुर्यवंशी, शहाजी पाटील व दिनदर्शिकेचे प्रकाशक बाबासाहेब जाधव तसेच इतर मान्यवर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



### बालीका दिन साजरा


**कदेर, दि.४ जानेवारी -**

उमरगा धाराशिव देशातील अध्य शिक्षिका देशातील अग्रगण्य समाज सुधारिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती श्री सिद्धेश्वर विद्यालय कसगी येथे उत्सवात साजरी करण्यात आली. विद्यालयातील शिक्षक भाऊसाहेब पाटील, अनुराधा मेहकरकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी इयत्ता पाचवी ते दहावी वर्गातील अनेक विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या महान जीवन कार्याचा इतिहास आपल्या मनोगतातुन व्यक्त केले. यावेळी जी.एन. कांबळे, मनोजकुमार गुरव, बी.सी पाटील, जी.एन पांचगे, किरण अंकुशे, पि.एन. गायकवाड, बसवराज कुंभार व विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### हनुमान चालीसा पठण

**तेरखेडा, दि.४ जानेवारी -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा येथे दर शनिवारी हनुमान चालीसाचे पठण करण्यात येत आहे. गावातील हनुमान



मंदिरात शेकडो ग्रामस्थ प्रत्येक शनिवारी रात्री ७:३० वाजता एकत्र येत हनुमान चालीसाचे पठण करत आहेत. अनेक दिवसापासून हनुमान चालीसाला तेरखेडा गावात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. विशेष म्हणजे लहान मुलांची याठिकाणी मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. प्रथम हनुमानजीची आरती करण्यात येत आहे. नंतर हनुमान चालीसा पठण झाल्यानंतर बजरंग बली की जय, जय श्रीराम, गौमाता की जय, हिंदू राष्ट्र की जय असा जयघोष केला जात आहे. तसेच हनुमान चालीसा झाला नंतर हनुमान भक्तांकडून प्रसाद वाटप केला जात आहे. शेवटी भजन कार्यक्रम आयोजन केला जात आहे.

### श्रीनिवास जेवळीकर यांचे निधन

**धाराशिव, दि.४ जानेवारी -**

एस.टी. महामंडळातील सेवानिवृत्त आस्थापना पर्यवेक्षक श्रीनिवास हणमंताचार्य जेवळीकर (वय ८८)



यांचे २ जानेवारी रोजी सकाळी ९.३० वाजण्याच्या सुमारास निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर लातूर येथील खाडगांव स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात ३ मुलं, एक मुलगी, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे. धाराशिव येथील जनकल्याण मल्टीस्टेट को ऑप. क्रेडिट सोसायटीचे व्यवस्थापक धनंजय जेवळीकर यांचे वडील होत.

### आमदार अभिमन्यू पवार यांच्या समवेत हजारो कार्यकर्त्यांसह घेतले आई तुळजाभवानीचे दर्शन...

# अभिमन्यू पवारांची सपत्नीक तुळजाभवानीच्या चरणी नवसपूर्ती







### स्थानिक भाजपा आमदारांची नवसपूर्ती पदयात्रेच्या स्वागताला दांडी...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ जानेवारी -**

देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व्हावे यासाठी आमदार अभिमन्यू पवारांची कार्यकर्त्यांसह औसा येथून बुधवारी निघालेली पदयात्रा दि.३ जानेवारीला तुळजापूर येथे पोहचली ढोलताशांच्या गजरात आमदार अभिमन्यू पवार व पत्नी शोभा अभिमन्यू पवार व मुलगा अॅड. परिक्षीत पवार यांनी आई तुळजाभवानीच्या चरणी दर्शन घेत नवसपूर्ती पुर्ण केली आहे. तीन दिवस ६० किलोमीटर पायी चालत हि पदयात्रा गुरूवारी सायंकाळी संपली आहे. यावेळी मोठ्या संख्येने भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

१ जानेवारीला हि पदयात्रा औसा येथून निघाली होती. १ तारखेला आशीव मुक्कामी तर २ तारखेला धाराशिव जिल्ह्यातील ताकविकी येथे मुक्कामी असा पायी प्रवास करीत ३ जानेवारीला तुळजापूर येथे पोहचली अत्यंत नियोजन व शिस्तबद्ध पद्धतीने हि तीन दिवसाची पदयात्रा शुक्रवारी सायंकाळी तुळजाभवानीच्या दर्शनाने पुर्ण झाली दरम्यान औसा विधानसभा मतदारसंघासह लातूर जिल्ह्यातील विविध ठिकाणावरून भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने या पदयात्रेत सहभागी झाले होते.

पदयात्रा निघाल्यापासून औसा व धाराशिव जिल्ह्यातील विविध गावात नागरिकांनी प्रचंड प्रतिसाद देत ज्या ठिकाणी पदयात्रा पोहचेल त्याठिकाणी फटाके फोडून स्वागत केले. दरम्यान शुक्रवारी आमदार अभिमन्यू पवार, शोभा पवार, अॅड परिक्षीत पवार यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आई तुळजाभवानीचे दर्शन घेत नवसपूर्ती केली. यावेळी आमदार अभिमन्यू पवार यांनी सपत्नीक आई तुळजाभवानीची पुजा करून नवसपूर्ती केली. तीन वर्षांपासून पदयात्रा काढून त्यावेळेच्या ठाकरे सरकारला सद्बुद्धी द्यावी अशी याचना करीत राज्यात पुन्हा देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री व्हावे असा नवस केला होता. नवस पुर्ण झाल्यास औसा ते तुळजापूर नवसपूर्ती पदयात्रा काढणार असल्याचा नवस बोलला होता. दरम्यान आई तुळजाभवानीच्या कृपेने हि नवसपूर्ती पुर्ण झाली असल्याचे यावेळी बोलताना सांगितले.

तसेच महाराष्ट्राच्या कल्याणासाठी पुन्हा देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले आणि माझा नवस पूर्ण झाला, म्हणून मी पायी औसा ते तुळजापूर नवसपूर्ती पदयात्रा पुर्ण केल्याचे सांगितले.

### नागरिकांत चर्चेचा विषय...

आमदार अभिमन्यू पवार यांनी राज्यात महायुतीचे सरकार स्थापन व्हावे व देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व्हावे यासाठी श्री तुळजाभवानी मातेला नवस केला होता. त्याची नवसपुर्ती करण्यासाठी काढण्यात आलेली पदयात्रा तुळजापूर तालुक्यात प्रवेश केल्यानंतर सदर पदयात्रेच्या स्वागताला स्थानिक भाजप आमदार राणाजगजितसिंह पाटील हे गैरहजर होते. तसेच पाटील परिवारातील एकही सदस्य या पदयात्रेच्या स्वागताला हजर नव्हता. एवढंच नाहीतर या पदयात्रेचे स्वागत करणारे फ्लेक्स बोर्ड स्वागत कमानी सुद्धा लावण्यात आल्या नव्हत्या. स्वतःला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मर्जीतील विश्वासू आमदार म्हणून मिरवीणारे राणा पाटील हे मंत्रीपद न मिळाल्याने पक्षात नाराज आहेत की काय अशी उलट-सुलट चर्चा कार्यकर्ते व नागरिकांतून सुरू आहे.

## कलदेव निंबाळा येथे नळ कनेक्शन कामास सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.४ जानेवारी -**

तालुक्यातील कलदेव निंबाळा येथे जल जीवन मिशन अंतर्गत कायम स्वरूपी पाणी पुरवठा योजने अंतर्गत नळ कनेक्शन देण्याच्या कामाचे उद्घाटन उपसरपंच तथा राष्ट्रवादीच्या जिल्हा महिला उपाध्यक्षा सुनिता देविदास पावशेरे यांच्या हस्ते करण्यात आले.

अनेक वर्षांपासून कलदेव निंबाळा येथे पाणी पुरवठा योजना राबविली गेली नव्हती. सुनिता पावशेरे या प्रथम लोकनियुक्त सरपंच म्हणून निवडून आल्यानंतर त्यांनी पाणी पुरवठा योजनेस सर्वाधिक प्राधान्य दिले. या कामाचा सर्वच स्तरावर सातत्यानने पाठपुरावा करून ही योजना मंजूर करून आणली होती.

माकणी येथील धरणावरुन ही महत्वपूर्ण योजना राबविण्यात येत आहे. गावातील ५५४ कुटूंबाना नव्याने नळ कनेक्शन देण्यात येत आहेत. त्यानंतर महिनाभरात पाणीपुरवठा सुरु होण्याची शक्यता आहे.

यावेळी युवराज धनेराव, शरीक मुगळे, ग्राम पंचातय सरपंच गुरलिंग बोकडे तसेच व्यंकट पाटील, रमेश पाटील, रवी ढोणे अनिरुध्द कांबळे, वत्सलाबाई कांबळे, शोभा कांबळे, रुक्मिणी कांबळे, सेवक विठ्ठल दास यांच्यासह गावातील नागरिक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उंडरगाव ते तोरंबा रस्त्याची चाळणी; खासदार, आमदार लक्ष देणार का?

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.४ जानेवारी -**

उंडरगाव ते तोरंबा रस्त्याची अंत्यत दूराव्यवस्ता झाली असून हा रस्ता तीन तालुक्याच्या सरहद्दीली जोडणारा प्रमुख रस्ता असून रहदारीच्या रस्त्याकडे प्रशासनासह खासदार व दोन आमदारांचे दुर्लक्ष झाल्याने नागरीकातुन नाराजी व्यक्त केली जात आहे.

तोरंबा ते उंडरगाव हा ७ कि.मी. अंतराचा सरहद्दीवरील रस्त्याचे काम गेल्या ३० वर्षांपूर्वी याचे डांबरीकरण करण्यात आले होते. त्यानंतर कधी याची साधी डागडुजी सुध्दा करण्यात आली नाही. पण या रस्त्याची डागडुजी केल्याची शासन दरबारी नोंद



झाल्याची माहितीसमोर येत आहे. या रस्त्यावर मोठ मोठी खड्डे पडले असून रस्त्यात खड्डा कि खड्ड्यात रस्ता असा सवाल नागरिकांत उपस्थित होत असून सदरील खडे चुकवितांना वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. गेल्या तीस वर्षापासून संबधीत विभागाचे दुर्लक्ष झाल्याने लोहारा सार्वजनिक बांधकाम उपविभाग व तुळजापूर बांधकाम उपविभाग कार्यालयाच्या भांडणात हा रस्ता अडकल्याची चर्चा ऐकायला मिळत आहे. तुळजापूर, धाराशिव व लोहारा या तीन तालुक्याच्या सरहद्दीवरील हा रस्ता असुन हा रस्ता नेमका कोणत्या विभागाने दुरुस्त करायचा या भांडणात हा रस्ता गेल्या अनेक वर्षांपासून नादुरुस्त असुन त्याचा फायदा रात्री बेरात्री चोरटे घेत आहेत. धाराशिव तालुक्यातील तोरंबा पार्टीपासून ते लोहारा तालुक्यातील उंडरगाव व तुळजापूर तालुक्यातील कार्ला हद्दीपर्यंत रस्त्याची दैयनिय दुरवस्था झाल्याने या रस्त्यावर छोटे-मोठे अपघात होऊन अनेकांना कायमचे अंधत्व आले असुन हा रस्ता सलगरा (दि.) मार्गे नळदुर्ग राष्ट्रीय महामार्गाला जोडल्याने सतत वाहनांची रात्रंदिवस रहदारी होत असते. या रस्त्याकडे प्रशासनासह खा. ओमराजे निंबाळकर तर तुळजापूर आमदार राणाजगजितसिंह पाटील व उमरगा-लोहारा आमदार प्रवीण स्वामी यांचे दुर्लक्ष होत असल्याने त्या सर्व लोकप्रतिनिधीनी व प्रशासनाने लवकरात लवकर रस्ता दुरुस्त करावे अशा प्रतिक्रिया नागरीकांतुन दिल्या जात आहेत.

## दिव्यांग, गर्भवती महिलांसाठी मोफत रिक्षा सेवा



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.४ जानेवारी -**

नळदुर्ग शहरातील इंदिरानगर येथील सुरज किरण मस्के या युवकांने रिक्षा चालविण्याचा व्यवसाय सुरु केला असुन या व्यवसायाच्या माध्यमातुन त्याने एक अफलातुन आणि सर्वांना लाजवेल असे सामाजिक कार्य सुरु केले आहे. दिव्यांग व्यक्ती आणि गर्भवती महिलांसाठी त्याने मोफत रिक्षा सेवा गेल्या सहा महिन्यांपासुन सुरु केली आहे. त्याचे हे कार्य आदर्शवत व कौतुकास्पद आहे.

नळदुर्ग येथील सुरज किरण मस्के याने शहरात रिक्षा चालविण्याचा व्यवसाय सुरु केला आहे. घरची परीस्थिती तशी जेमतेमच आहे. मात्र अशाही परिस्थितीत सुरज मस्के याने रिक्षा चालविण्याच्या माध्यमातुन अतिशय महत्वाचे असे सामाजिक कार्य सुरु केले आहे. त्याने दिव्यांग व्यक्ती आणि गर्भवती महिलांसाठी मोफत रिक्षा सेवा सुरु केली आहे. असे कार्य करणे हे खऱ्या अर्थाने माणुसकीचा धर्म जिवंत ठेवण्यासारखे आहे. हे कार्य करण्यासाठी सुरजला त्याचे वडील किरण मस्के यांची खंबीर साथ मिळाली आहे. सुरजने हा कौतुकास्पद उपक्रम गेल्या सहा महिन्यांपासुन सुरु केला आहे. सर्व जाती धर्मातील थोर महापुरुषांचे फोटो लावले आहेत.

त्याचबरोबर बेटी बचाओ, बेटी पढाओ हा संदेशही सुरजने आपल्या रिक्षावर लिहला आहे. सुरज मस्के याचे हे कार्य फार मोठे व सर्वांना प्रेरणा देणारे आहे.

## पत्रकार संघाच्या शहराध्यक्षपदी सचिन ताकमोघे

### जिल्हा उपाध्यक्षपदी संजय खुरुद व तालुकाध्यक्षपदी प्रदिप अमृतराव तर सचिवपदी शुभम कदम यांच्या निवड..

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ जानेवारी -**

धाराशिव जिल्हा पत्रकार संघ संलग्न असलेल्या तुळजापूर तालुका पत्रकार संघाची जम्बो कार्यकारिणी जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष चंद्रसेन देशमुख, सरचिटणीस भीमाशंकर वाघमारे यांनी जाहीर केली आहे. यामध्ये तुळजापूर शहराध्यक्षपदी सोलापूर दैनिक तरुण भारतचे तुळजापूर तालुका प्रतिनिधी सचिन ताकमोघे यांची सर्वानुमते एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच तालुकाध्यक्षपदी प्रदिप अमृतराव



यांची निवड करण्यात आली आहे. उपाध्यक्ष म्हणून ज्ञानेश्वर गवळी, सचिवपदी शुभम कदम निवड करण्यात आली आहे.

उर्वरित कार्यकारणीमध्ये सहसचिवपदी गणेश गायकवाड, तालुका कोषाध्यक्ष सोमनाथ शेटे, तुळजापूर शहर उपाध्यक्ष म्हणून सुरज बागल, शहर सचिव अमीर शेख तर शहर कोषाध्यक्षपदी सिद्दीक पटेल आणि सदस्य म्हणून प्रमोद कावरे, सचिन ठेले, गुरुनाथ बडुरे, अजित चंदनशिवे, सतिश पवार यांची निवड करण्यात आली आहे. तर जिल्हा कार्यकारणीत जिल्हा उपाध्यक्ष म्हणून संजय खुरुद तर सदस्य म्हणून जगदीश कुलकर्णी, सतीश महामुनी, गोविंद खुरुद, अनिल आगलावे यांची निवड करण्यात आली आहे.

पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी तालुका पत्रकार संघ नेहमीच अग्रेसर असतो. या नुतन कार्यकारणीच्या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

## मांजरा शुगर इंडस्ट्रीज (कंचेश्वर) कारखान्याकडुन डिसेंबर अखेर गाळपास आलेल्या ऊस बिलाची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जानेवारी -**

मांजरा शुगरचे मार्गदर्शक सहकार महर्षी व महाराष्ट्राचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचे मार्गदर्शनाखाली तुळजापुर तालुक्यातील मंगरुळ येथील मांजरा शुगर इंडस्ट्रीज कारखान्याचा गाळप हंगाम सन २०२४-२५ यशस्वीपणे चालु असुन दि.२ जानेवारी अखेर कारखान्याचे गाळप १,३२,३४० मेट्रीक टन इतके झाले आहे.

कारखान्याने दि.१६ ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत गाळपास आलेल्या ऊस बिलाचे पेमेंट एफआरपी पोटी प्रती मेट्रीक टन २ हजार ७०० रूपये प्रमाणे दि.४ रोजी ऊस पुरवठादार शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केलेली आहे.

धाराशिव व परिसरातील शेतकऱ्यांना यापुर्वी आपला ऊस गाळपास देण्यासाठी अनंत अडचणींचा सामाना करावा लागयाचा. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या कष्टाचे मोल करत अल्पावधीतच मांजरा शुगर कारखान्याने शेतकऱ्यांचा ऊस वेळेवर गाळपास आणुन व ऊस बिलाची रक्कम वेळेत अदा करुन त्यांचा विश्वास संपादन केला आहे. मांजरा शुगर इंडस्ट्रीज विषयी शेतकऱ्यांची असलेली विश्वार्हता यामुळेच कार्यक्षेत्र व भागातील ऊस उत्पादक शेतकरी मांजरा कारखान्यास ऊस पुरवठा करण्यासाठी उत्स्फुद प्रतिसाद देत आहेत.

कारखाना व्यवस्थापनाने भागातील सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा ऊस गाळप करण्याचे नियोजन केले असुन शेतकऱ्यांनी त्यांचे ऊसाची अन्य विल्हेवाट न करता मांजरा शुगर इंडस्ट्रीज (कंचेश्वर) कारखान्यास जास्तीत जास्त ऊस पुरवठा करुन सहकार्य करण्याचे आवाहन कारखान्याचे जनरल मॅनेजर सतीश वाकडे यांनी केले.

## जिल्हास्तरीय दिशा समितीचे आढावा बैठकीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जानेवारी -**

जिल्हा स्तरीय सनियंत्रण व समन्वयक दिशा समिती सभेच्या आढावा बैठकीचे आयोजन दि.६ जानेवारी रोजी खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले आहे. सदर आढावा बैठकीमध्ये विविध विषयाचा आढावा घेण्यात येणार असून सदर बैठक नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालय परीसर धाराशिव येथे दु. १२ वा. होणार आहे.



या आढावा बैठकीमध्ये रेल्वे, राष्ट्रीय महामार्ग, राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रम, डिजीटल इंडीया अंतर्गत भुमी अभिलेखाचे संगणकीकरण महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हामी योजना, प्रधानमंत्री उज्वला योजना, स्वच्छ भारत मिशन, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना, दिनदयाळ अंत्योदर योजना, राष्ट्रीय ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रम, प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना, खरीप पिक कर्ज वाटप आदी योजनेसह विविध विभागातील महत्वपुर्ण योजनेचा आढावा देण्यात येणार आहे.

CMYK

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## जयप्रकाश विद्यालयात पी.पी माने यांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जानेवारी -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे बेंबळी पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक माने पी.पी. यांनी विद्यार्थ्यांना पोलीस स्टेशनचे कामकाज व मुलींनी स्वतःच्या सुरक्षेबाबत घ्यावयाची खबरदारी व उपाय याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले व स्पर्धा परीक्षेबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्राचार्य जयप्रकाश कोळगे यांनी माने यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. विद्यार्थ्यांना या मार्गदर्शनामुळे सुरक्षिततेचे महत्व समजुन घेवून येणाऱ्या अडचणीवर मात करण्यासाठी महत्वाचे मार्गदर्शन लाभले. प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा परीक्षेशिवाय पर्याय नाही.

त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला स्पर्धा परीक्षेला सामोरे जावे लागेल. याबद्दलही सखोल मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. याप्रसंगी डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी सुभाष कोळगे, माजी जि.प. सदस्य रामदास कोळगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, बेंबळी पोलीस स्टेशनचे कर्मचारी कुलकर्णी, बोंदर, विद्यालयाचे पर्यवेक्षक डोंगरे के.ए., प्रा.रामराजे लावंड, विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सचिन कांबळे यांनी तर आभार गणेश शेटे यांनी मानले.

### सावित्रीबाई फुलेंना अभिवादन...



## सहकारी पतसंस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

**धाराशिव, दि.४ जानेवारी -**

शिक्षण महर्षी सुभाष कोळगे सहकारी पतसंस्थेच्या २०२५ वार्षिक दिनदर्शिकेचे प्रकाशन गुरुवारी (दि.२)रोजी सेवानिवृत्त पोस्टमास्टर तथा प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरी विश्वविद्यालय आनंदनगर धाराशिव सेंटरचे ब्रह्माकुमार सुरेश जगदाळे यांच्या हस्ते करण्यात आले. शहरातील पोलिस लाईन समोरील संस्थेच्या कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या दिनदर्शिका प्रकाशन कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून सुरेश जगदाळे यांची उपस्थिती होती. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रामदास कोळगे, भारतीय किसान संघाचे जिल्हाध्यक्ष नितीन घुले, श्री साई श्रद्धा एज्युकेशन संचालक प्रा. सोमनाथ लांडगे, सुभाष कदम-पाटील, डॉ. वसंत मुंडे, महादेव सुर्यवंशी, मनोज पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संस्थेचे अध्यक्ष रामदास कोळगे व सुभाष कदम पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त मान्यवरांच्या हस्ते त्यांचे शाल, पुष्पहार देऊन अभिष्टचिंतन करण्यात आले यावेळी व्यवस्थापक शाम गंगावणे, कर्मचारी वैशाली जोशी, आवेज शेख, श्रीकांत काशिद, शाम शेरखाने यांच्यासह संस्थेचे सभासद, ठेवीदार हितचिंतक यांची उपस्थिती होती.

## दिव्यांग माहिती सर्वेक्षण तालुकानिहाय करण्यास प्रारंभ

**परंडा, दि.४ जानेवारी -**

समाजातील अनेक सुविधापासून दिव्यांग घटक वंचित रहात आहे तेव्हा दिव्यांगाना जीवनाश्यक लाभ मिळावेत व दिव्यांग इतराप्रमाणे समाजात स्वाभिमानाने जगला पाहिजे या उद्देशाने दिव्यांग उद्योग समुहाचे अध्यक्ष तानाजी घोडके यांनी जिल्हाधिकारी यांच्या कडे धाराशिव जिल्हयाचे दिव्यांग घटकाचे सर्वेक्षण करावे ही मागणी करून अकोला पॅटर्न राबवण्याची विनंती निवेदनाद्वारे दिली होती. त्यामुळे या निवेदनाची जिल्हाधिकारी महोदयानी दखल घेऊन धाराशिव जिल्ह्यात दिव्यांगाचे प्रश्नावली काढून माहिती सर्वेक्षण तालुकानिहाय चालू केले आहे. तरी या कामी अंगणवाडी कर्मचारी आशा स्वंयसेविका काम करत आहेत. हे दिव्यांगाच्या दृष्टीने सर्वेक्षण महत्त्वाचे असून दिव्यांगानी आपली सपूर्ण माहिती देऊन पुढील काळात शासनाला उपाय योजना करण्यासचा सर्वेक्षणाची खुप मदत होणार आहे. तरी या सर्वेक्षणामध्ये दिव्यांग बांधवानी सहभागी व्हावे, असे आवाहन दिव्यांग उद्योग समुहाचे अध्यक्ष तानाजी घोडके यांनी केले आहे.

# 'कुरनुर'मधून रब्बीच्या आवर्तनास प्रारंभ

### नळदुर्ग परिसरातील दहा गावांना होणार लाभ : आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.४ जानेवारी -**

यावर्षी झालेल्या मुबलक पावसामुळे नळदुर्ग येथील कुरनुर प्रकल तुडुंब भरला आहे. या प्रकल्पातील पाण्यावर विसंबून असलेल्या दहा गावातील सुमारे साडेतीन हजार हेक्टर क्षेत्रावरील शेतकऱ्यांच्या मागणीनुसार दि.३ जानेवारी पासुन रब्बीच्या आवर्तनास प्रारंभ करण्यात आला आहे. सुरुवातीच्या पंधरवड्यात पाच गावातील क्षेत्र आणि त्यानंतर उर्वरीत पाच गावातील क्षेत्राला कुरनुर प्रकल्पातील पाणी मिळणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

यावर्षी जिल्ह्यात एकूण सरासरीच्या १२५ टक्के पाऊस नोंदवला गेला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील इतर प्रकल्पाप्रमाणे नळदुर्ग येथील कुरनुर प्रकल्पही शंभर टक्के क्षमतेने भरला आहे. नळदुर्ग परिसरात गाव भेट दौऱ्याच्या निमित्ताने फिरत असताना कुरनुर मध्यम प्रकल्पावरती अवलंबून असणाऱ्या विविध गावातील शेतकरी बांधवांनी रब्बी आवर्तनाचे पाणी सोडण्याची मागणी केली होती. पाण्याची उपलब्धता आणि शेतकऱ्यांची गरज ध्यानात घेऊन शेतकरी बांधवांच्या मागणीप्रमाणे रब्बी आर्वतन सुरू केले आहे.



कुरनूर मध्यम प्रकल्पाचा मुख्य कालवा आणि वितरिकेमार्फत प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रातील नळदुर्ग, अणदूर, चिवरी, गुजनूर, खुदावाडी, सराटी, शहापूर, वागदरी आणि बाभळगाव आदी दहा गावातील शेतीसाठी कालव्याद्वारे पाणी सोडले जाते. वरील दहा गावातील ३ हजार ६४३ हेक्टर क्षेत्र या पाण्यावर अवलंबून आहे. मात्र प्रकल्पाची वितरण व्यवस्था ५५ वर्षे जुनी असल्याने पूर्णक्षमतेने आवर्तन पूर्ण होण्यास विलंब होत होता. दुरूस्तीअभावी मुख्य कालव्याला अनेक ठिकाणी गळतीही लागलेली आहे. त्यामुळे पाणी वितरणात अडथळे येत असल्याने शेतकऱ्यांना त्याचा फटका सहन करावा लागत होता. त्यावर आता कायमस्वरूपी तोडगा काढला असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

कुरनुर प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील दहा गावातील शेतीसाठी प्रकल्पातील पाण्याचा पूर्ण क्षमतेने वापर व्हावा, सिंचन क्षेत्रामध्ये झालेली घट दूर व्हावी आणि सिंचन क्षेत्र वाढावे, याकरिता वितरण व्यवस्थेच्या अस्तरीकरण आणि त्यावरील बांधकाम दुरूस्तीसाठी महायुती सरकारकडे आपण सातत्याने पाठपुरावा केला. हिवाळी अधिवेशनात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासाठी १३ कोटी ९७ लाख रुपयांचा निधीही उपलब्ध करून दिला आहे. प्रकल्पाच्या दुरुस्ती कामास सुरुवातही करण्यात आली आहे.

चालू रब्बी हंगामात पिकांना पाणी देत असताना प्रकल्पाच्या दुरुस्तीचे आव्हानात्मक काम करण्याचे ठरवले. जेणेकरून शेतकरी बांधवांचे पाण्याअभावी होणारे नुकसान टळणार आहे.

हे काम पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पावर आधारित असलेल्या सर्व शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत बंद पाईपलाईन द्वारे पाणी देण्याचा प्रकल्पही हाती घेण्यात येणार आहे. त्यामुळे सिंचन क्षेत्रात दीडपट वाढ अपेक्षित असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

## वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमाचा शिवाजी महाविद्यालयात शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.४ जानेवारी -**

महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम १ जानेवारी ते १५ जानेवारी २०२५ दरम्यान सुरू झाला आहे. या उपक्रमांचा शुभारंभ उमरगा लोहारा तालुक्याचे आमदार प्रविण स्वामी यांच्या हस्ते ग्रंथ प्रदर्शनाने झाला.

आधुनिक पिढी घडण्यासाठी वाचन चळवळ ग्रामीण भागात पोहोचवण्याचे कार्य श्री छत्रपती शिवाजी

महाविद्यालयाने हाती घ्यावे. शहरातील आणि गावातील ग्रंथालय आणि युवकांनी शासनाचा वाचन संकल्प यशस्वी करण्यास पुढाकार घ्यावा. असे आवाहन आमदार स्वामी यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर आणि श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा यांच्या संयुक्त १ ते १५ जानेवारी दरम्यान या उपक्रमांतर्गत ग्रंथालय आणि वाचक यांना जोडण्यासाठी तसेच वाचन संस्कृती

वाढवण्यासाठी विविध उपक्रमाचे आयोजन विद्यार्थी, प्राध्यापक आणि सर्वसामान्य लोकांसाठी केले जाणार असल्याचे प्रतिपादन वाचन संकल्प महाराष्ट्र उपक्रमाचे विद्यापीठ नियुक्त धाराशिव जिल्हा समितीचे सदस्य, प्राचार्य डॉ. संजय अस्वले यानी केले आहे.

या उपक्रमांतर्गत ग्रंथ प्रदर्शन, सामूहिक पुस्तक वाचन, पुस्तक लेखन आणि कथन स्पर्धा, लेखक-वाचक कार्यशाळा आणि बक्षिस वितरण व समारोप असे विविध उपक्रम महाविद्यालय आणि गावा-गावा मध्ये राबविण्यात येणार आहेत. ग्रंथालयाच्या वतीने दुर्मिळ अशी संस्कार, मूल्य रुजवनारी ग्रंथ, पुस्तके प्रदर्शनासाठी ठेवण्यात आली.

विद्यार्थी प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यानी उत्स्फूर्त सहभाग घेतला. यासाठी ग्रंथपाल डॉ.बी.व्ही चालुक्य, एस.एस. जगताप यानी पुढाकार घेतला.

यावेळी उपप्राचार्य डॉ .व्ही.एस. इंगळे, प्रा.जी.एस. मोरे, प्रा.एस.ए. महामुनी, प्रा.व्ही. एन. हिस्सल,

समितीचे सदस्य उपप्राचार्य डॉ.पी.ए. पीटले, डॉ.व्ही.डि. देवरकर, डॉ.एस.पी. इंगळे, डॉ. जी.एन. सोमवंशी, डॉ.डि.एस. चितमपल्ले, डॉ. चालुक्य आदींची उपस्थिती होती.

## रस्ता सुरक्षा अभियान -२०२५; विविध कार्यक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जानेवारी -**

रस्ता सुरक्षा अभियान २०२५ परवाहअंतर्गत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय धाराशिव यांनी १ ते २ जानेवारी या कालावधीत जिल्ह्यात विविध कार्यक्रम आयोजित केले.

२ जानेवारी २०२५ : रस्ता सुरक्षेसंबंधित माहिती पुस्तकाचे वाटप रस्ता सुरक्षा अभियान २०२५ अंतर्गत पोलीस मोटार विभाग धाराशिव येथील कर्मचारी व वाहन चालक यांना करण्यात आले.

फरस्त्यावरून दुचाकी चालवत असताना हेल्मेटचा व चारचाकी वाहन चालविताना सीट बेल्टचा वापर करण्याबाबत मोटार वाहन निरीक्षक श्री महेश रायबान यांनी उपस्थित नागरिकांना मार्गदर्शन केले.

यावेळी सहायक मोटार वाहन निरीक्षक संजय नकाते, सुजीत वाघमारे, लोमटे व क्षिरसागर वाहन चालक इत्यादी उपस्थित होते.


तसेच तेथे बॅनर प्रदर्शित करून माहिती पत्रके वितरीत करण्यात आली. यावेळी सहायक मोटार वाहन निरीक्षक सागर कासवीद व डी.आर. रावते उपस्थित होते.

# जिल्ह्यात ठिकठिकाणी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जानेवारी -**

एकलव्य विद्या संकुल मंगरूळ यमगरवाडी तालुका तुळजापूर येथे सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली व बालिका दिन साजरा करण्यात आला या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून संतोष बनसोडे व मुख्य वक्ते म्हणून विठ्ठल म्हेत्रे हे उपस्थित होते. यावेळी इयत्ता नववीतील विद्यार्थिनींनी नृत्य घेत सादर केले. विद्यार्थिनी प्रतिज्ञा पवार, प्राजक्ता अलमले, श्रावणी पाटोळे, पियुष मगदूम व ज्ञानेश्वरी भोजने यांनी सावित्रीबाई फुले यांच्या विषयी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी प्राची पाटोळे व आदिती सुपलकर यांनी केले. कार्यक्रमाचे आभार धनश्री जाधव हिने मानले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला. या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन निर्मला हुग्गें यांनी केले होते. या कार्यक्रमास अनिल घुगे, अशोक बनकर, बालाजी क्षीरसागर, संतोष बनसोडे, दयानंद भडंगे, गोविंद सोमानी, निर्मला हुग्गे, प्रणिताबाई शेटकार, सविता गोरे खंडू काळे, कोंडीबा देवकर, दत्ता भोजने, भीम कुंभार, अण्णासाहेब मगर, हरीश मगदूम, किरण चव्हाण, विठ्ठल म्हेत्रे उपस्थित होते.



**कळंब : सावित्रीबाई फुले विद्यालय**

शहरातील सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक तथाप्राचार्य काकासाहेब मुंडे, तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष मनोरमा शेळके भवर, सचिव अ‍ॅड.सी.एन. भवर, उपाध्यक्ष डॉ.पी.एन भवर, कार्यवाह श्रीधर भवर, सहसचिव भागवत आप्पा सुरवसे, उपविभागीय पोलीस अधिकारी संजय पवार, उपशिक्षणाधिकारी दत्तात्रय लांडगे, पोलीस निरीक्षक रवी सानप, पोलीस उपनिरीक्षक आरती जाधव, सुरेश टेकाळे, गटशिक्षणाधिकारी धर्मराज काळमाते, विस्तार अधिकारी फुलारी, डॉ. बाळकृष्ण भवर, चेतन भवर, जे.एन. पठाण, संतोष भोजने आदी प्रमुख पाहुणे लाभले होते. मान्यवराच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी उच्च माध्यमिक विद्यालयाच्या उपप्राचार्य मीनाक्षी शिंदे, समर्थ प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका शिंदे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वप्नाली भवर यांनी केले. तर आभार प्रदर्शन शंकर गोंदकर यांनी मानले. यावेळी विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**नळदुर्ग : नळदुर्ग बचत गट**

अखिल भारतीय पोलिस हक्क संरक्षक संघटनेच्या धाराशिव जिल्हा संपर्क प्रमुख कल्पना गायकवाड, रेणुकामाता महिला बचत गट व कल्पराज महिला बचत गट यांच्या संयुक्त विद्यमाने नळदुर्ग येथे दि.३ जानेवारी रोजी क्रांतिज्योत सावित्रीबाई फुले यांचा जन्मोत्सव मोठ्या उत्साहात व विविध कार्यक्रमाने साजरा करण्यात आला. यावेळी नुकत्याच जन्मलेल्या मुलीचा तसेच तिच्या मातेचा कल्पना गायकवाड यांच्या हस्ते सन्मान करुन त्या मुलीच्या जन्माचे स्वागत करण्यात आले.

दि.३ जानेवारी रोजी संपुर्ण महाराष्ट्रात क्रांतिज्योत सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. अखिल भारतीय पोलिस हक्क संरक्षक संघटनेच्या धाराशिव जिल्हा प्रमुख कल्पना गायकवाड, रेणुका महिला बचत गट व कल्पराज महिला बचत गट यांच्या संयुक्त विद्यमाने नळदुर्ग येथे क्रांतिज्योत सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.



**धाराशिव : स्व.डॉ. चंद्रकलादेवी पाटील ग्रंथालय**

धाराशिव येथील स्व.डॉ. चंद्रकलादेवी पद्मसिंह पाटील ग्रंथालय व तेरणा स्पर्धा परीक्षा अध्ययन केंद्र येथे क्रातिज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रतिमा पूजन विक्रांत देशपांडे, जिल्हा संघटक जिल्हा भारत स्काऊट गाईड व शरद पारडे सॅपीओ नालिसिसचे मॅनेजर व विद्यार्थीनी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रम सुत्रसंचलन मनोज जगताप व आभार अमर घोडके यांनी मानले. यावेळी विद्यार्थी, विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.



**धाराशिव : जयप्रकाश विद्यालय**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व इंदिरा गांधी प्राथमिक शाळा, रूईभर यांच्या संयुक्त विद्यमानाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती बालिका दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षणमहर्षी सुभाष कोळगे यांच्या हस्ते क्रांतिज्योति सावित्रीबाई फूले यांच्या प्रतिमेस हार व श्रीफल अर्पण करण्यात आले. याप्रसंगी माजी ग्रा.प सदस्या राजनारायण कोळगे, इंदिरा गांधी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक के.ए. डोंगरे, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपास्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अभिजित घोळवे यांनी तर आभार सचिन कांबळे यांनी मानले.



**कळंब : अनिक फायनान्सियल सर्व्हिसेस**

येथील अनिक फायनान्सियल सर्व्हिसेस प्रा.ली. आणि सावित्रीबाई फुले महिला बचत गट फेडरेशन कार्यालय येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून जयंती साजरी करण्यात आली यावेळी अनिक चे ऑपरेशन हेड विलास गोडगे, ब्रँच मॅनेजर भिकाजी जाधव, गट समुपदेशक परमेश्वर गवारे, क्षेत्रीय अधिकारी श्रीमती उषा मस्तुद, प्रमिला राख, क्लस्टर सहायक नंदा पांचाळ सेलू, रोहिणी कोठावळे पिंपळगाव को., निकिता चंदनशिवे, रामकुंड, शकुंतला गोडगे, गंभीरवाडी, सहायक लेखापाल जयश्री कोठावळे आदी उपस्थित होते.



**धाराशिव : महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद**

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद जिल्हा शाखा धाराशिव यांच्या वतीने सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी यांनी सावित्रीबाई यांच्या कार्याविषयी विचार व्यक्त केले. याप्रसंगी परिषदेचे जिल्हा पालक निवृत्ती मुळे, संघटनमंत्री संतोष पोतदार, जिल्हा उपाध्यक्ष शरद करडे, दयानंद चव्हाण, अहमद सय्यद, मिलिंद चव्हाण, सुहास दराडे यांच्या सह शिक्षक उपस्थित होते.



**तुळजापूर : न.प. शाळा क्र.३**

शहरातील तुळजापूर (खुर्द) येथील नगर परिषद प्राथमिक शाळा क्रमांक ३ शाळेत भारतातील आद्य शिक्षिका, स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या, विद्येची जननी सावित्रीमाई फुले यांची १९४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.प्रारंभी सावित्रीमाईंच्या प्रतिमेचे पूजन शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा लक्ष्मीताई रंजीत भोजने व शिक्षण सभापती मंजुषा देशमाने यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महिला पालक कीर्ती बारगजे, सुवर्णा पाटील, सोनाली लोले, रेणुका जाधव, निलोफर शेख, नेहा शेख यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक तुकाराम मोटे, शिक्षण विभाग प्रमुख अशोक शेंडगे, शाळेतील शिक्षक सर्वश्री सतीश यादव, निर्मला कुलकर्णी, जालिंदर राऊत, वैशाली गोमारे, पुष्पा काळे, दिगंबर थेटे, शरद कोळगे, दत्ता मेढे, अतुल काकडे, रंजीत नाईकवाडे, अनिल राठोड, गोविंद प्रताप, कल्पना व्हटकर यांच्यासह शिक्षक, पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**परंडा : राजे शिवाजी पब्लिक स्कूल**

राजे शिवाजी पब्लिक स्कूल, परंडा येथे सावित्रीबाई फुले यांची जयंती (बालिका दिन) उत्साहात साजरा करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रियंका माने तसेच दिपाली अनभुले, शुभांगी पाटील, आयशा पठाण, रूपाली चौतमहाल, अँड. बालिका बनसोडे, सुवर्णा गायकवाड, पूजा हिंगे, अंजली माळी, अश्विनी डांगे, पूजा शेळके, अनसूया गावित महिला पालक उपस्थित होत्या. इयत्ता नर्सरी ते चौथी पर्यंतचे सर्व मुली व मुले सावित्रीबाई फुले व ज्योतिबांच्या वेशभूषेत शाळेत उपस्थित होते, इयत्ता पहिली ते चौथीच्या मुलांनी सावित्रीबाई फुले यांच्या विषयी मनोगत व्यक्त केले. भाषण झाल्यानंतर या कार्यक्रमाचे बनसुडे यांनी आभार व्यक्त केले.

**धाराशिव : धाराशिव प्र.शाळा**

येथील धाराशिव प्रशालेत सावित्रीबाई फुले यांची जयंती बालिका दिन म्हणून विविध सांस्कृतिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांनी दि.३ जानेवारी रोजी करण्यात आली. अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक पंडित जाधव हे तर प्रमुख पाहुणे म्हणून बालिका लोहार, मीरा पवार उपस्थित होते.

# लातूर जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## फार्मसी डिप्लोमाधारकांना पीसीआयकडून तात्पुरत्या नोंदणीस मान्यता

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.४ जानेवारी -**

फार्मसी डिप्लोमा झालेल्या विद्यार्थ्यांना फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाकडून तात्पुरत्या नोंदणीस मान्यता देण्यात आली आहे.

फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया (झउख) ने डिप्लोमा इन फार्मसी एक्झिट परीक्षा नियमावली २०२२ संदर्भात महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. एक्झिट परीक्षेतील पेपरांची संख्या तीनवरून एक करण्याचा प्रस्ताव अद्याप सरकारकडून मंजूर झालेला नसल्यामुळे, झउख ने २०२२-२३ शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या व २०२३-२४ मध्ये अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना तात्पुरती नोंदणी देण्याचा निर्णय घेतला आहे. सर्व राज्य फार्मसी कौन्सिल व राज्य सरकारांना या विद्यार्थ्यांना एक वर्षासाठी तात्पुरती नोंदणी प्रमाणपत्र देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यामुळे विद्यार्थी फार्मासिस्ट म्हणून काम करू शकतील, मात्र एक्झिट परीक्षा उत्तीर्ण झाल्याशिवाय नोंदणी नूतनीकरण करता येणार नाही. विद्यार्थ्यांनी झउख द्वारे दिलेल्या नमुन्यातील प्रतिज्ञापत्र (ॲफिडेव्हिट) भरून राज्य फार्मसी कौन्सिलच्या निबंधकांकडे सादर करणे आवश्यक आहे. हा निर्णय विद्यार्थ्यांना बेरोजगारीपासून वाचवण्यासाठी तसेच नियमानुसार पारदर्शकता राखण्यासाठी घेण्यात आला आहे. अधिक माहितीसाठी अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी अशी माहिती प्राचार्य डॉ. पौळ यांनी दिली आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### इंटर युनिव्हर्सिटी बुद्धीबळ स्पर्धेत सुयश

**निलंगा, दि.४ जानेवारी -**

इंटर युनिव्हर्सिटी बुद्धीबळ स्पर्धेत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या बुध्दीबळ संघाचे नेतृत्व निलंगा शहरालगत असलेल्या दापका येथील जय भारत कॉलेज ऑफ फार्मसीचा वैभव नरेवाड करणार आहे. जय भारत कॉलेज ऑफ फार्मसी दापका (ता.निलंगा) येथील वैभव नरेवाड हा बी फार्मसीच्या तीसऱ्या वर्षात शिकत असून, या विद्यार्थ्याने मागील वर्षात विविध बुद्धीबळ स्पर्धांमध्ये दैदीप्यमान यश संपादन करून, मागच्या महिन्यात घेण्यात आलेल्या अंतर महाविद्यालयीन विद्यापीठ स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक मिळवत, आत्ता तो देश पातळीवर, अंतर विद्यापीठीय बुद्धिबळ स्पर्धेच्या, स्वामी रा. तिर्थ म. विद्यापीठाच्या संघाचे नेतृत्व करत आहे. देशपातळीवरील या स्पर्धा भोपाळ मध्यप्रदेश येथे दि.६ व ७ जानेवारीला होत आहेत. या यशाबद्दल त्याचे संस्थेची कार्याध्यक्ष वसंतराव पाटील, अध्यक्ष राजेश्वर पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीकृष्ण शिंदे, प्रशिक्षक डॉ. संपत सोळुंके, अनिल भोईबार व समस्त कर्मचाऱ्यांनी तोंडभर कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.




### संगीता मोतीपवळे सार्वजनिक वाचनालयात सामुहिक ग्रंथवाचन

**उदगीर, दि.४ जानेवारी -**

संगीता मोतीपवळे सार्वजनिक वाचनालय नवीन वसाहत मलकापुर येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमाअंतर्गत सामुहिक ग्रंथ वाचन संपन्न झाले. प्रंरभी अक्षरनंदन मराठी प्राथमिक शाळेचे विद्यार्थिनी समगे रिद्दी व प्रणाली तोडकर यांच्या हस्ते क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतीमेचे पुजन करण्यात आले. वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपकृमा अंतर्गत यावेळी विद्यार्थ्यांनी सामुहिक ग्रंथवाचन केले तर विद्यार्थयांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यावर भाषणे केली. या उपकृमात अक्षरनंदन शाळेतील वर्गशिक्षक एम.जी. बिरादार, विद्यार्थीनी समृध्दी तेलगे, भाग्यश्री सुर्यवंशी, कोमल केंद्रे, अनिकेत जीवने, स्नेहा हलकरे, संचिता मुंडे, सृती जाधव, वैष्णवी येणगे, स्नेहा बरगाले, सृष्टी गायकवाड, सृष्टी कंजे, सृष्टी मोरे, वैभवी कोरे, प्रणिता होनराव, आर्या सोलापुरे, अज्ञा कोडे, प्रणाली तोडकर, प्रतिक्षा भालशंकर, श्रध्दा दुवे, प्रतिक्षा बिरादार, वैभवी जाधव, प्रेरणा बिरादार, अवधुत शिंदे, संस्कार पिटले, आर्यन सुतार, साईराज मोटेराव, श्लोक करखेलीकर, हर्षद टेकपुंजे, श्रेयश कारलेवाड, पार्थ वाडकर, प्रणव दंडिमे, विवेक भाडसंगे, अदित्य सुर्यकर, कपिल मुंडे, प्रथमेश सुर्यवंशी, गौरव रोडगे, अजिंक्य ढवळे, उत्कर्ष बेंबडे, ओमकार किरवले, रामेश्वर सुर्यवंशी, विठ्ठल जाधव श्रीनिवास वाकळे इत्यादी विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

### आदर्श दर्पण पुरस्कार जाहीर

**कळंब, दि.४ जानेवारी -**

६ जानेवारी पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. कळंब येथील सेवा पुरस्कार समितीच्या वतीने पत्रकारितेच्या माध्यमातून व आपल्या लेखणीतून सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य विषयक व सामाजिक प्रश्न मांडणाऱ्या उत्कृष्ट लेखन व वृत्तांकन करणाऱ्या उत्कृष्ट पत्रकारांचा आदर्श दर्पण पुरस्काराने सन्मान केला जातो.

# ४० वर्षापासून वादात असलेला रस्ता तहसीलदाराने शेतकऱ्यांसाठी केला खुला



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.४ जानेवारी -**

निलंगा तालुक्यातील जाजनूर येथील गेल्या ४० वर्षापासून वादात अडकलेला शेतरस्ता शेतकऱ्यासाठी तहसिलदार प्रसाद कुलकर्णी यानी खुला करून दिला आहे.

दि.३ रोजी जाजनूर येथील नकाशावरील जाजनूर गाव ते शेख वस्तीपासून निलंगा शहराकडे जाणारा जुना रस्ता तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांनी रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन त्यांच्या सहमतीने बैठक घेऊन मागील ४० वर्षांपासून बंद असलेला शेतरस्ता प्रत्यक्ष जाजनूर गावात जावून मोजणी करून खुला करून देण्याचे काम केला आहे. तर गेल्या वर्षी अतिक्रमण मुक्त करून मातीकाम करण्यात आलेला जाजनूर स्मशानभूमी पासून सावनगिरा- तळीखेड जाणाऱ्या रस्ता मजबुतीकरणाच्या कामाची तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांनी पाहणी केली. तसेच गावातून शेख वस्तीकडे जाणारा गावठाणलगतचा रस्ता शेतकरी वादात प्रलंबित होता. गावठाणा लगत असलेल्या शेतकऱ्यांच्या जामनीच्या हद्दी खुणा कायम करून देण्यात आल्या व त्यानंतर जाजनूर लांबोटा शिव ते अंबुलगा साखर कारखाना जाणाऱ्या रस्त्यावरील पुल टाकण्याचे काम काही कारणास्तव रखडले होता, तेथे तहसीलदार स्वता: उपस्थित राहून दोन्ही बाजूच्या शेतकऱ्यांना रस्त्याचे महत्व पटवून दिले व पूलाचे रखडलेले काम जागेवर उपस्थित राहून पुर्ण करून घेतले. जाजनूर गावात एकाच दिवसात एकूण चार रस्त्याचे विविध कारणामुळे रखडलेले काम पुर्ण करून रस्ता कामाला गती देण्याचे खूप मोठे कार्य तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांनी केले आहे.

वरील चारही रस्त्याच्या कामाला गती देण्यासाठी मंडळ अधिकारी निलंगा राजकुमार देशमुख, ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) जाजनूर पद्माकर रत्नपारखे, ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) निलंगा सदानंद सागावे, भूमी अभिलेख कार्यालयाचे कर्मचारी प्रशांत गाडेकर, पोलीस कर्मचारी गोपाळ बरडे, जाजनूर गावचे सरपंच काशिनाथ गोमसाळे, माजी सरपंच बालाजी गोमसाळे, तंटामुक्ती अध्यक्ष उत्तम गोमसाळे, तंटामुक्ती उपाध्यक्ष इकबाल सय्यद गावचे जेष्ठ नागरिक अरविंद पाटील, विनायक गोमसाळे, चांद शेख व रस्त्याच्या दोन्ही बाजूचे सर्व शेतकरी व ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

# रंगकर्मी प्रतिष्ठान, मराठी पत्रकार संघाचे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**८ फेब्रुवारीला होणार पुरस्कार वितरण सोहळा... चाकूरच्या दोन पत्रकारांचा समावेश...**



**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.४ जानेवारी -**

उदगीर येथील रंगकर्मी साहित्य कला क्रीडा प्रतिष्ठान व मराठी पत्रकार संघाच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार जाहीर करण्यात आले असुन ८ फेब्रुवारी रोजी शिवाजी महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात माध्यवरांच्या हस्ते पुरस्कार देवुन सन्मानित केले जाणार आहे, अशी माहिती रंगकर्मी प्रतिष्ठान व मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष बिभीषण मद्देवाड यांनी दिली आहे.

यात पत्रकारीतेतील योगदानाबदल विनायक चाकुरे, एजाज शेख, विजयकुमार बोरफळे, सतिश टोणगे कळंब, संजय पाटील चाकुर, गणेश होळे लातूर, शिवशंकर टाक वडवळ नागनाथ ता.चाकुर, विजय देशमुख निटुर ता.निलंगा यांना सन्मानचिन्ह, गौरवपत्र देवुन आदर्श पत्रकारीता पुरस्कार देवुन सन्मानित करण्यात येणार आहे.

रंगकर्मी साहित्य कला क्रीडा प्रतिष्ठान व मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रा. बिभीषण मद्देवाड, सचिव सिद्धार्थ सूर्यवंशी, उपाध्यक्ष प्रा.भगिरथ सगर, सदस्य नागनाथ गुट्टे, मनोहर लोहारे, ॲड. महेश मळगे, प्रा. रामदास केदार, रसुल पठाण, लक्ष्मण बेंबडे, मारोती भोसले यांनी निवड झाल्याबदल अभिनंदक केले आहे.

# सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.४ जानेवारी -**

निलंगा येथील मुस्लिम बांधवाच्या इज्तेमासाठी जात असताना सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी शिरूर अनंतपाळ येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी कार्यालयाला धावती भेट दिली. याप्रसंगी महाराष्ट्र राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे युवक प्रदेशाध्यक्ष तथा प्रवक्ते सुरज चव्हाण यांनी स्वागत केले.

शिरूर अनंतपाळ तालुक्याच्या विकासासदंर्भात चर्चा केली. शिरूर अनंतपाळ येथील कृषी, उत्पन्न बाजार समिती सध्या डबगाईला आली असल्यामुळे सहकार मंत्री यांनी मदत करून चालू करण्यासाठी येथील व्यापारी व कार्यकर्तानी निवेदन देऊन मदतीची मागणी केली. याप्रसंगी तहसीलदार गोविंद पेदेवाड, पोलीस निरीक्षक विठ्ठलराव दराडे, पो.उप.नि. गजानान अनासपुरे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष विठ्ठलराव पाटील, जिल्हा उपाध्यक्ष अतुल माने पाटील, शहराध्यक्ष अनिल देवंगरे, प्रदेश सचिव तुषार मादळे, ओबीसी जिल्हा कार्याध्यक्ष ज्ञानोबा मोगले, राष्ट्रवादीचे तालुका कार्याध्यक्ष अब्दुल अजीज मुल्ला, महेताब शेख, सुचित लासुने, माधव संभाळे, बाळाभाऊ शिवने, विवेक घारोळे चंद्रकांत कांबळे, औदुंबर शिंदाळकर, केदार लोंढे, आदींसह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचे शिरूर अनंतपाळ नगरीत अगमन होताच फटाक्याची अतिषबाजी करून त्यांना पुस्तक देऊन जंगी स्वागत व सत्कार करण्यात आला.

# पांडुरंग सार्वजनिक वाचनालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा अंतर्गत वाचन पंधरवडाची विविध कार्यक्रमांनी सुरुवात



**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.४ जानेवारी -**

रेणापूर तालुक्यातील दवनगाव येथे पांडुरंग सार्वजनिक वाचनालयात शनिवार दि.४ जानेवारी रोजी ग्रंथप्रदर्शन, पुस्तकांचे सामुहिक वाचन, पुस्तक परिक्षण स्पर्धा व विविध सांस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

दवनगाव येथे वाचन संकल्प महाराष्ट्राचा अंतर्गत वाचन पंधरवडा ची सुरुवात महिला शिक्षणाचा पाया रोवणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन आणि प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पत्रकार शिवाजी यमते यांनी केली. सर्वप्रथम नागरगोजे प्रदुम्न यांनी सूत्रसंचालन करत सर्वांचे स्वागत करून कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. यानंतर वाचकांचे सामूहिक वाचन आणि मुलांचे प्रकट वाचन घेण्यात आले. या कार्यक्रमाला जि.प.प्रा शाळा दवनगाव येथिल विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पत्रकार शिवाजी यमते यांनी वाचन का करावे वाचनाची गरज, महत्व या बाबत सविस्तर माहिती सांगितली. दवनगाव येथिल जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक एस.व्ही. बंडेवाड यांनी कार्यक्रम प्रसंगी बोलताना वाचनाचे महत्त्व तसेच पुस्तकांचे जीवनातील महत्त्व काय असते याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर पुस्तकांची संगत धरावी लागेल जो पुस्तकांच्या संगतीत राहतो तो आयुष्यात यशस्वी होतो असे मत पांडुरंग सार्वजनिक वाचनालय दवनगांव चे ग्रंथपाल नागनाथ नागरगोजे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले.

याप्रसगी या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटक पत्रकार शिवाजी यमते ,मुख्याध्यापक एस.व्ही. बंडेवाड, शिंदे व्ही.टी, ठोंबरे व्ही.आर, शालेय समितीचे अध्यक्ष राहुल नागरगोजे, सुग्रीव नागरगोजे, मस्के राजकुमार, नागरगोजे प्रदुम्न आदि मान्यवर, दवनगाव ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांचे आभार पांडुरंग सार्वजनिक वाचनालय दवनगांवचे ग्रंथपाल नागनाथ नागरगोजे यांनी मानले व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**धनगर समाजाची चाकूर येथे ५ जानेवारीला बैठक**

# समाज बांधवांनी उपस्थित रहावे : लहुजी शेवाळे

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.४ जानेवारी -**

लातूर जिल्ह्यातील धनगर समाज बांधवांची आरक्षण चळवळीत काम करणाऱ्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक दि.५ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता शिवशक्ती बॅटरी नांदेड रोड चाकूर येथे आयोजित करण्यात आली आहे.

सदरील बैठकीला जय मल्हार सेनेचे प्रमुख लहुजी शेवाळे जय मल्हार अहिल्या सेनेच्या प्रमुख रंजना बोरसे, ज्येष्ठ नेते राम कांबळे, मराठवाडा प्रमुख माणिकराव राऊत, सूर्यकांत भोसले, माधवराव साळुंखे, शंकरराव शेळके, दिनकरराव बडूरे, प्रा. श्रीधर पाटील, हरिभाऊ काळे, माणिकराव आलूरे, प्राचार्य एल.टी. केसाळे, टिकोरे, शिवाजीराव शिंदे, लहुजी कोरे आदी मान्यवर उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

तरी लातूर जिल्ह्यातील सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांनी व मान्यवरांनी उपस्थित रहाण्याचे जय मल्हार सेनेचे प्रमुख लहुजी शेवाळे यांनी विनंती केली आहे.

लातूर जिल्ह्यातील सर्व धनगर समाज बांधवांनी मोठ्या संख्येने या बैठकीला हजर राहावे असे आवाहन ओम प्रकाश नंदगावे, पांडुरंग लोकरे, नारायण राजुरे, अजित खंदारे, सुभाष काळे, संतोष गडदे, श्रीकांत हाके, तेजराव खटके, श्रीकृष्ण सुरवसे, आनंद देवकते, चंद्रकांत एनकफळे, महेश भिंगोले, गोपाल म्हेत्रे, सुरेश शेवाळे, नारायण वगरे, राहुल किडमीडे, अजय मदने, आकाश कुकर, शिवाजी आलुरे, नारायण धायगुडे, बालु दिवटे यांच्यासह आदीनी केले आहे.

# अहमदपूर शहरात ठिकठिकाणी सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.४ जानेवारी -**

पारतंत्र्यात सामाजिक गुलामगिरी झुगारून मुलींना शिक्षनाचा हक्क देणाऱ्या सावित्रीबाई फुले यांची जयंती अहमदपूर परिसरात विविध ठिकाणी साजरी करण्यात आली.

**संत ज्ञानेश्वर विद्यालय**

संत ज्ञानेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात सावित्रीबाई फुले यांची जयंती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका आशा रोडगे तर प्रमुख पाहुणे सेवानिवृत्त मुख्याध्यापक बालाजी वाघमारे, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष नवनाथ हांडे, माता पालक संघाच्या सहसचिव प्रियंका पारसेवार, सदस्या स्नेहा हांडे सह आदी मान्यवर उपस्थित होते. नवनाथ हांडे व प्रियंका पारसेवार यांच्या वतीने सुंदर हस्ताक्षर स्पर्धेतील व भाषण स्पर्धेतील प्रथम, द्वितीय, तृतीय विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात आले. मुख्याध्यापक बालाजी वाघमारे,नवनाथ हांडे यांचे मनोगतपर भाषण झाले. आशा रोडगे यांनी अध्यक्षीय समारोप प्रसंगी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सतीश साबणे यांनी केले. सूत्रसंचालन मीना होनराव यांनी केले तर आभार सुजाता बुरगे यांनी मानले. शेवटी पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

गणेश वाघमारे, श्रावण वाघमारे, डी.एस. वाघमारे, राजकुमार वाघमारे, एन.डी. राठोड, बालाजी दुगाणे, रावसाहेब वाघमारे, हरीश नागमोडे, पंढरी वाघमारे, ज्ञानोबा गायकवाड, हिरामणजी, धसवाडीकर यांच्याकडूनही क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पांजली वाहून अभिवादन करण्यात आले. डी.एस. वाघमारे यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यावर सविस्तर माहिती दिली.

**यशवंत विद्यालय...**

अनादी काळापासून स्त्रियांना आदिशक्ती मानले जाते. स्त्री ही सृजनशील आणि नवनिर्मितीची प्रणेती आहे म्हणून समाजाने सर्व स्तरातून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिबा फुले यांचा आदर्श घेऊन जीवन दीपस्तंभ प्रमाणे बनवावे असे प्रतिपादन शांतिनिकेतन सहकारी पतसंस्थेच्या माजी अध्यक्षा पुष्पाताई लोहारे यांनी केले. त्या यशवंत विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्सवाच्या निमित्ताने आयोजित सोहळ्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य गजानन शिंदे हे होते. अतिथी म्हणून उप मुख्याध्यापक माधव वाघमारे, पर्यवेक्षक राम तत्तापुरे, शिवाजी सूर्यवंशी, खयूम शेख, वर्षा माळी, यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. जयंतीचे अवचित्य साधून पुष्पाताई लोहारे यांच्या वतीने शाळेला चार फूट उंचीची समयी भेट देण्यात आली. सूत्रसंचालन माही कुलकर्णी, समिक्षा मिटकरी, आरपिता केंद्रे यांनी तर आभार वैष्णवी बनसोडे यांनी मांनले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कपिल बिराजदार,



राजेश कजेवाड, श्रीधर लोहारे, बालाजी सोनटक्के शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

**किलीबल नॅशनल स्कूल...**

येथील किलबिल नॅशनल स्कूल येथे सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त संस्थेचे सचिव ज्ञानोबा भोसले, प्राचार्य संतोष पाटील, उप प्राचार्य धर्मसिंग यांचे हस्ते सावित्री बाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. ज्ञानोबा भोसले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. १८ व्या शतकात महिला शिक्षण आणि समाजसुधारणेचे महत्त्वपूर्ण कार्य करणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे मोठे योगदान आहे. चूल आणि मूल या पारंपरिक चौकटीतून महिलांना बाहेर काढून शिक्षण दिल्याने महिला आज पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून समाजात वावरत आहेत.

**महात्मा गांधी महाविद्यालय...**

विचार विकास मंडळ द्वारा संचलित महात्मा गांधी महाविद्यालयात भारतीय स्त्री शिक्षणाच्या प्रनेत्या, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती अतिशय उत्साहाने साजरी करण्यात आली. यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस विचार विकास मंडळाचे सहसचिव मा सुरेशराव देशमुख साहेब यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ.एस.आर. शेळके यांनीही प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा स्टाफ सेक्रेटरी प्रो.डॉ.अनिल कांबळे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ जे.पी. कुलकर्णी, पर्यवेक्षक डॉ. सुनील साडेगावकर, कार्यालय अधीक्षक डी. के. गाजरे, रसानशास्त्र विभाग प्रमुख तथा खटउ समन्वयक डॉ. अनिलकुमार जाधव, हिंदी विभाग प्रमुख डॉ. राजश्री भामरे, डॉ. राजश्री जाधव भूगोल विभाग प्रमुख, प्रो.डॉ. नितीन देशमुख, लोकप्रशासन विभाग प्रमुख तथा सोशल मीडिया प्रमुख प्रा.डॉ. दिलीप बंजारा तसेच महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित राहून अभिवादन केले.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## मराठवाड्यातील १२ आदर्श महिलांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.४ जानेवारी -** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त येथील दयानंद कला महाविद्यालयाच्या सभागृहात मराठवाड्यातील विविध जिल्ह्यातील पर्यावरण क्षेत्रात कार्य करणा-या १२ महिलांचा सह्याद्री देवराई लातूर, दयानंद कला महाविद्यालय , द संस्कृती फाउंडेशन, बाबासाहेब परांजपे फाउंडेशन, कला मंच लातूर, हरितीवाचक चळवळ यांनी संयुक्त विद्यमाने पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

या पुरस्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी समाज कल्याण विभागाचे सह आयुक्त अविनाश देवशेटवार हे होते. तर प्रमुख पाहुणे अतिरिक्त पोलीस अधीक्षक अजय देवरे, बीड येथिल सामाजिक कार्यकर्त्या माजी प्राचार्य सविता शेटे, महिला आयोगाच्या माजी सदस्या आशा भिसे आणि दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य नागरगोजे, उपप्राचार्य अंजली जोशी टेंभुर्णीकर, डॉ. बी. आर. पाटील उपस्थित होते.

सत्कारात प्रामुख्याने मराठवाड्यातील अडीचशे पक्ष्यांच्या प्रजातीवर कार्य करणा-या, पक्ष्यांवर पुस्तक लिहलेल्या अंबाजोगाई येथील डॉ. शुभदा लोहिया, मनीषा चौधरी, सृष्टी सोनवणे, डॉ. सुषमा. दापकेकर, ज्योती सातपुते, डॉ. वर्षा दरडे , लातूर मनपाच्या स्वच्छता कर्मचारी लता रसाळ, पत्रकार शाहेदा पठाण, सीआयडी खात्यात पोलीस अधिकारी असलेल्या माधवी मस्के, बॉडी बिल्डर राज्यस्तरीय स्पर्धेत भाग घेतलेल्या स्नेहा बरडे, सप्तफेरे विवाह संस्थेच्या माध्यमातून महिलांना रोजगार उपलब्ध करून देणा-या आणि चला सावली पेरू या उपक्रमासाठी पिशव्या उपलब्ध करून देणा-या सावित्री राजुळे या सर्वांना नारी शक्ती २०२५ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



### संक्षिप्त वृत्त...

## लातुरात आज विधी सेवा महाशिबीर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.४ जानेवारी -** नवी दिल्ली येथील राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, मुंबई येथील महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व लातूर जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, ५ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता विधी सेवा महाशिबीर आणि शासकीय योजनांचा महामेळावा आयोजित करण्यात आला आहे. लातूर येथील पोद्दार इंटरनॅशनल स्कूल समोरील लक्ष्मीप्रयाग बॅंक्वेटस येथे हा कार्यक्रम होणार असून कार्यक्रमाचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाचे न्यायमूर्ती तथा लातूर जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती नीरज पी. धोटे यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा लातूर जिल्हा विधी व सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष व्ही. व्ही. पाटील, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती राहील.

## संचालकाकडून ऊस तोडणीची पाहणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.४ जानेवारी -** विलास सहकारी साखर कारखाण्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई देशमुख आणि सर्व संचालकांनी कारखाना कार्यक्षेत्रातील तोडणी होत असलेला ऊसाची पाहणी केली. कारखान्याचे सभासदांशी संवाद साधुन त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. विलास कारखान्याचा गळीत हंगाम (२०२४-२५) सुरळीतपणे सुरु आहे.

या गळीत हंगामात प्राधान्याने कार्यक्षेत्रातील ऊसाची तोडणी होत आहे. या सुरु असलेल्या हंगामातील गाळप झालेल्या उसाला उस बीलापोटी ऊसउत्पादक शेतक-यांना प्रति मेट्रिक टन २७०० रुपयांप्रमाणे ऊस बिलाचा पहीला हप्ता त्यांच्या खात्यावर जमा करण्यात आला आहे. अंतीम ऊसदर किमान प्रतिटन ३ हजार रुपये राहणार आहे. चेअरमन श्रीमती वैशालीताई देशमुख यांनी तोडणी होत असलेल्या ऊसप्लॉटची जाऊन पाहणी केली. यावेळी तोडणी होत असलेला ऊस तसेच या भागात लागवड ऊसाची सध्याची परिस्थिती याबाबत कारखान्याचे सभासद आणि ऊस उत्पादकांशी यांच्याशी संवाद साधुन त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

## ट्रॅक्टरची कारला धडक, एक जखमी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.४ जानेवारी -** एका ट्रॅक्टरचालकाने भरधाव वेगात वाहन चालवून रस्त्याच्या बाजूला थांबलेल्या कारला धडक दिली. यात कारचे नुकसान झाले. तसेच एकजण जखमी झाला. ही घटना रेणापूर-लातूर मार्गावर घडली. याप्रकरणी रेणापूर पोलिस ठाण्यात गुरुवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी सांगितले, लातुरातील केशवनगरातील अजय माधवराव रेणापुरे हे कार मधून प्रवास करुन रेणापूर-लातूर मार्गावरील आशीर्वाद पेट्रोलपंपासमोर रस्त्याच्या बाजूला वाहन उभे करीत होते. तेव्हा ट्रॅक्टरचालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणे आणि भरधाव वेगात चालवून फिर्यादी रेणापुरे यांना व त्यांच्या वाहनास धडक दिली. या अपघातात फिर्यादीचा डावा हात फॅक्चर झाला. तसेच डोक्याला व तोंडाला गंभीर मार लागला. या अपघातामध्ये दीड लाखाचे नुकसान झाले. या प्रकरणी रेणापुरे यांनी तक्रार दिली.

## गोल्डक्रेस्ट शाळेत विविध उपक्रम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.४ जानेवारी -** विलासराव देशमुख फाऊंडेशन अंतर्गत लातूर शहरात चालणाऱ्या गोल्डक्रेस्ट हाय प्राथमिक शाळेत मुल्यशिक्षण आधारीत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत टवेन्टिवनग्रीच्या संचालीका संस्थेच्या समन्वयक अदिती अमित देशमुख यांच्या संकल्पनेतून ब्रह्मकुमारी नंदा बहेन यांचे मार्गदर्शन ठेवण्यात आले होते.

गोल्डक्रेस्ट हाय प्राथमिक शाळेच्या प्रागंणात शुक्रवार सकाळी १० वाजता मुल्यशिक्षण आधारीत मुल्यशिक्षण, जीवनशैली आणि मनाचे संतुलन यावर मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी टवेन्टिवन ग्रीच्या संचालीका अदिती अमित देशमुख, ब्रह्मकुमारी नंदा बहेन, ब्रह्मकुमारी पूण्या बहेन, ब्रह्मकुमारी सुषमा बहेन, ब्रह्मकुमारी प्रयाग बहेन, डॉ. सारिका देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमात ब्रह्मकुमारी नंदा बहेन, ब्रह्मकुमारी पूण्या बहेन, ब्रह्मकुमारी सुषमा बहेन, ब्रह्मकुमारी प्रयाग बहेन यांनी मार्गदर्शन केले.सुत्रसंचलन राहूल इंगळे, तर आभार पुनम उगारे यांनी मानले.

## कामाच्या ठिकाणी महिलांकरिता सुरक्षित वातावरण हवे : रहाटकर



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ जानेवारी-** प्रत्येक शासकीय, अशासकीय कार्यालयांमध्ये कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षित वातावरण निर्माण होणे आवश्यक आहे. याविषयी कार्यालयातील प्रत्येक सहकाऱ्याची जबाबदारी महत्वाची असल्याचे राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी सांगितले.

कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई, निवारण) अधिनियम २०१३ अंतर्गत कार्यालयांमध्ये स्थापन करण्यात आलेल्या अंतर्गत तक्रार निवारण समिती अध्यक्ष सदस्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, प्रभारी अपर जिल्हाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे, रोहयोच्या उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी जावेद शेख यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

काही वेळा महिलांना कामाच्या ठिकाणी त्रासाला सामोरे जावे लागते, त्यांचा लैंगिक छळ होतो. मात्र त्या तक्रार करायला धजावत नाहीत. महिलांसाठी प्रत्येक कार्यालयात सुरक्षित वातावरण निर्माण होण्यासाठी, तसेच त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी कार्यालय प्रमुख, कार्यालयातील सहकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा, असे श्रीमती रहाटकर म्हणाल्या. महिलांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी अंतर्गत तक्रार निवारण समित्यांची दर तीन महिन्यांनी आढावा बैठक घ्यावी. या समितीचे सदस्य म्हणून काम करणाऱ्या प्रत्येकाने समितीला मिळालेल्या अधिकाराचा वापर करून महिलांना न्याय द्यावा. तसेच महिलांवर तक्रार करण्याची वेळ येणार नाही, असे वातावरण कार्यालयात निर्माण करावे, असे त्या म्हणाल्या. यासोबतच असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांसाठी गठीत करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय स्थानिक तक्रार निवारण समितीबाबत जनजागृती करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात तयार करण्यात आलेल्या हिरकणी कक्षाचे, तसेच पोलीस दलामार्फत शहरातील रिक्षांमध्ये लावण्यात आलेल्या डायल ११२ विषयक क्यूआर कोड उपक्रमाचे श्रीमती रहाटकर यांनी कौतुक केले. तसेच हे दोन्ही उपक्रम देशात सर्वत्र राबविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे श्रीमती विजया रहाटकर यांनी सांगितले. तसेच लातूर येथील सखी वन स्टॉप सेंटरने महिलांच्या जवळपास १ हजार तक्रारींचा निपटारा केला असून या कक्षाचे काम समाधानकारक असल्याचे त्यांनी नमूद केले. घराच्या पाटीवर पतीच्या नावासोबतच पत्नीचे नावही लावले जावे, यासाठी नांदेड जिल्हा परिषदेची मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत असताना मोहीम राबविली होती असे यावेळी सांगण्यात आले.

## आरोपीकडून तीन लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ जानेवारी-** पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने घरफोडीच्या गुन्ह्यातील सोलापूरच्या गुन्हेगाराला अटक करून २ लाख ८२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यातून तीन गुन्हे उघडकीस आले आहेत.

औसा पोलीस ठाण्याच्या हद्दीत रात्रीच्या वेळी काही घरांचा कडी-कोयंडा तोडून घरात प्रवेश करून सोन्या-चांदीचे दागिने चोरी केल्याच्या घटना घडल्या होत्या. या प्रकरणी औसा पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले होते. पोलीस अधीक्षक मुंडे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांकडून तपास सुरू होता. दरम्यान, यातील गुन्हेगारांची पथकाला माहिती मिळाली. पथकाने गुरुवारी सायंकाळी नांदेड रोडवरील कृषी महाविद्यालय परिसरातून संशयित शक्तिमान राजू काळे (वय २०, रा. देवगाव, ता. मोहोळ, जि. सोलापूर) याला ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी करण्यात आली. त्याची झडती घेतली असता, त्याच्याजवळ ३६ ग्रॅम वजनाचे २ लाख ८२ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आढळून आले. त्याचा साथीदार नीलेश कृष्णा शिंदे (वय २५, रा. झाडे बोरगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर) व त्याने घर फोडून चोरी केल्याची कबुली दिली. फरार नीलेश शिंदे याचा पोलीस शोध घेत आहेत.



स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मिरकले यांच्या नेतृत्वात पोलीस अंमलदार माधव बिलापट्टे, नवनाथ हासबे, मोहन सुरवसे, तुराब पठाण, सूर्यकांत कलमे, चालक पोलीस अंमलदार नकुल पाटील यांनी ही सेवा बजावली.

## तंत्रज्ञ वाघमारे निलंबित

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ जानेवारी-** महावितरणच्या चाकूर शाखा कार्यालयांतर्गत कार्यरत वरिष्ठ तंत्रज्ञ शिवकुमार सिताराम वाघमारे यास कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित केलेल्या वीज ग्राहकांचे मीटर स्वतःच्या घरी बसून वीज चोरी केल्याप्रकरणी परिमंडळ कार्यालयाने निलंबित केले आहे.

डिसेंबर महिन्याच्या वीज देयक वसुलीसाठी सहायक अभियंता आणि वित्त व लेखा विभागाचे उपव्यवस्थापक चाकूर शाखा कार्यालय अंतर्गत येणाऱ्या सर्वाधिक थकबाकी असलेल्या वीज ग्राहकांची तपासणी करत होते. यावेळी एका ग्राहकाकडे ६३ हजार रुपयांची थकबाकी दिसून आली. याबाबत वरिष्ठ तंत्रज्ञ शिवराम वाघमारे याच्याकडे विचारणा केली असता, सदरील ग्राहकाचा

**वीज खंडीत केलेल्या ग्राहकाचे मिटर बसवीले आपल्याच घरी**

वीजपुरवठा दोन वर्षांपासून बंद असल्याचे सांगितले. मात्र, सदरील मीटर सुरू असल्याचे आढळून आले.

मीटर वाचन करणाऱ्या एजन्सीकडे याबाबत चौकशी केली असता, कायमस्वरूपी वीज पुरवठा बंद केलेल्या ग्राहकाचे मीटर वरिष्ठ तंत्रज्ञ शिवराम वाघमारे हा स्वतःच्या घरी बसून चोरून वीज वापरत असल्याचे सांगितले. सदरील मीटर हे दीड वर्षापूर्वी शाखा कार्यालयातून घेऊन आपण स्वतःच्या राहत्या घरी वापरल्याची कबुली शिवराम वाघमारे याने दिली असून, तो वीज चोरी करत असल्याचे सिध्द झाल्याने, वरिष्ठ तंत्रज्ञ शिवराम वाघमारे यास मुख्य अभियंता यांच्या निर्देशानुसार तत्काळ निलंबित करण्यात आले आहे.

उदगीर विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्याकडून शिवराम वाघमारे याच्यावर विद्युत कायदा २००३ नुसार वीज चोरीचा गुन्हा नोंदविण्यात येत आहे असे संबंधीत विभागाकडून कळविण्यात आले आहे.

## पोलीस विभागाच्या प्रदर्शनास विद्यार्थ्यांची गर्दी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ जानेवारी-** पोलीस दलाच्या स्थापना दिनानिमित्त येथील क्रीडा संकुलात जिल्हा पोलीस दलातर्फे वेगवेगळ्या विभागांचे स्टॉल लावण्यात आले असून या प्रदर्शनाचे उद्घाटन राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांच्या हस्ते झाले. प्रदर्शनास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून विद्यार्थ्यांना पोलीस दलाच्या कामकाजाची ओळख होत आहे.

सायबर सेल, भरोसा सेल, मानव तस्करी विरोधी पथक, बॉम्बशोधक पथक, शस्त्र विभाग, क्राईम ब्रँच, इन्वेस्टिगेशन व्हॅन, डॉग स्कॉड, वाहतूक सुरक्षा, वायरलेस यंत्रणा, सुरक्षा हेल्पलाइन आदी विभागांच्या माहितीचे आणि शस्त्राचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे.

राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा रहाटकर यांच्यासह पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांनी प्रदर्शनाला भेट दिली. यावेळी मुंडे व रहाटकर यांना पोलीस दलाच्या विविध विभागांची माहिती दिली.

दोन दिवस चालणाऱ्या या प्रदर्शनास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळत असून पहिल्या दिवशी जवळपास ८ हजार विद्यार्थी व नागरिकांनी प्रदर्शनास भेट देऊन जिल्हा पोलीस दलाच्या कार्याची माहिती जाणून घेतली.

## ६० वर्षीय एकाचा गळा दाबून खून

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ जानेवारी-** ६० वर्षीय अनोळखी व्यक्तीचा अज्ञाताने गळा दाबून खून केला. त्यानंतर पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह मसलगा मध्यम प्रकल्पात टाकून दिल्याची घटना घडली. याप्रकरणी निलंगा पोलिस ठाण्यात गुरुवारी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी सांगितले, मसलगा मध्यम प्रकल्पात एका ६० वर्षीय अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. पोलिसांनी मृतदेह पाण्याबाहेर काढून तपास केला असता अज्ञाताने अज्ञात कारणासाठी गळा दाबून खून केल्याचे आढळले. तसेच पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह पाण्यात टाकून दिला. या प्रकरणी पोलिस उपनिरीक्षक सुनील पल्लेवाड यांनी फिर्याद नोंदवली आहे.

## ज्ञान जिज्ञासापूर्तीसाठी वाचन संकल्प महत्वाचा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ जानेवारी-** वाचन सातत्यामुळे स्वतःच्या विचार प्रगल्भतेबरोबर जागतिक ज्ञानाचा खजिना घरबसल्या अनुभवता येतो. मानवी सांस्कृतिक वारसा हा लिखित स्वरूपात दडला असून याच्या अनुभूतीसाठी आणि ज्ञान जिज्ञासापूर्तीसाठी प्रत्येकांनी वाचन संकल्प करणे गरजेचे आहे असे विचार ग्रंथमित्र पांडुरंग अडसुळे यांनी व्यक्त केले.

संत कबीर सार्वजनिक वाचनालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा कार्यक्रमाचा शुभारंभ पांडुरंग अडसूळे यांच्या हस्ते नुकताच करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बसवेश्वर हौसिंग सोसायटी चेअरमन कोकणे होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवराच्या हस्ते संस्काररत्न इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांना प्रबोधनात्मक बालवाचनसाहित्याचे वाटप करुन सामूहिक वाचन करण्यात आले.

अध्यक्षीय समारोपात कोकणे मामा यांनी, संत कबीर वाचनालयाच्या वतीने करीत असलेल्या विविध कार्याचा वाचन संस्कृती प्रसारासाठीच्या प्रयत्नाचा गौरवपूर्ण उल्लेख करून या उपक्रमास शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी संस्काररत्न इंग्लिश स्कूलच्या संचालिका लवटे सी. डी., शिक्षिका मनीषा पुरी, सोनी माने, साधना पाटील, सुनिता घवले आदीसह वाचक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक वाचनालयाचे ग्रंथपाल ग्रंथमित्र आत्माराम कांबळे यांनी केले.

## गंजगोलाईचा भाग व्यापारझोन जाहीर करा

### व्यावसायिकांनी केली मागणी : स्वाभिमानी मुस्लीम विकास परिषदेचा मोर्चा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ जानेवारी-** शहरातील गंजगोलाई भागातील फळे, भाजीपाल्यासह अन्य व्यावसायिकांनी पाठीवर मारा, पोटावर नको असे म्हणत आमचा व्यवसाय कमाईसाठी नव्हे तर पोटाची खळगी भरण्याचा आहे, गंजगोलाईचा भाग व्यापारझोन म्हणून जाहीर करावा, अशी मागणी करीत स्वाभिमानी मुस्लीम विकास परिषदेच्या वतीने महापालिकेवर मोर्चा काढण्यात आला.




मनपाने पट्टे मारून दिलेल्या जागेतूनही व्यावसायिकांना उठविण्यात आल्याने जवळपास १ हजारांहून अधिक लोकांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आली आहे. व्यावसायिकांना जागा मिळावी यासाठी स्वाभिमानी मुस्लीम विकास परिषदेचे संस्थापक अध्यक्ष मोहसीन खान यांच्या नेतृत्वात महापालिकेवर धडक मोर्चा काढण्यात आला. गंजगोलाई पूर्व बाजू हनुमान चौक ते अण्णा भाऊ साठे चौक (पश्चिम बाजू), गंजगोलाई दक्षिण बाजू ए. वन. हॉटेल ते घंटे किराणा, छत्रपती शिवाजी महाराज रोड व्यावसायिक झोन करावा, गंजगोलाई भागात हनुमान चौक ते अण्णा भाऊ साठे चौक मार्ग तसेच भुसार लाईन हा भाग नो व्हेईकल झोन करून तीनचाकी, चारचाकी वाहनांना प्रवेश बंद करावा, यातून वाहतूक कोंडी होणार नाही, गंजगोलाई व्यावसायिक झोनमध्ये परवानाधारक व्यावसायिकांना परवानगी द्यावी, शहरात नवीन व्यावसायिकांना परवाने द्यावेत, मनपाने शहरातील अशा व्यावसायिकांकडून दैनंदिन टॅक्स वसूल करावा, गंजगोलाई, उषाकिरण, रेणापूर नाका, विवेकानंद चौक, बांधकाम भवन भागात कायमस्वरूपी जागा द्यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली.

यावेळी शादूल शेख, आयुब शेख, जब्बार बागवान, इरफान शेख, ॲड. मुहम्मदअली शेख, मुजीब हमदुले, अस्लम शेख, अजीज बागवान, ॲड. मुश्ताक सौदागर, युसूफ शे, उमर शेख, सत्यभामा कांबळे, मंगल क्षीरसागर, संगीता गायकवाड आदींची उपस्थिती होती.

गंजगोलाई भागात हातगाड्यांवर फळे, भाजीपाला विक्रेत्यांसह सुकामेवा, बांगडी, चप्पल, झाडू, हळदी-कुंकू, पान विक्रेत्यांसह ग्रामीण भागातील काही शेतकरीही भाजीपाला घेऊन बसतात. अनेकांना पिढ्यानपिढ्या हाच व्यवसाय आहे, गेल्या अनेक वर्षांपासून या भागात विक्रेते असताना त्यांना शिस्त लावण्याऐवजी अतिक्रमणाच्या नावाखाली उठवून लावणे, चुकीचे असल्याचा आरोप करण्यात येत आहे. या मोर्चात अनेक महिलांची उपस्थिती होती.

## ७५ वर्षा नंतरही अभाविपचे काम सुरू

**तभा वृत्तसेवा**

**लातूर,दि.४ जानेवारी-** स्वातंत्र्यानंतर भारताला अमेरिका व जपानचे मॉडेल बनवू, अशा घोषणा देण्यात आल्या.नेहरू मॉडेल हवे असल्याचे सांगण्यात आले. त्याच काळात स्थापन झालेल्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने राष्ट्राच्या नवनिर्माणासाठी अमेरिका व जपान नव्हे तर छत्रपती शिवराय,डॉ. बाबासाहेब आंबेडकर व स्वामी विवेकानंदांचे विचार आवश्यक असल्याची भूमिका मांडली.याच भूमिकेतून ७५ वर्षानंतर आजही विद्यार्थी परिषद कार्यरत असल्याचे प्रतिपादन अभाविपच्या राष्ट्रीय मंत्री शालिनी वर्मा यांनी केले.




अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या देवगिरी प्रांताचे ५९ वे प्रदेश अधिवेशन लातूर येथे सुरू आहे. या अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी दिवाणजी मंगल कार्यालयापासून हनुमान चौकापर्यंत शोभायात्रा काढण्यात आली. या यात्रेच्या समारोपप्रसंगी आयोजित जाहीर सभेत शालिनी वर्मा बोलत होत्या. मंचावर प्रदेश अध्यक्ष प्रा.डॉ.सचिन कंदले,प्रदेश मंत्री वैभवी ढिवरे यांच्यासह छात्र नेते साक्षी पाटील, चिन्मय महाले, स्वप्निल बगाडे,अजिंक्य जहागीरदार, दर्शन पाटील यांची उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना राष्ट्रीय मंत्री शालिनी वर्मा म्हणाल्या की, आज महाराष्ट्रात विद्यापीठामध्ये गोंधळाची स्थिती आहे. परंतु डोळ्यावर काळी पट्टी बांधलेल्या सरकारला ती दिसत नाही. महिला व मुलीवर हत्याचार होत आहेत. त्यावर कारवाई केली जात नाही. सरकारला आज सावित्रीबाई फुले यांच्या विचारांची गरज आहे.सरकारने ही परिस्थिती सुधारली नाही तर विद्यार्थी परिषद सत्तापालट करू शकते,असे त्या म्हणाल्या.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या स्थापनेला ७५ वर्षे झाली. स्वातंत्र्यानंतर देशाच्या नवनिर्माणासाठी अमेरिका, जपान मॉडेल तसेच नेहरू मॉडेलची आवश्यकता असल्याचे मत मांडले जात होते. त्या काळात अभाविपने भारतीय संस्कृती ही पुरातन असल्याचे सांगत छत्रपती शिवराय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, स्वामी विवेकानंद यांचे विचार महत्त्वाचे असल्याचे सांगत हा विचार लावून धरला.आजतागायत राष्ट्राच्या नवनिर्माणासाठी अभाविप हा विचार मांडत आली आहे.

देशासाठी काम करण्याची प्रेरणा विद्यार्थी परिषदे कडून दिली जाते. आज देशात संविधानावरील बेगडी प्रेम दाखविणाऱ्यांची संख्या वाढत आहे. परंतु बांगलादेशात हिंदू आणि दलितावर अत्याचार होत असताना ही मंडळी शांतच आहे. सामाजिक सलोखा जपत समरसतेच्या माध्यमातून सेवा करण्याचे काम परिषदेच्या माध्यमातून अखंड सुरू असल्याचे त्या म्हणाल्या. प्रदेश मंत्री वैभवी ढिवरे म्हणाल्या की,विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळण्याचे काम सरकार करत आहे. तत्पूर्वी साक्षी पाटील, चिन्मय महाले, स्वप्निल बगाडे आदींनी मनोगत व्यक्त केले.